दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजीचे दुपारी १२.०० वाजता मा. मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली आयमा रिक्रीएशन हॉल , नाशिक संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त

सभेस खालील प्रमाणे सन्माननिय संचालक सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

| अ. क्र. | मा.संचालक सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १. | मा.ना.ॲड.के.सी.पाडवी,<br>मंत्री, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. | अध्यक्ष, (पदसिध्द) |
| २. | मा.श्री.वसंत चि. पुरके | उपाध्यक्ष |
| ३. | मा.श्री.मधुकर निंबाजी काठे | संचालक |
| ४. | मा. श्री. धनराज हरिभाऊ महाले | संचालक |
| ५. | मा. श्री. विकास दुलाजी वळवी | संचालक |
| ६. | मा. श्री. विठ्ठल देवराम देशमुख | संचालक |
| ७. | मा. श्री. केवलराम तुळशीराम काळे | संचालक |
| ८. | मा. श्री. मगन नुरा वळवी | संचालक |
| ९. | मा. श्री.अशोक भाऊराव मंगाम | संचालक |
| १०. | मा. श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग | संचालक |
| ११. | मा. श्री. प्रकाश तुळशीराम दडमल | संचालक |
| १२. | मा. श्रीमती मिनाक्षी अर्जुनराव वट्टी | संचालिका |
| १३. | मा. श्रीमती ताराबाई शंकर माळेकर | संचालिका |
| १४. | मा.श्रीमती जयश्री नामदेव तळपे | संचालिका |
| १५. | मा.ट्राईफेड, नवी दिल्ली यांचे प्रतिनिधी | संचालक, (पदसिध्द) |
| १६. | अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक | संचालक, (पदसिध्द) |
| १७. | मा.आयुक्त,<br>आदिवासी विकास विभाग, (महाराष्ट्र राज्य), नाशिक. | संचालक, (पदसिध्द) |
| १८. | मा. सहनिबंधक सहकारी संस्था, (महाराष्ट्र राज्य), नाशिक. | संचालक, (पदसिध्द) |
| १९. | श्री.गणेश सुकाळे | कर्मचारी प्रतिनिधी |
| २०. | श्री.अमोल धुर्वे | कर्मचारी प्रतिनिधी |
| २१. | व्यवस्थापकीय संचालक,<br>म.रा.सह. आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक | पदसिध्द सचिव |

व्यवस्थापकीय संचालक यांनी सर्व संचालक व मा. मंत्री, आदिवासी विकास तथा अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांचे स्वागत केले.

मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ तथा मा.मंत्री, आदिवासी विकास यांनी सभेकरीता उपस्थित सदस्य यांची गणपुर्ती झाल्याने विषयसुचीप्रमाणे सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती दिली.

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक १ : संचालक मंडळ सभा दिनांक १२.०३.२०२१ रोजीचे इतिवृत्तास वाचुन कायम करणे.**

महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी दिनांक १२.०३.२०२१ रोजी संपन्न झालेली संचालक मंडळ सभेचे इतिवृत्ताचे वाचन केले. मा.संचालक सदस्य यांनी सदर इतिवृत्तास मान्यता दिली व खालील प्रमाणे ठराव मंजुर करण्यात आला.

**ठराव क्रमाक १ :** दिनांक २२.०३.२०२१ रोजी संपन्न झालेली संचालक मंडळ सभेचे इतिवृत्तास सदर संचालक मंडळ सभा मान्यता देत आहे.

**सुचक** : मा. श्री. धनराज हरीभाऊ महाले, संचालक सदस्य

**अनुमोदक** : मा. श्री. भरतलाल दुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक २ : महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या संरचनेबाबत.**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक यां सांधिय संस्थेची, महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६० व नियम १९६१ चे कलम ९ (i) अन्वये दि.२२.०३.१९७२ रोजी नोंदणी करण्यात आलेली असुन कायद्यातील कलम १२ (१) नुसार सदर संस्थेचे वर्गीकरण हे सर्वसाधारण संस्था व उपवर्गीकरण इतर संस्था असे करण्यात आले आहे. जुना पोटनियम क्रमांक ४१ व ४२ अन्वये संचालक मंडळ संरचना ही खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **संचालक मंडळ (४१)** | महामंडळाचा कारभार व व्यवस्थापन संचालक मंडळ चालवेल. संचालक मंडळ खालील प्रमाणे असेल. | | |
| १. | महाराष्ट्र शासनाने नियुक्त करावयाचे (आठ) त्यापैकी तीन संचालक संख्या राज्य विधिमंडळाचे विद्यमान आदिवासी सभासद असतील... | | ०८ |
| २. | संलग्न संस्थांनी निवडून द्यावयाच्या एकूण-१२ संचालकांची संख्या जिल्हावार खालील दर्शविल्याप्रमाणे असेल, मात्र निवडून द्यावयाचे संचालक हे आदिवासीच राहतील... | | १२ |
| | अ) | ठाणे. | ०२ |
| | ब) | नासिक. | ०२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | क) | धुळे व जळगांव. | ०२ |
| | ड) | पुणे व रायगड. | ०१ |
| | इ) | अहमदनगर. | ०१ |
| | ई) | अमरावती. | ०१ |
| | फ) | यवतमाळ व नांदेड. | ०१ |
| | ग) | नागपूर व भंडारा. | ०१ |
| | ह) | चंद्रपूर व गडचिरोली. | ०१ |
| | छ) | राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातून महामंडळाच्या सभासद संलग्न संस्थांनी निवडावयाच्या आदिवासी महिला राखीव संचालिका. | ०३ |
| ३. | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., ने नियुक्त केलेला एक आदिवासी संचालक, आदिवासी संचालक उपलब्ध नसल्यास इतर आरक्षित वर्गातील एक संचालक, इतर आरक्षित वर्गातील संचालक उपलब्ध नसल्यास इतर (जनरल) वर्गातील एक संचालक. | | |
| ४. | राज्य सहकारी अंगिकृत, निमराज्य सहकारी अंगिकृत संस्था अगर स्थानिक संस्था यासाठी शासनाने नियुक्त करावयाचा एक संचालक. | | |
| ५. | सचिव, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन. | | |
| ६. | केंद्र शासनाने नियुक्त करावयाचे दोन प्रतिनिधी. | | |
| ७. | अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे, नासिक, अमरावती, नागपूर. | | |
| ८. | प्रमुख वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य किंवा त्यांचा प्रतिनिधी. | | |
| ९. | निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य किंवा त्यांचा प्रतिनिधी. | | |
| १०. | कर्मचाऱ्यांचे दोन प्रतिनिधींपैकी किमान एक मान्यताप्राप्त संघटनेचा असावा. | | |
| ११. | व्यवस्थापकीय संचालक, पदसिध्द सदस्य सचिव किंवा त्यांचेकरिता व त्यांचेवतीने उप व्यवस्थापकीय संचालक. | | |

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| ४२) अ) | पोटनियम ४१ कलम (२) प्रमाणे निवडावयाचे संचालक हे दर ५ वर्षांने निवडले जातील आणि अशारितीने निवडून आलेले संचालक पहिली सभा ज्या तारखेला घेण्यात येईल त्या तारखेपासून ५ वर्षाच्या मुदतीपर्यंत पदधारण करतील आणि नवीन समितीच्या सदस्यांची पहिली सभा भरण्याच्या निकटपूर्वीपर्यंत ते पदावर राहतील. |
| ब) | निवृत्त होणारे संचालक पुन्हा निवडणूकीसाठी पात्र राहतील. |
| क) | नियुक्त केलेले, निवडलेले अगर स्विकृत करण्यात आलेले संचालक पुढील शासनाने नियुक्ती करेपर्यंत, निवडेपर्यंत अगर स्विकृत करेपर्यंत त्या जागेवर राहतील. |

उपरोक्त पोटनियम क्रमांक ४१ व ४२ नुसार संचालक मंडळाची संरचना आहे. सदर संरचनेनुसार मागील संचालक मंडळ हे दि.०५.०३.२०१० रोजी निवडुन आले असुन पहिली संचालक मंडळ सभा ही दिनांक १८.०३.२०१० रोजी संपन्न झाली असुन सदर तारखेपासमुन दिनांक १७.०३.२०१५ रोजीच्या मुदतीपर्यंत पदधारण करतील अशी उपरोक्त पोटनियमा प्रमाणे तरतुद आहे. दिनांक १७.०३.२०१५ रोजी नंतर सद्यस्थितीतील संचालक मंडळ मुदत हि समाप्त झ ालेली असुन निवडणुक होणे अपेक्षित आहे.

जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांचेकडुन निवडणुक कार्यक्रम सन २०१५ मध्ये जाहीर करण्यात आलेला होता. सहकारी अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार संचालक मंडळ संरचनेस सुधारणा न केल्यामुळे निवडणुक ही घेतलेली नाही. पोटनियम दुरुस्तीचा प्रस्ताव हा वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९.०९.२०१६ मध्ये पुढे ठेवण्यात आलेला होता. वार्षिक सर्वसाधारण सभेत संचालक सदस्य संरचना दुरुस्ती ही जुना पोटनियम क्रमांक ४१ (२) प्रमाणेच ठेवुन किरकोळ बदलासह उर्वरित सर्व पोटनियम हे बदलण्याकरिता वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२९.०९.२०१६ मार्फत मंजुरी देण्यात आली. दिनांक २९.०६.२०१६ च्या शासन निर्णयानुसार जुना पोटनियम क्रमांक ४१ (२) जुन्याप्रमाणे ठेवुन सहकार आयुक्तांना मंजुरी करिता पाठविण्यात आले. मा.सहाकार आयुक्तांती जुना पोटनियम क्रमांक ४१ (२) वगळता उर्वरित सर्व पोटनियमास मा.आयुक्त (सहकार) यांचेमार्फत मंजुरी देण्यात आली.

महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार पुढील संचालक मंडळ निवडणुक घेणेकामी जुना पोटनियम क्रमांक ४१(२) पोटनियमास मंजुरी मिळणे आवश्यक आहे.उपनिबंधक, सहकारी संस्था (आ.वि.), महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे पत्र क्रमांक २०/आविम/निवडणुक व ९७ व्या घटना पोटनिरयम दुरुस्ती/२०२० दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या पत्रानुसार ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार महामंडळाचा उपविधी क्रमांक २० मध्ये दुरुस्ती करुन उपविधी दुरुस्ती बाबतचा प्रस्ताव मा.सहकार आयुक्त कार्यालयास सादर करण्याचे कळविण्यात आले आहे. दिनांक २९.०६.२०१६ रोजी आदिवासी विकास विभागामार्फत महामंडळाच्या संचालकांच्या संरचनेबाबत जो शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता, तो शासन निर्णय हा दिनांक २३.०७.२०२०च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आला आहे. मा.उच्च

Scanned with CamScanner

न्यायालय, नागपुर येथे दावा क्रमांक १२९८७/२०१८ दिनांक १४.११.२०१८ रोजी दाखल करण्यात असुन मुंबई येथे वर्ग करण्यात आला आहे.

९७ व्या घटनादुरुस्तीतील कलम ७३ अअअ नुसार नियमावली खालीलप्रमाणे

**७३ अअअ. समितीची रचना करणे.**

(१) उपविधींमध्ये करण्यात येईल इतक्या संख्येचा समितीत अंतर्भाव असेल ;

परंतु समितीच्या सदस्यांची **कमाल संख्या एकवीसपेक्षा अधिक असणार नाही.**

परंतु आणखी असे की, बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ याच्या तरतुदी, बँक व्यवसाय करण्याऱ्या सर्व संस्थाना लागू होईल.

(२) समितीला, संस्थेची उदिष्टे व तिने हाती घेतलेली कार्ये यांच्या संबंधात, "तज्ञ संचालक" स्वीकृत करण्यात येईल.

परंतु, तज्ञ संचालकांची संख्या ही, पोट-कलम (१) च्या पहिल्या परंतुकात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, समितीच्या सदस्यांच्या कमाल संख्यव्यतिरिक्त असेल आणि ती दोनपेक्षा अधिक असणार नाही.

परंतु आणखी असे की, ज्या समितीमध्ये सतरापेक्षा जास्त सदस्य नसतील अशा समितीच्या बाबतीत समिती एका कार्यलक्षी संचालकाची नेमणूक करु शकेल आणि सतरापेक्षा जास्त सदस्य असलेल्या आणि एकवीसपेक्षा जास्त सदस्य नसलेल्या समितीच्या बाबतीत, समिती नामनिर्दिष्ट करील अशा कार्यलक्षी संचालकांची संख्या दोनपेक्षा अधिक असणार नाही.

परंतु तसेच की, शासनाने भाग भांडवल असेल अशा संस्थेच्या बाबतीत शासनाने नामनिर्देशित केलेले दोनपेक्षा जास्त असणार नाहीत असे शासनाचे अधिकारी समितीचे सदस्य असतील, ते पोटकलम (१) च्या पहिल्या परंतुकान्वये नेमून देण्यात आलेल्या संख्येच्या व्यतिरिक्त असतील.

परतु तसेच की, जर समिती दोन कार्यलक्षी संचालकांची मिळून बनलेली असेल तर, अशा कार्यलक्षी संचालकांपैकी एक कार्यलक्षी संचालक हा, संबंधित संस्थेचा कर्मचारी असेल किंवा तो अशा संस्थेच्या मान्यता प्राप्त कर्मचारी संघाचा प्रतिनिधी असेल.

परंतु तसेच की, संस्थेचे कार्यलक्षी संचालक हे समितीचे सदस्यदेखील असतील आणि अशा सदस्यांना पोट-कलम (१) च्या पहिल्या परंतुकात विनिर्दिष्ट केलेल्या समितीच्या एकुण सदस्य संख्येची गणना करण्याच्या प्रयोजनासाठी वगळण्यात येईल.

परंतु तसेच की, अशा तज्ञ संचालकांना तसेच तिसऱ्या परंतुकान्वये शासनाने नामनिर्देशित केलेल्या संदस्यांना संस्थेच्या कोणत्याही निवडणुकीत मत देण्याचा अधिकार असणार नाही आणि ते, समितीने पदाधिकारी म्हणुन निवडून दिले जाण्यास पात्र असणार नाही.

(३) समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांना आणि तिच्या पदाधिकाऱ्यांचा पदावधी, निवडणुकीच्या दिनांकापासून पाच वर्षापर्यंत असेल आणि पदाधिकाऱ्यांची मुदत समितीच्या मुदतीइतकीच असेल.

(४) समितीवरील नैमितीक रिक्त पद, ज्याच्यासंबंधात नैमितीक रिक्त पद निर्माण झाले असेल अशा क्रियशील सदस्यांचा त्याच वर्गामधून भरता येईल.

Scanned with CamScanner

(५) (अ) जर समितीच्या सदस्यांच्या कोणत्याही सार्वत्रिक निवडणुकीत, निवडणुकीचा निकाल जाहिर झाल्यानंतर समितीची रचना झाली नसेल तर, या अधिनियमात किंवा नियमात किंवा संस्थेच्या उपविधीत काहीही अंतर्भत असले तरी, निर्वाचित अधिकारी किंवा अशी निवडणुक घेणारा इतर कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी, दोन तृतीयांश किंवा त्याहून अधिक सदस्यांचा निकाल जाहीर झाल्यानंतर सात दिवसांच्या आत त्यांची नावे त्यांच्या कायम पत्त्यांसह निबंधकाकडे अग्रेषित करील. निबंधक, त्याला कळविण्यात आलेली नावे प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन पंधरा दिवसांच्या आत, अधी नावे व पत्ते सूचना फलकावर किंवा त्यांच्या कार्यालयातील कोणत्याही ठकृळक जागी नोटीस लावून प्रसिध्द करील किंवा प्रसिध्द करण्याची तजवीज करील आणि नोटीस प्रदिध्द झाल्यानंतर संस्थेच्या समितीची रितसर रचना करण्यात आली असे समजण्यात येईल. सदस्यांची दोन-तृतीयांश इतकी संख्या ठरवितांना अपुर्णांक हिशोबात घेतला जाणार नाही.

परंतु, अशा रितीने नावे व पत्ते प्रसिध्द करण्यामुळे

(एक) उर्वरित सदस्यांची निवडणुक पूर्ण होण्यास तसेच निवडून आलेल्या सदस्यांची नावे व कायम पत्ते वरीलप्रमाणेच जसजसे उपलब्ध होतील तसतसे प्रसिध्द करण्यास अडथळा होतो किंवा
(दोन) या अधिनियमाखाली समितीच्या सदस्यांच्या पदावधीला बाधा पोहोचते असे मानले जाणार नाही

(ब) उर्वरित सदस्य निवडून आल्यानंतर त्यांची नावेही (त्यांच्या कायम पत्यांसह) त्यांनतर तशाच प्रकारे निबंधकाकडून प्रसिध्द करण्यात येईल.

७३ ब. संस्थेच्या समित्यांवर सदस्यांसाठी जागा राखून ठेवणे व त्यासाठी निवडणुक घेणे.

(१) या अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या नियमांत किंवा कोणत्याही संस्थेच्या कोणत्याही उपविधी काहीही अंतर्भूत असले तरी, राज्यशासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेश देईल, अशा संस्थेच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या समितीवर पुढीलप्रमाणे तीन जागा राखून ठेवण्यात येतील

(क) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती यांमधील सदस्यांसाठी एक

(क-१) इतर मागासवर्गातील एक सदस्य आणि

(क-२) विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय यांच्यामधील एक सदस्य

(३) यथास्थिती, अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या किंवा इतर मागासवर्गीय किंवा विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय मधील संस्थेचा कोणताही व्यक्तीगत सदस्य किंवा सदस्य संस्थेच्या समितीच्या कोणताही निर्वाचित सदस्य किंवा सदस्य संस्थेच्या सकितीचा कोणताही सछय मग तो या कलमान्वये निवडण्यात, स्वीकृत करण्यात किंवा नियुक्त करण्यात आलेला असो राखील जागेसाठी होणारी निवडणुक लढविण्यास पात्र असेल आणि समीतीच्या निवडणुकीत मत देण्याचा हक्क असलेल्या प्रत्येक व्यक्तीस अशा कोणत्याही राखीव जागेसाठी निवडणुकीत मत देण्याचा हक्क असेल.

Scanned with CamScanner

(४) तीन राखीव जागांपैकी कोणत्याही जागेवर कोणत्याही व्यक्तीची निवड न झाल्यास अशी किंवा अशा राखीव जागा, पोट-कलम (३) अन्वये निवडणुक लढविण्याचा हक्क असलेल्या व्यक्तींमधुन नामनिर्देशाद्वारे, भरण्यात येतील.

**७३ क. महिलांकरिता जागा राखून ठेवणे.**

(१) हा अधिनियम, किंवा त्याखाली केलेले नियम यांमध्ये, किंवा कोणत्याही संस्थेच्या उपविधींमध्ये काहीही अंतर्भंत असले तरी, प्रत्येक संस्थेच्या समितीवर महिला सदस्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सदस्य म्हणून व्यक्तींचा अंतर्भाव असणाऱ्या प्रत्येक संस्थेच्या समितीवर महिलांकरिता दोन जागा राखून ठेवण्यात येतील.

(२) संस्थेची कोणतीही महिला सदस्य किंवा सदस्य संस्थेच्या समितीची कोणतीही महिला सदस्य, मग ती निवडून आलेली, स्वीकृत केलेली किंवा नामनिर्दिष्ट केलेली असो, पोट-कलम (१) अन्वये, राखून ठेवण्यात आलेल्या जागेकरता निवडणूक लढवण्यास पात्र असेल.

(३) अशा राखून ठेवण्यात आलेल्या जागांकरिता कोणतीही महिला सदस्य किंवा, यथास्थिती कोणत्याही महिला सदस्य निवडून आलेल्या नसतील त्याबाबतीत, अशी जागा किंवा अशा जागा, पोट कलम (२) अन्वये निवडणुक लढवण्यासाठी पात्र असलेल्या महिला सदस्यामधुन स्वीकृत करुन घेऊन भरण्यात येतील.

(४) केवळ महिला सदस्य असणाऱ्या संस्थेच्या समितीला या कलमातील कोणतीहि गोष्ट लागु होणार नाही.

उपरोक्त ९७व्या घटनादुरुस्तीनुसार तरतुद आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे दिनांक १४ जानेवारी,१९७२ च्या शासन निर्णयानुसार अध्यक्ष हे मा.मुख्यमंत्री व उपाध्यक्ष मा.मंत्री, समाजकल्याण हे होते. दिनांक २१ जानेवारी, १९८५ च्या शासन निर्णयानुसार महामंडळाचे अध्यक्ष हे मा.मंत्री (आ.वि.) हे असुन मा.राज्यमंत्री (आ.वि.) हे होते. दिनांक २५ जुन, २०१९ च्या शासन निर्णयानुसार महामंडळाच्या उपाध्यक्ष हे शासन नियुक्त असतील अशी तरतुद आहे.महामंडळाचा पोटनियम क्रमांक २३ नुसार शासन नियुक्त असतील.

महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार संरचना खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १. | महिला आरक्षण | २ |
| २. | इतर मागास वर्गीय | १ |
| ३. | अनुसूचित जाती किंवा जमाती | १ |
| ४. | विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय यांच्यामधील एक सदस्य | १ |

Scanned with CamScanner

**प्रस्ताव**

१७ व्या घटनादुरुस्तीनुसार २१ निर्वाचित सदस्य वगळता २ कार्यलक्षी संचालक (कर्मचारी प्रतिनिधी व व्यवस्थापकीय संचालक), २ तज्ञ संचालक (योजनांना अनुसरुन) व २ संचालक हे शासनाचे भाग भांडवल असेल अशा संस्थांचे अधिकारी (भारत सरकार व महाराष्ट्र शासनाचे प्रत्येकी एक) हे संचालक असतील.

उपरोक्त नमुद घटनादुरुस्ती, शासन निर्णय व महामंडळाचे पोटनियम लक्षात घेता, सुयोग्य संरचना प्रस्तावित करावी ज्यात खालील बाबींचा उल्लेख असावा.

| | | |
|---|---|---|
| १) | पोटनियम क्रमांक २३ नुसार महामंडळाचे मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष हे शासन नियुक्त असतील. | २ |
| २) | राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातून महामंडळाच्या सभासद संलग्न संस्थांनी निवडावयाच्या महिला राखीव संचालिका. | कमीत कमी ०२ |
| ३) | राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातून महामंडळाच्या सभासद संलग्न संस्थांनी निवडावयाच्या इतर मागासवर्गा मधील एक सदस्य | ०१ |
| ४) | राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातून महामंडळाच्या सभासद संलग्न संस्थांनी निवडावयाच्या विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय यांच्यामधील एक सदस्य | ०१ |
| ५) | अनुसूचित जाती किंवा जमाती मधील एक सदस्य | ०१ |
| ६) | कार्यलक्षी संचालकांपैकी एक कर्मचारी प्रतिनिधी व एक व्यवस्थापकीय संचालक | ०२ |
| ७) | तज्ञ संचलांपैकी एक मा.प्रधान सचिव, अन्न व नागरी पुवरठा विभाग, मंत्रालय, मुंबई आणि एक मा.मुख्याधिकारी, भारतीय जनजाती सहकारी विपणन विकास परिसंघ | ०२ |
| ८) | संचालक हे शासनाचे भाग भांडवल असेल अशा संस्थांचे अधिकारी पैकी भारत सरकार व महाराष्ट्र शासनाचे प्रत्येकी एक | ०२ |

Scanned with CamScanner

तरी सदर विषयास अनुसरुन मार्गदर्शन तथा निर्णयास्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक २** सदर संचालक मंडळ संरचना हि बाब न्यायप्रविष्ठ असल्याने मा.न्यायालयाचा निकाल हा अंतिम ग्राह्य धरण्यात येईल.

**सुचक** :- मा. श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्रीमती मिनाक्षी अर्जुनराव वट्टी, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

सदर विषयाचा ठराव मंजुर केल्यानंतर मा.श्रीमती मिनाक्षीताई वट्टी, मा.श्री.भरतलाल दुधनाग, मा.श्री.अशोक मंगाम या संचालक सदस्य यांनी श्री.अविनाश राठोड, व्यवस्थापक (विपणन) यांना निलंबित करण्याची मागणी केली. सदर श्री.अविनाश राठोड, व्यवस्थापक (विपणन) यांना निलंबित करण्याची मागणीवर मा.अध्यक्ष, म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक तथा मा.मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य यांनी व्यवस्थापकीय संचालक यांना सदर प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

अहवाल सादर होताच अहवालातील निष्कर्षांनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असे अश्वासन मा.मंत्री, आदिवासी विकास यांनी मा.संचालक संचालक सदस्य यांना दिले आणि पुढील विषय वाचण्यास महाव्यवस्थापक (वित्त) यांना परवानगी दिली.

**विषय क्रमांक ३ : सन २०२०-२०२१ चे दिनांक ३१.०३.२०२१ अखेरचे वार्षिक हिशोबपत्रके, व्यापारी पत्रक, नफा तोटा पत्रक, ताळेबंद व वार्षिक अहवालास मंजूरी मिळणे बाबत.**

महामंडळाचे आर्थिक वर्ष सन २०२०-२०२१ ( दिनांक ०१.०४.२०२० ते ३१.०३.२०२१ ) या कालावधीचा आर्थिक अहवाल सादर करण्यात येत आहे.

महामंडळ राबवित असलेल्या उपक्रमाचे सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाचे हिशोबपत्रके तयार करुन ती स्वतंत्र सहा भागात दर्शविण्यात आलेली आहे.

१. एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेची एकत्रित परिणाम

२.आधारभूत किंमत खरेदी योजना

३. गौणवनोपज किमान आधारभूत किंमत खरेदी योजना (केंद्रशासन)

४. किंमत स्थिर योजना (नाफेड तुर)

५. खावटी कर्ज वाटप योजना

६. न्युक्लियस बजेट कर्ज वाटप योजना

खावटी कर्ज वाटप व न्युक्लियस बजेट योजना शासन समप्रवर्तक निधीवर आधारीत असल्यामुळे सदर दोन्ही योजनांची आर्थिक हिशोबपत्रके स्वतंत्रपणे दर्शविण्यात आलेली आहे.

Scanned with CamScanner

तथापी आधारभूत किंमत खरेदी योजना राज्य शासनाचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अभिकर्ता म्हणून महामंडळामार्फत राबविण्यात येत असल्यामुळे या योजनेतील खरेदी केलेल्या मालाचे हस्तांतरण शासनाचे  निर्देशाप्रमाणे होत असल्यामुळे व त्यावर मिळणारा तात्पुरता स्वरुपात अनुषंगिक खर्चही (Incidential Charges) शासनाकडून निश्चित केलेल्या दराने अभिकर्त्यास दिला जातो त्यामुळे आधारभूत किंमत खरेदी योजनेचे लेखे वार्षिक अहवालात स्वतंत्र दर्शविण्यास आलेले आहेत.

तसेच गौणवनोपज किमान आधारभूत किंमत खरेदी योजना (केंद्रशासन) या योजनेत तोटा आल्यास ७५% केंद्र शासन व २५% राज्य शासनाकडून प्रतिपूर्ती होणार असल्यामुळे या योजनेचे हिशोबपत्रके स्वतंत्र दर्शविण्यात आले आहेत.

खरिप पणन हंगाम मध्ये केंद्र शासनाच्या किंमत स्थिर योजने अंतर्गत नाफेड मार्फत हमी दराने अभिकर्ता म्हणुन महामंडळा मार्फत तुर खरेदी करण्यात आली असल्याने व नाफेड कडुन याची प्रतीपुर्ती होणार असल्याने या योजनेचे हिशोबपत्रके सुधा स्वतंत्र दर्शविण्यात आले आहेत.

**योजनानिहाय तरतूदीपूर्वी झालेला व्यापारी व निव्वळ नफा खालील प्रमाणे आहे.**

| अ. क्र | उपक्रमाचे नाव | व्यापारी नफा | व्यापारी तोटा | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|
| १ | एकाधिकार खरेदी योजना | | (-) ५१,९४,१५६.५४ | १५,४२,२७,५५८.१३ |
| | सामान्य योजना | ०.०० | (-) ६,८२,९४७.६३ | १,३३,८१६.३८ |
| | **एकूण अ** | | **(-) ५८,७७,१०४.१७** | **१५,४३,६१,३७४.५१** |
| २ | आधारभूत किंमत खरेदी योजना | ९,५१,५९,५०२.३७ | ०.०० | ४४,५७१.८२ |
| | **एकूण ब** | **९,५१,५९,५०२.३७** | **०.००** | **४४,५७१.८२** |
| ३ | **केंद्र शासन गौणवनोपज किमान आधारभुत किंमत खरेदी योजना.** | | **(-) ६,०२,१४२.०४** | **(-) ६,०२,७९१.०४** |
| ४ | **किंमत स्थिर योजना (नाफेड तुर)** | **०.००** | **०.००** | **०.००** |

Scanned with CamScanner

१) एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेत खालीलप्रमाणे तरतूदी प्रस्तावित करण्यात येत आहेत. आर्थिक वर्ष २०२०-२०२१ अखेर तरतूदी करणेचे प्रस्तावित करण्यात येत असून त्यास मान्यता मिळावी.

| अ.क्र | योजना | तपशिल | निव्वळ नफयातून तरतूदीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेतील एकत्रित झालेल्या नफयातून मुख्य कार्यालय एकाधिकार खरेदी योजनेच्या लेख्यांमध्ये घ्यावयाची तरतूद | रिझर्व्ह फंड खाते (राखीव निधी) २५% | ३,८५,९०,०००.०० |
| | | भागभांडवल विमोचन निधी | ४,५०,००,०००.०० |
| | | इमारत निधी १०% | १,५४,३६,०००.०० |
| | | वस्तू विकास निधी २०% पैकी Adhoc तरतुद | ३०,००,०००.०० |
| | | संशयित व बुडीत कर्ज निधी | ३०,००,०००.०० |
| | | कर्ज निवारण निधी | ३०,००,०००.०० |
| | | व्यापारी चढ उतार निधी | ३०,००,०००.०० |
| | | माहिती व तंत्रज्ञान निधी | ५०,००,०००.०० |
| | **एकूण तरतूदीची रक्कम** | | **११,६०,२६,०००.००** |

वरीलप्रमाणे एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेतील एकत्रित केलेल्या तरतूदीस मान्यतेनंतर शिल्लक निव्वळ नफा रु.३,८३,३५,३७४.५१ (अक्षरी रु. तीन कोटी त्र्याऐंशी लाख पस्तीस हजार तिनशे चौऱ्यात्तर रुपये व एकावन्न पैसे मात्र) येतो.

२) आधारभूत किंमत खरेदी योजनेत (PSS) खालीलप्रमाणे तरतूदी प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र | तपशिल | व्यापारी नफ्यातून तरतूदीची रक्कम | निव्वळ नफ्यातून तरतूदीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | अनुषंगिक खर्च तरतूद | ०.०० | १०,००,००,०००.०० |
| | **एकूण तरतूद** | **०.००** | **१०,००,००,०००.००** |

Scanned with CamScanner

३) किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेत (MSP MFP) खालीलप्रमाणे तरतूदी प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र | तपशिल | व्यापारी नफ्यातून तरतूदीची रक्कम | निव्वळ नफ्यातून तरतूदीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | अनुषंगिक खर्च तरतूद | ०.०० | ०.०० |
| | **एकूण तरतूद** | **०.००** | **०.००** |

४) किंमत स्थिर योजना (नाफेड तुर) (NAFED) खरेदी योजनेत खालीलप्रमाणे तरतूदी प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र | तपशिल | व्यापारी नफ्यातून तरतूदीची रक्कम | निव्वळ नफ्यातून तरतूदीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | अनुषंगिक खर्च तरतूद | ०.०० | ०.०० |
| | **एकूण तरतूद** | **०.००** | **०.००** |

५) खावटी कर्ज वाटप योजना व न्युक्लियस बजेट कर्ज वाटप योजनेचा समवर्तक निधी व कर्ज येणे तपशिल खालीलप्रमाणे :

(रु.कोटीत)

| अ.क्र | योजना | समवर्तक निधी | कर्ज येणे |
|---|---|---|---|
| १ | खावटी कर्ज योजना | ४.९७ | निरंक |
| २ | न्युक्लियस बजेट योजना | २.०९ | ४.९७ |

Scanned with CamScanner

उपरोक्तप्रमाणे सन २०२०-२०२१ चे हिशोबपत्रकात प्रस्तावित तरतूदी घेण्यास मान्यता मिळावी. वरीलप्रमाणे तरतूदीनंतर शिल्लक नफा खालीलप्रमाणे :

| अ.क्र | योजना | शिल्लक नफा / तोटा |
|---|---|---|
| १ | एकाधिकार गौणवनोपज व सामान्य योजना | ३,८३,३५,३७४.५१ |
| २ | आधारभूत किंमत खरेदी योजना | ४४,५७१.८२ |
| ३ | किमान आधारभूत किंमत खरेदी योजना (MSP MFP) निव्वळ तोटा | (-)६,०२,७९१.०४ |
| ४ | किंमत स्थिर योजना (नाफेड तुर) (NAFED) | ०.०० |
| | **एकुण नफा** | **३,७७,७७,१५५.२९** |

योजनानिहाय व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व ३१.०३.२०२१ अखेरचे ताळेबंद पत्रक ४८ व्या वार्षिक अहवालात समाविष्ट आहे.

Scanned with CamScanner

एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेच्या एकत्रित व्यापारी व नफा तोटा पत्रकानुसार गोषवारा खालीलप्रमाणे : (रु.कोटीत)

| आरंभीसाठा, खरेदी खर्च व नफा | रक्कम | विक्री शिल्लकसाठा व उत्पन्न | रक्कम |
|---|---|---|---|
| आरंभीसाठा | १४.५३ | विक्री | १.५७ |
| खरेदी | ०.०४ | इतर उत्पन्न | २०.०१ |
| व्यापारी खर्च | १.१९ | व्यवस्थापकीय अनुदान | ३०.६७ |
| व्यवस्थापकीय खर्च | ३०.६८ | शिल्लकसाठा | १३.७९ |
| अर्जित रजा / ७ वा वेतन तरतुद | ३.०० | | |
| घसारा (नियमीत) | १.१७ | | |
| तरतूदीपूर्वी नफा | १५.४३ | | |
| **एकूण** | **६६.०४** | **एकूण** | **६६.०४** |
| तरतूदी | ११.६० | | |
| निव्वळ नफा | ३.८३ | | |
| **एकूण** | **१५.४३** | | |

एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेचे एकत्रित हिशोबपत्रकानुसार महामंडळास आर्थिक वर्षात निव्वळ नफा रु.१५.४३ कोटी झालेला आहे. त्यामधून रु.११.६० कोटीच्या तरतूदी केल्यानंतर शिल्लक नफा रु.३.८३ कोटी आहे.

उपरोक्तप्रमाणे सादर केलेल्या आर्थिक वर्ष २०२०-२०२१ चा वार्षिक अहवाल, व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व ३१.०३.२०२१ अखेरचे ताळेबंद मंजूरी करीता सादर करण्यात येत आहे, त्यास मंजूरी मिळावी.

उपरोक्तप्रमाणे सादर केलेल्या आर्थिक वर्ष २०२०-२०२१ चा वार्षिक अहवाल, व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व ३१.०३.२०२१ अखेरचे ताळेबंद मंजूरी करीता सादर करण्यात येत आहे, त्यास मंजूरी

Scanned with CamScanner

मिळावी, असे सविस्तर वाचन महाव्यवस्थापक (वित्त) यांनी केले. सदर विषयावर सविस्तर चर्चा होवुन खालील प्रमाणे ठराव बहुमताने मंजुर करण्यात आला.

**ठराव क्रमांक ३ :** सर्वानुमते ठराव समंत करण्यात येतो की, दि.३१/०३/२०२१ अखरेचे महामंडळ राबवित असलेल्या सर्व योजनांचे वार्षिक हिशोब पत्रके व सन २०२०-२०२१ च्या ४८ वा वार्षिक अहवाल , व्यापारी पत्रक , नफा-तोटा पत्रक व दि.३१/०३/२०२१ रोजीचा ताळेबंदास सदर सभा मंजुरी देत आहे.

**सुचक** : मा श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग

**अनुमोदक** : मा श्री. मधुकर निबाजी काठे

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक ०४ : सन २०२१-२०२२ या वर्षाचा मंजूर अर्थसंकल्पित निधी व सन २०२२-२०२३ च्या वार्षिक अंदाजपत्रकाला मान्यता देणे बाबत.**

केंद्र व राज्य शासनाकडुन महामंडळास भागभांडवल,अनूदान व अर्थसहाय्य प्राप्त होते. आर्थिक वर्ष २०२०-२०२१ व २०२१-२०२२ मधील लेखाशिर्षनिहाय योजनेतंर्गत व योजनेत्तर मागणी अर्थसंकल्पित व प्रत्यक्ष प्राप्तचा तपशिलानुसार आर्थिक वर्ष २०२२-२०२३ मधील मागणीचे अंदाजपत्रक खालील प्रमाणे सादर करणेत येत आहे.

| लेखाशिर्षक | वर्ष २०२०-२०२१ | | | वर्ष २०२१-२०२२ | | | २०२२-२३ अंदाज पत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागणी | अर्थसंकल्पित | प्रत्यक्ष | मागणी | अर्थसंकल्पित | प्रत्यक्ष | |
| **राज्य शासन :** | | | | | | | |
| भागभांडवल (४४२५ ०४७२) | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| सहाय्यक अनुदान (२४२५ ०८५३) | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| खावटी कर्ज (२४२५ १४९३) | ०.०० | ०.०० | ०.०० | २५५.०० | २५५.०० | २५५.०० | ०.०० |
| गौणवनोपज (MSP) २५% (२४२५ २४२६) | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **एकुण** | **०.००** | **०.००** | **०.००** | **२५५.००** | **२५५.००** | **२५५.००** | **०.००** |
| **केंद्रशासन :** | | | | | | | |
| गौणवनोपज (वि.कें.अ.) (२४२५ ०८६२) | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| गौणवनोपज (MSP) ७५% (२४२५ २४२६) | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **एकूण** | **०.००** | **०.००** | **०.००** | **०.००** | **०.००** | **०.००** | **०.००** |
| **एकूणांत** | **०.००** | **०.००** | **०.००** | **२५५.००** | **२५५.००** | **२५५.००** | **०.००** |

Scanned with CamScanner

| राज्य शासन | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| व्यवस्थापकीय अनुदान (२४२५ ०८५३) | २९२३.०७ | २२८०.६९ | २२८०.६९ | ३४००.०० | २५००.०० | ९२५.०० (apr.२१ to Aug२१) | ३४००.०० |
| **एकूण:** | **२९२३.०७** | **२२८०.६९** | **२२८०.६९** | **३४००.००** | **२५००.००** | **९२५.००** | **३४००.००** |
| **एकूणांत :** | **२९२३.०७** | **२२८०.६९** | **२२८०.६९** | **३६५५.००** | **२७५५.००** | **११८०.००** | **३४००.००** |

उपरोक्त प्रमाणे वर्ष २०२१-२०२२ मधील योजनेतंर्गत एकूण **रु.३६५५.००** लक्ष अंदाजपत्रकास व सन २०२२-२०२३ चे रु.३४००.०० लक्ष अंदाजपत्रकास मान्यतेस सादर.

उपरोक्त प्रमाणे वर्ष २०२२-२०२३ मधील योजनेतंर्गत एकूण **रु.३४००.००** लक्ष अंदाजपत्रकास मान्यता मिळणेसाठी सादर. सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रकासाठी वरील प्रमाणे सादर करणेत येत आहे. असे सविस्तर वाचन महाव्यवस्थापक (वित्त) यांनी केले. सदर विषयावर सविस्तर चर्चा होवुन खालील प्रमाणे ठराव बहुमताने मंजुर करण्यात आला.

**ठराव क्र.०४** : सर्वानुमते ठराव समंत करण्यात येतो की, सन २०२१-२०२२ या वर्षाच्या मंजुर अर्थसंकल्पित निधी व सन २०२२-२०२३ च्या वार्षिक अंदाजपत्रकास सदर सभा मान्यता देत आहे. यासंबधीचे पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** : मा श्री. धनराज हरिभाऊ महाले.
**अनुमोदक** : मा श्रीमती. मिनाक्षी अर्जुनराव वट्टी.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक ०५ : सन २०२१-२०२२ वर्षासाठी लेखापरिक्षकाची नेमणुक करणे व लेखापरिक्षक शुल्क निश्चित बाबत.**

सहकार कायदा १९६० च्या ९७ व्या घटना दुरुस्तीतील अनुच्छेद २४३ झेड एम व महाराष्ट्र शासन अध्यादेश दि.१४.०२.२०१३ ला अनुसरुन कलम ८१ मधील सुधारणा शासन पत्र क्र. सगृयो-२०१३/३८९/प्र.क्र.५५/१४-स, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई दि.०४.०३.२०१३ अनुसार तसेच सहकार कायदा १९६० चे कलम ७५ (२अ) नुसार "प्रत्येक संस्था आपल्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत, राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामिकेमधुन, कलम ८१ मध्ये निर्धारीत केल्याप्रमाणे लेखापरिक्षकाची किंवा लेखापरिक्षण करणाऱ्या संस्थेची चालु वित्तीय वर्षासाठी नेमणुक करायची आहे.

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाचे शासन निर्णय क्र.सगृयो-२०१२/मुमंस१७/प्र.क्र.३६/१४-स मंत्रालय, मुंबई दि. २९/१०/२०१४ व क्र.सगृयो-२०१२/मुमंस१७/प्र.क्र.३६/१४-स मंत्रालय, मुंबई दि. २९/१०/२०१४ मधील अ.क्र. १० मध्ये म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक चे शुल्क खालील प्रमाणे नमुद आहे.

| Sr. No. | Type of Society | As per new notification | | |
|---|---|---|---|---|
| | | Scale of Fees | | |
| | | Details of Parameters | Amount as per Parameters | Maximum amount limit |
| १० | Maharashtra State co-operative Tribal Development Corporation Ltd. | Procurement & Processing of per quintle | | २५००००० |
| a | For Government Procurement | | ०.५० | |
| b | For Service Supply | Per unit | १०००० | |
| c | In liquidation | | | २०००० |

Scanned with CamScanner

उपरोक्त शासन निर्णयाला मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद यांचे दि.०२/०५/२०१६ च्या निकाला नुसार स्थगिती (Stayed) आहे.

महामंडळाचे सन २०२१-२०२२ महामंडळाचे आर्थिक वर्षाचे सतत व समवर्तक (Current & Con-Current) पध्दतीने संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता नाशिक, पालघर, ठाणे, पुणे, नंदुरबार, धुळे, आमरावती, यवतमाळ, नागपुर, भंडारा, गडचिरोली, चंद्रपुर, औरंगाबाद, अ.नगर येथिल विषेश लेखापरिक्षक, सहकारी संस्था, वर्ग-१, यांना पत्र क्र. जा. क्र. आविम / लेखापहरीक्षण / २०२१-२०२२/ १७४९ / २०२१. नाशिक-२ दि.१०/०९/२०२१ नुसार सन २०२१-२०२२ चे संवैधानिक लेखापरीक्षण करेणे बाबत पत्र देण्यात आले होते. करीता इच्छुक विषेश लेखापरीक्षक, सहकारी संस्था यांना आपले अर्ज / संमत्ती पत्र या कार्यालयस दि.१४/०९/२०२१ पुर्वी पठवणे बाबत सुचित केले होते. करीता दि.१६/०९/२०२१ अखेर विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, वर्ग-१ यांचा अर्ज / संमत्ती पत्र प्राप्त झालेले नाहीत.

सन २०२१-२०२२ महामंडळाचे आर्थिक वर्षाचे सतत व समवर्तक (Current & Con-Current) पध्दतीने संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता दि.१६/०९/२०२१ अखेर खालील प्रमाणे सनदी लेखापाल व सनदी लेखापाल संस्था यांचे अर्ज प्राप्त झालेले आहे.

| अ. क्र. | सहकार पॅनल क्र. | लेखापरीक्षकाचे नाव | सहकार पॅनल वर्ग |
|---|---|---|---|
| १ | १०२६९ | मे. बॉटली बॉय ॲण्ड पुरोहीत, मुंबई. | अ-१ |
| २ | १७८२७ | ए. एस. के. वाय. ॲण्ड कंपनी, पुणे. | अ-१ |
| ३ | १४३५३ | वामु ॲण्ड असोसिएट, पुणे. | अ-१ |
| ४ | १४३७२ | मंत्री मालु ॲण्ड असोसिएट, पुणे | अ-१ |
| ५ | १७४२५ | धोंगडेपाटील गोधानी अँड कंपनी, नाशिक | अ-१ |
| ६ | १४२०२ | के.पी.एन. ॲण्ड कंपनी, नाशिक | अ-१ |
| ७ | १६९२९ | के.डी.एन. ॲण्ड असोसिएट, नागपुर | अ-१ |
| ८ | १४६२४ | पी.व्हि.आर.एस. ॲण्ड असोसिएट, नागपुर | अ-१ |

उपरोक्त तपशिला प्रमाणे सदर संस्था हया सन २०२१-२०२२ संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता इच्छुक आहे याबाबत तपशिल खालिल प्रमाणे.

Scanned with CamScanner

चदि.२९/१०/२०१४ च्या शासन निर्णयातील अट क्र.२(२) एक लेखापरीक्षक एकाच संस्थेचे सलग तीन वर्षापेक्षा जास्त मुदती साठी लेखापरीक्षण करु शकत नाही.छ असे नमुद आहे. यापुर्वी ज्या सनदी लेखापाल फर्मने लेखापरिक्षण केले आहे त्याच्या तपशिल शेरा रकान्यात नमुद केला आहे.

प्राप्त झालेल्या सनदी लेखापालांचा अर्जाचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखापरीक्षकाचे नाव | पॅनल क्र. | सहकार पॅनल वर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे. बॉटली बॉय ॲण्ड पुरोहीत, मुंबई. | १०२६९ | अ-१ | यापुर्वी लेखापरीक्षण केलेले नाही. |
| २ | ए. एस. के. वाय. ॲण्ड कंपनी, पुणे. | १७८२७ | अ-१ | सन २०१८-२०१९ व सन २०२०-२०२१ |
| ३ | वामु ॲण्ड असोसिएट, पुणे. | १४३५३ | अ-१ | सन २०१५-२०१६, २०१६-२०१७ व २०१७-२०१८. |
| ४ | मंत्री मालु ॲण्ड असोसिएट, पुणे | १४३७२ | अ-१ | यापुर्वी लेखापरीक्षण केलेले नाही. |
| ५ | धोंगडेपाटील गोधानी अँड कंपनी, नाशिक | १७४२५ | अ-१ | सन २०१९-२०२०. |
| ६ | के. पी. एन. ॲण्ड कंपनी, नाशिक | १४२०२ | अ-१ | यापुर्वी लेखापरीक्षण केलेले नाही. |
| ७ | के.डी.एन. अँण्ड असोसिएट, नागपुर | १६९२९ | अ-१ | यापुर्वी लेखापरीक्षण केलेले नाही. |
| ८ | पी.व्हि.आर.एस. अँण्ड असोसिएट, नागपुर | १४६२४ | अ-१ | यापुर्वी लेखापरीक्षण केलेले नाही. |

करीता महामंडळाचे उपरोक्त क्र.१ व ८ पैकी एका सनदी लेखापरीक्षकाची सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करण्याकरीता लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करणे व लेखापरिक्षण शुल्क ठरविण्याचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास सादर.

Scanned with CamScanner

करीता महामंडळाचे उपरोक्त क्र.१ व ८ पैकी एका सनदी लेखापरीक्षकाची सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करण्याकरीता लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करणे व लेखापरिक्षण शुल्क ठरविण्याचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास सादर.

सदरचा विषय महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सभे समोर सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्रमांक ०५ :** सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, सन २०२१-२०२२ या वर्षाचे लेखापरीक्षण करणेकामी ए. एस के वाघ ॲण्ड कंपनी, पुणे सनदी लेखापाल, पुणे यांची नियुक्ती करणे व नियमा नुसार लेखापरीक्षण फी निश्चित करण्या करीता, वार्षिक सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येत आहे.

**सुचक** : मा.श्री.केवलराम तुळशीराम काळे.
**अनुमोदक** : मा.श्री. प्रकाश तुळशीराम दडमल.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ०६ : दिनांक ०१/०३/२०२१ ते दिनांक ३१/०८/२०२१ या कालावधीत महामंडळाने केलेली गुंतवणूक / फेर गुंतवणूक याचा अहवाल सादर करणे बाबत.**

दिनांक ०६.०५.२००६ रोजीच्या संचालक मंडळ सभेतील ठराव क्रमांक १० नुसार महामंडळाकडून करण्यात येणा-या एक वर्षापर्यंतचे गुंतवणूकीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करण्यात आलेले असुन,केलेल्या गुंतवणूकीच्या कार्यवाहीचा अहवाल संचालक मंडळापुढे सादर करावयाचा आहे. महामंडळ राबवित असलेल्या योजनेतील निधीची उपलब्धता पाहुन रक्कमा गुंतवणूक केल्या जातात.

संचालक मंडळ सभा दिनांक १२/०३/२०२१ चे विषय क्रमांक ०४ मध्ये दिनांक ०१/१२/२०२० ते दिनांक २८/०२/२०२१ पर्यत गुंतवणुक अहवाल पुढील संचालक मंडळ सभेत ठेवण्यात यावा करीता त्यापुढील दिनांक ०१/०३/२०२१ ते ३१/०८/२०२१ पर्यत गुंतवणूकीच्या कार्यवाही अहवालचा तपशील खालील प्रमाणे :

Scanned with CamScanner

दिनांक ०१/१२/२०२० ते दिनांक २८/०२/२०२१

| अ. क्र. | बँकेचे नाव | गुंतवणूक तारीख | मुदत | व्याज दर % | मुदत ठेव रक्कम | योजना |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बँक ऑफ इंडिया | ०६.०१.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | ३३५५३५९ | कर्मचारी कल्याण निधी |
| २ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | ०८.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२० | ४३९४४७३ | कर्मचारी कल्याण निधी |
| एकुण | | | | | ७७४९८३२ | |
| १ | पंजाब अँण्ड सिंध बँक | ०३.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १३४६६९६७ | एकाधिकार खरेदी योजना |
| २ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०३.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९००००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ३ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०३.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९००००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ४ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०४.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९००००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ५ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०४.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९००००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ६ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०४.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९००००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ७ | पंजाब अँण्ड सिंध बँक | ०४.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १४८७७८४५ | एकाधिकार खरेदी योजना |
| ८ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०८.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९०००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ९ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०८.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९०००० | एकाधिकार खरेदी योजना |
| १० | युनियन बँक ऑफ इंडिया | ०८.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९०००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ११ | पंजाब अँण्ड सिंध बँक | ०८.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९०००० | एकाधिकार खरेदी योजना |
| १२ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०८.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९०००० | एकाधिकार खरेदी योजना |
| १३ | बँक ऑफ इंडिया | ०८.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९०००० | एकाधिकार खरेदी योजना |
| १४ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०९.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९०००० | एकाधिकार खरेदी योजना |
| १५ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०९.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९०००० | एकाधिकार खरेदी योजना |
| १६ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०९.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९०००० | एकाधिकार खरेदी योजना |
| १७ | पंजाब अँण्ड सिंध बँक | ०९.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १००९०००० | एकाधिकार खरेदी योजना |
| एकुण | | | | | ३१७८४४८१२ | |

Scanned with CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १८ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०८/०२/२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९९९९ | किमान आधारभूत खरेदी योजना (गौणवनोपज) |
| | एकुण | | | | १९९९९९९९ | |
| १९ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०२.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९९९९ | गौणवनोपज योजना |
| २० | युनियन बँक ऑफ इंडिया | ०२.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९९९९ | गौणवनोपज योजना |
| २१ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०२.०२.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९९९९ | गौणवनोपज योजना |
| | एकुण | | | | ५९९९९९९७ | |
| | एकुणांत | | | | ४०५५९४६४० | |

**दि.०१/०३/२०२१ ते ३१/०८/२०२१**

| अ. क्र. | बँकेचे नाव | गुंतवणूक तारीख | मुदत | व्याज दर % | मुदत ठेव रक्कम | योजना |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बँक ऑफ इंडिया | २२.०४.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९००००० | एकाधिकार खरेदी योजना |
| २ | कॉर्पोरेशन/ बँक ऑफ इंडिया | २२.०४.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९००००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ३ | पंजाब अँण्ड सिंध बँक | २२.०४.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९००००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ४ | बँक ऑफ इंडिया | १८.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ५ | युनियन बँक ऑफ इंडिया | १८.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ६ | युनियन बँक ऑफ इंडिया | १८.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ७ | युनियन बँक ऑफ इंडिया | १८.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ८ | युनियन बँक ऑफ इंडिया | १८.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ९ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | ३०.०६.२०२१ | १ वर्ष | ५.३० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| १० | युनियन बँक ऑफ इंडिया | ३०.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ११ | बँक ऑफ इंडिया | २८.०७.२०२१ | १ वर्ष | ५.१० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| १२ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | २८.०७.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| १३ | बँक ऑफ इंडिया | २९.०७.२०२१ | १ वर्ष | ५.१० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| १४ | पंजाब सिंध बँक | २९.०७.२०२१ | १ वर्ष | ५.१५ | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |

Scanned with CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १५ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | २९.०७.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| १६ | बँक ऑफ इंडिया | ३०.०७.२०२१ | १ वर्ष | ५.१० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| १७ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | ३०.०७.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| १८ | पंजाब सिंध बँक | ३०.०७.२०२१ | १ वर्ष | ५.१५ | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| १९ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | ०२.०८.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| २० | पंजाब सिंध बँक | ०२.०८.२०२१ | १ वर्ष | ५.१५ | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| २१ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | ०३.०८.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| २२ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | ०४.०८.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| २३ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | ०५.०८.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| २४ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | ०६.०८.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| २५ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | ०९.०८.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| २६ | पंजाब सिंध बँक | ०९.०८.२०२१ | १ वर्ष | ५.१५ | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| २७ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | १०.०८.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| २८ | पंजाब सिंध बँक | १०.०८.२०२१ | १ वर्ष | ५.१५ | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| २९ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | २४.०८.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ३० | पंजाब सिंध बँक | २४.०८.२०२१ | १ वर्ष | ५.१५ | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ३१ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | २५.०८.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ३२ | पंजाब सिंध बँक | २५.०८.२०२१ | १ वर्ष | ५.१५ | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ३३ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | २६.०८.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ३४ | पंजाब सिंध बँक | २६.०८.२०२१ | १ वर्ष | ५.१५ | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ३५ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | २७.०८.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| ३६ | पंजाब सिंध बँक | २७.०८.२०२१ | १ वर्ष | ५.१५ | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| **एकुण** | | | | | **७१९९६७०००** | |
| १ | युनियन बँक ऑफ इंडिया | २१.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |

Scanned with CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | युनियन बँक ऑफ इंडिया | २१.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| ३ | युनियन बँक ऑफ इंडिया | २१.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| ४ | युनियन बँक ऑफ इंडिया | २१.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| ५ | युनियन बँक ऑफ इंडिया | २१.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| ६ | बँक ऑफ इंडिया | २१.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| ७ | युनियन बँक ऑफ इंडिया | २२.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| ८ | युनियन बँक ऑफ इंडिया | २२.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| ९ | युनियन बँक ऑफ इंडिया | २२.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| १० | बँक ऑफ इंडिया | २२.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| ११ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| १२ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| १३ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| १४ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| १५ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| १६ | बँक ऑफ इंडिया | २३.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| १७ | युनियन बँक ऑफ इंडिया | २८.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| १८ | युनियन बँक ऑफ इंडिया | २८.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| १९ | युनियन बँक ऑफ इंडिया | २८.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| २० | युनियन बँक ऑफ इंडिया | ३०.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| २१ | युनियन बँक ऑफ इंडिया | ३०.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| २२ | युनियन बँक ऑफ इंडिया | ३०.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| २३ | बँक ऑफ इंडिया | ३०.०६.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| २४ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०७.०७.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | ११७०००० | सामान्य योजना |
| २५ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | ०७.०७.२०२१ | १ वर्ष | ५.३० | १९९९९००० | सामान्य योजना |

Scanned with CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २६ | पंजाब सिंध बँक | ०३.०८.२०२१ | १ वर्ष | ५.१५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| २७ | पंजाब सिंध बँक | ०४.०८.२०२१ | १ वर्ष | ५.१५ | १९९९९००० | सामान्य योजना |
| २८ | पंजाब सिंध बँक | ०५.०८.२०२१ | १ वर्ष | ५.१५ | ५५०२००० | सामान्य योजना |
| | **एकुण** | | | | **५२६६४६०००** | |
| १ | युनियन बँक ऑफ इंडिया | १६.०४.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९९९९ | एकाधिकार खरेदी योजना (गौणवनोपज योजना) |
| २ | युनियन बँक ऑफ इंडिया | १६.०४.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९९९९ | |
| ३ | युनियन बँक ऑफ इंडिया | १६.०४.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९९९९ | एकाधिकार खरेदी योजना (गौणवनोपज योजना) |
| ४ | युनियन बँक ऑफ इंडिया | १६.०४.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९९९९ | |
| ५ | युनियन बँक ऑफ इंडिया | १६.०४.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९९९९ | एकाधिकार खरेदी योजना (गौणवनोपज योजना) |
| ६ | बँक ऑफ इंडिया | १९.०४.२०२१ | १ वर्ष | ५.२५ | १९९९९९९९ | |
| | **एकुण** | | | | **११९९९९९९४** | |
| १ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०६.०७.२०२१ | ९१ दिवस | ४.२५ | १९९९९९९० | खावटी कर्ज योजना |
| २ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०६.०७.२०२१ | ९१ दिवस | ४.२५ | १९९९९९९० | खावटी कर्ज योजना |
| ३ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०६.०७.२०२१ | | ४.२५ | १९९९९९९० | खावटी कर्ज योजना |
| ४ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०६.०७.२०२१ | | ४.२५ | १५००००३० | खावटी कर्ज योजना |
| | **एकुण** | | | | **७५००००००** | |
| | **एकुणांत** | | | | **१४४१३१२९९४** | |

माहितीस्तव व अवलोकनार्थ मंजुरीस्तव सादर.

वरील प्रमाणे महाव्यवस्थापक (वित्त) यांनी संचालक मंडळ सभा दि.१२/०३/२०२१ रोजीचे विषय क्र.०४ च्या ठराव क्र.०४ नुसार दि.०१/१२/२०२० ते दि.२८/०२/२०२१ गुतवणुक / फेर गुंतवणुक व दि.०१/०३/२०२१ ते दि.३१/०८/२०२१ या कालावधीत महामंडळाने केलेली राष्ट्रीयकृत बँकेतील गुंतवणुक / फेर गुंतवणुक माहिती सादर केली सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालिल प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्रमांक ०६ :** सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, दिनांक ०१/१२/२०२० ते दिनांक २८/०२/२०२१ व दिनांक ०१/०३/२०२१ ते दिनांक ३१/०८/२०२१ या कालावधीत महामंडळाने मुख्य कार्यालय स्तरावरुन राष्ट्रीयकृत बँकेत केलल्या

Scanned with CamScanner

गुंतवणुकीस / फेर गुंतवणुकीस सदर सभा मान्यता देण्यात येत आहे. व सदर गुंतवणुकीची ही सभा नोंद घेत आहे.

सुचक : मा श्री. अशोक भाऊराव मंगाम.

अनुमोदक : मा श्री. भरतलाल दुधनाग.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्रमांक ०७ : हंगाम २०२१-२०२२ करीता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे आधारभुत किंमत खरेदी योजना धान व भरडधान मालाच्या हुंडया चालु खाते क्र.१०७६३/१, १०७६३/१२ व १०७६३/१३ वर वटविणे बाबत.**

महाराष्ट्र शासनाने अन्न व नागरी पुरवठा विभागाचे मुख्य अभिकर्ता म्हणुन आधारभुत किंमत खरेदी योजना हंगाम २०००-२००१ पासुन महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे.

शासनाचे निर्देश प्राप्त झाल्यास हंगाम २०२१-२०२२ मध्येही आधारभुत किंमत खरेदी योजना महामंडळास राबवावी लागणार आहे.

अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे कडुन हंगामात प्राप्त होणारा अग्रीम व खरेदी केलेल्या मालाचे साप्ताहीक विवरण (ज्या विवरणावर संबधित जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असते) सादर केल्यानंतर प्राप्त होणारी १००% खरेदी किंमत तसेच धान व भरडधान्यावरील अनुषंगिक खर्च तसेच धान व भरडधान्याची उर्वरीत किंमत सदर खात्यात भरणा केली जाते. यातुन हंगामात खरेदी केलेल्या धान व भरडधानाच्या हुंडया वटविण्यात येतात.

महामंडळाने खालील प्रमाणे हंगाम निहाय हुंडया वटविण्यासाठी खाते उघडेलेले आहे.

| अ.क्र. | हंगाम | खाते क्रमाक | शेरा |
|---|---|---|---|
| १. | २०००-०१ ते २०१४-१५ | १०७६३/०१ | |
| २. | २०१५-१६ | १०७६३/१२ | |
| ३. | २०१६-१७ | १०७६३/१३ | |

वरील खातेवर मागील वर्षी प्रमाणे यापुढेही बँक खाते चालु ठेवण्यास व त्या खात्यावर व्यवहार करण्यास मान्यता मिळणेबाबत संचालक मंडळ मान्यतेस सादर तथा हंगाम २०२१-२०२२ (दि.०१/१०/२०२१ ते दि.३१/०३/२०२२) व आर्थिक वर्ष २०२१-२२ (दि.०१/०४/२०२२ ते दि.३०/०९/२०२३) मधील आधारभुत किंमत खरेदी मालाच्या हुंडया खाते क्र.१०७६३/१३ वर वटविणेकरीता संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

Scanned with CamScanner

**ठराव क्रमांक ०७ :** सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, वरील खातेवर मागील वर्षी प्रमाणे यापुढेही बँक खाते चालु ठेवण्यास व त्या खात्यावर व्यवहार करण्यास तथा हंगाम २०२१-२०२२ (दि.०१/१०/२०२१ ते दि.३१/०३/२०२२) व आर्थिक वर्ष २०२१-२२ (दि.०१/०४/२०२२ ते दि.३०/०९/२०२३) मधील आधारभुत किंमत खरेदी मालाच्या हुंडया खाते क्र.१०७६३/१३ वर वटविणेकरीता संचालक मंडळ मान्यता देत आहे.

**सुचक** : मा.श्रीमती. ताराबाई शंकर माळेकर.
**अनुमोदक** : मा.श्री. विठ्ठल देवराम देशमुख.
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ०८ : केंद्र शासनाच्या किमान आधारभुत गौणवनोपज खरेदी योजनाच्या (MSP MFP) हुंडया महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे स्वतंत्र खाते क्र.१०७६३/१४ वर वटविणे बाबत.**

भारत सरकार जनजाती कार्य मंत्रालय यांचे पत्र क्र.२/२१/२०१३-CP&R दि.२४.०३.२०१४ अन्वये गौणवनोपज आधारभुत किंमत (M.S.P.- Minimum Support Price) माध्यमातुन गौणवनोपज M.F.P. विपणन आणि मुल्य साखळी विकास यंत्रणेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडुन ७५% हिस्सापोटी रु.८,२५,००,०००/- व राज्य शासनाच्या २५% हिस्सापोटी रु. १,३३,८३,७५०/- असा एकुण निधी रु. ९,५८,८३,७५०/- महामंडळाला सन २०१४-१५ पर्यंत प्राप्त झाला आहे.

सदरची योजना अंमलबजावणीकरीता महामंडळाकडे पुरेसा निधी उपलब्ध असल्याने कर्जाद्वारे स्वतंत्र निधी उभारण्याची आवश्यकता नाही. हंगाम २०२०-२०२१ मध्ये किमान आधारभुत गौणवनोपज खरेदी योजनाच्या हुंडया महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथील स्वतंत्र चालु खाते क्रमांक २०६३२/१४ वर वटवण्यात आल्या आहेत.

करीता आर्थिक वर्ष २०२१-२०२२ (दि.०१/१०/२०२१ ते दि.३१/०३/२०२२) व आर्थिक वर्ष २०२१-२२ (दि.०१/०४/२०२२ ते दि.३०/०९/२०२३) मध्ये गौणवनोपज आधारभुत किंमत खरेदी योजनाच्या मालाच्या हुंडया महामंडळाकडील उपलब्ध निधीतुन महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., प्रादेशिक कार्यालय येथे स्वतंत्र चालु खाते क्र.२०६३२/१४ वर वटविण्याचे मान्यतेस सादर व त्याखात्यावर व्यवहार करण्यास मान्यता मिळावी.

तथापी सदर योजना राबविण्यासाठी इतर बँके कडुन कोणताही खर्च न घेता संगणक आज्ञावली (Software) खरेदी करीता तयार करुन दिले तर बँकेत नवीन खाते उघडुन नवीन खात्यावर हुंडया वटविण्याचे मान्यतेस सादर.

Scanned with CamScanner

**ठराव क्रमांक ०८ :** सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, केंद्र शासनाच्या किमान आधारभुत गौणवनोपज खरेदी योजनाच्या (MSP MFP) हुंडया महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे स्वतंत्र खाते क्र.१०७६३/१४ वर वटविणे बाबत संचालक मंडळ मान्यता देत आहे.

**सुचक** : मा.श्री. अशोक भाऊराव मंगाम.
**अनुमोदक** : मा.श्री. विकास दुलाजी वळवी.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ०९ : महामंडळाचा गौणवनोपज योजनेचे एच्छिक खरेदीच्या हुंडया महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे स्वतंत्र खाते क्र.१०७६३/११ वर वटविणे बाबत.**

एकाधिकार खरेदी योजना अंतर्गत गौणवनोपज योजनेचे एच्छिक खरेदी करीता महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाकडे रु.२६/- कोटी एवढा निधी उपलब्ध आहे. हंगाम २०२१-२०२२ मधील एकाधिकार खरेदी योजनेअंतर्गत गौणवनोपज खरेदी करीता पुरेसा निधी उपलब्ध आहे.

हंगाम २०२०-२०२१ मध्ये एकाधिकार खरेदी योजना अंतर्गत गौणवनोपज योजनेचे एच्छिक खरेदी मालाच्या हुंडया महामंडळाकडील उपलब्ध निधीतुन महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथील चालु खाते क्रमांक १०७६३/११ वर हंगाम २०२०-२०२१ मध्ये खरेदी निरंक असल्याने हुंडया वटविण्यात आलेल्या नाही. सदर योजनेसाठी कर्जाद्वारे स्वतंत्र निधी उभारण्याची आवश्यकता भासलेली नाही. त्यामुळे कर्जावरील व्याजाची बचत झालेली आहे.

करीता हंगाम २०२१-२०२२ मध्ये खरेदी झाल्यास, आर्थिक वर्ष २०२१-२०२२ (दि.०१/१०/२०२१ ते दि.३१/०३/२०२२) व आर्थिक वर्ष २०२२-२३ (दि.०१/०४/२०२२ ते दि.३०/०९/२०२२) मधील एकाधिकार खरेदी योजना अंतर्गत गौणवनोपज योजनेचे एच्छिक खरेदीच्या हुंडया वटविणेकरीता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथील चालु खाते क्र.१०७६३/११ यापुढेही चालु ठेवण्यास व त्या खात्यावर व्यवहार करण्यास मान्यता मिळणेबाबत संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

तथापी सदर योजना राबविण्यासाठी इतर बँके कडुन कोणताही खर्च न घेता संगणक आज्ञावली (Software) खरेदी करीता तयार करुन दिले तर बँकेत नवीन खाते उघडुन नवीन खात्यावर हुंडया वटविण्याचे मान्यतेस सादर.

**ठराव क्रमांक ०९** : सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, महामंडळाचा गौणवनोपज योजनेचे एच्छिक खरेदीच्या हुंडया महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे स्वतंत्र खाते क्र.१०७६३/११ वर वटविणे बाबत संचालक मंडळ मान्यता देत आहे.

**सुचक** : मा.श्री. धनराज हरिभाऊ महाले.
**अनुमोदक** : मा.श्री. केवलराम तुळशीराम काळे.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक १० : आधारभुत किंमत खरेदी योजनेचे हंगाम २०२१-२०२२ मध्ये होणाऱ्या खरेदी करीता ICICI Bank, नाशिक येथिल मुख्य कार्यालय खाते क्र.००२७०५०१४८५५ व प्रादेशिक कार्यालयाचे खात्यावर हुंडया वटविणे बाबत.**

महाराष्ट्र शासनाने अन्न व नागरी पुरवठा विभागाचे मुख्य अभिकर्ता म्हणुन आधारभुत किंमत खरेदी योजना हंगाम २०००-२००१ पासुन महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे.

शासनाचे निर्देश प्राप्त झाल्यास हंगाम २०२१-२०२२ मध्येही आधारभुत किंमत खरेदी योजना महामंडळा मार्फत राबवीण्यात करीता,

अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे कडुन हंगामात प्राप्त होणारा अग्रीम व खरेदी केलेल्या मालाचे साप्ताहीक विवरण (ज्या विवरणावर संबधित जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असते) सादर केल्यानंतर प्राप्त होणारी १००% खरेदी किंमत तसेच धान व भरडधान्यावरील अनुषंगिक खर्च तसेच धान व भरडधान्याची उर्वरीत किंमत सदर खात्यात भरणा केली जाते. यातुन हंगामात खरेदी केलेल्या धान व भरडधानाच्या हुंडया वटविण्यात येतात.

मगील हंगाम २०२०-२०२१ मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजनेमध्ये शेतकऱ्याची धान खरेदीची अदायगी शासन नियुक्त एन.ई.एम.एल.(NeML) यांचे संगणक अज्ञावली व्दारे Publice Finance Management System (PFMS) करण्यात आली आहे. यासाठी खालील प्रमाणे ICICI Bank, शरणपुर रोड शाखा, नाशिक येथे मुख्य कार्यालय व प्रादेशिक कार्यालयांचे खाते उघडण्यात आले व त्यावर व्यवहार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | खाते क्रमाक |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यालय, नाशिक | ००२७०५०१४८५५ |
| २ | प्रादेशिक कार्यालय, नाशिक | ००२७०५०१४८६९ |
| ३ | प्रादेशिक कार्यालय, जव्हार | ००२७०५०१४८७४ |
| ४ | प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार | ००२७०५०१४८६८ |
| ५ | प्रादेशिक कार्यालय, धारणी | ००२७०५०१४८९३ |
| ६ | प्रादेशिक कार्यालय, भंडारा | ००२७०५०१४८६५ |
| ७ | प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली | ००२७०५०१४८६२ |
| ८ | प्रादेशिक कार्यालय, चंद्रपुर | ००२७०५०१४८६४ |
| ९ | प्रादेशिक कार्यालय, जुन्नर | ०९५४०५००१६८८ |

Scanned with CamScanner

करीता हंगाम २०२१-२०२२ मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजनेच्या खरेदीच्या हुंडया वटविणेकरीता ICICI Bank, शरणपुर रोड शाखा, नाशिक येथे मुख्य कार्यालय व सर्व प्रादेशिक कार्यालयांचे खाते येथील उपरोक्त तपशिला प्रमाणे चालु खाते यापुढेही चालु ठेवण्यास व त्या खात्यावर व्यवहार करण्यास व मुख्य कार्यालयाचे बँक खाते महाव्यवस्थापक (वित्त) व मा. व्यवस्थापकीय संचालक यांचे वतीने महाव्यवस्थापक (प्रशासन) व व्यवस्थापक (प्रशासन), प्रादेशिक कार्यालयाचे संबधित प्रादेशिक व्यवस्थापक व व्यवस्थापक (लेखा) यांचे संयुक्तीक स्वाक्षरीने हाताळण्याचे मान्यता मिळणेबाबत संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

**ठराव क्रमांक १० :** सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, आधारभुत किंमत खरेदी योजनेचे हंगाम २०२१-२०२२ मध्ये होणाऱ्या खरेदी करीता ICICI Bank, नाशिक येथिल मुख्य कार्यालय खाते क्र.००२७०५०१४८५५ व प्रादेशिक कार्यालयाचे खात्यावर हुंडया वटविणे बाबत संचालक मंडळ मान्यता देत आहे.

**सुचक** : मा.श्रीमती. जयश्री नामदेव तळपे.
**अनुमोदक** : मा.श्री. भरतलाल दुधनाग.
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ११ : केंद्र शासनाच्या किमान आधारभुत किंमत खरेदी योजनेचे (नाफेड तुर खरेदी) (PSF) बाजार हस्तक्षेप तुर खरेदी योजना हंगाम २०२१-२०२२ मध्ये होणाऱ्या खरेदी करीता ICICI Bank, नाशिक येथिल मुख्य कार्यालय खाते क्र. ००२७०५०१४५२५ खात्यावर हुंडया वटविणे बाबत.**

हंगाम २०१८-२०१९ मध्ये केंद्र शासनाचे किमान आधारभुत किंमत खरेदी योजनेचे (नाफेड तुर खरेदी) (PSF) बाजार हस्तक्षेप तुर खरेदी करण्यात आली होती. सदर खरेदीच्या हुंडया ICICI Bank, नाशिक येथिल मुख्य कार्यालय खाते क्र. ००२७०५०१४५२५ खात्यावर हुंडया वटविण्यात आल्या होत्या. हंगाम २०२०-२०२१ मध्ये शासनाचे निर्देश प्राप्त नसल्याने नाफेड तुर खरेदी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर खातेवर व्यवहार नाही.

ही खरेदी आता होत नसल्याने हे खाते बंद करावे असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे महाव्यवस्थापक (वित्त) यांनी उपरोक्त प्रमाणे विषय सादर केला, मा.संचालक श्री.अशोक मंगाम यांनी विचारणा केली की, मागील व्यवहार पुर्ण झाले आहे का?

त्या महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सांगीतले की, अजुन संपुर्ण हिशोब होणे व निधी प्राप्त होणे बाकी आहे.

याबाबत चर्चा होऊन, सदर योजनो भविष्यात जर महामंडळास मिळाली तर, सदर खाते पुन्हा नव्याने उघडावे लागेल. सदर खाते चालु ठेवावे असे ठरले. करीता सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालिल प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

Scanned with CamScanner

**ठराव क्रमांक ११ :** सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, केंद्र शासनाच्या किमान आधारभुत किंमत खरेदी योजनेचे (नाफेड तुर खरेदी) (PSF) बाजार हस्तक्षेप तुर खरेदी योजना हंगाम २०२१-२०२२ मध्ये होणाऱ्या खरेदी करीता ICICI Bank, नाशिक येथिल मुख्य कार्यालय खाते क्र. ००२७०५०१४५२५ खात्यावर हुंडया वटविणे बाबत संचालक मंडळ मान्यता देत आहे.

**सुचक** : मा.श्री.मधुकर निंबाजी काठे.
**अनुमोदक** : मा.श्री. विकास दुलाजी वळवी.
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक १२. महामंडळातील कर्मचाऱ्यांना सन २०१९-२० व २०२०-२१ साठी बोनस व सानुग्रह अनुदान मंजुर करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळासाठी बोनस प्रदान अधिनियम-१९६५ पासून लागू असल्याने महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना बोनस प्रदान अधिनयम- १९६५ च्या कलम - १० नुसार आणि संदर्भिय पत्रातील शिफाशीनुसार कमीतकमी ८.३३% इतका बोनस देणे क्रमप्राप्त आहे. शासनाने आदिवासी विकास विभागाचे पत्र क्र. संकीर्ण- १०८७/प्र.क्र.५७/का.३ दिनांक ११.०२.१९८८ अन्वये तसे महामंडळास कळविले असून, त्यानुसार ८.३३% दराने कर्मचाऱ्यांना बोनस देण्यास शासनाने आदेश दिले आहेत. तसेच शासनाचे वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.शायाक्र.१०९८/प्र.क्र.२७/९८ सा.दु.दिनांक ०३.१०.१९९८ नुसार शासनाने बोनसअधिनियम- १९६५ लागू असलेल्या उपक्रमांनी कायद्यानुसार बोनस अदा करणेस कळविले असून, त्यासाठी शासनाच्या पूर्वसंमतीची आवश्यकता असणार नाही असेही कळविले आहे. त्यानुसार बोनस ॲक्टप्रमाणे ८.३३% बोनस तसेच नफयाच्या २५% सानुग्रह अनुदान मंजुर करावे, अशी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ कर्मचारी संघटना, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.३२/२०, दि. २३.१०.२०२० नुसार विनंती केली आहे.

कर्मचारी संघटनेने त्याचे पत्रात नमुद केल्याप्रमाणे महामंडळास बोनस सप्रदान अधिनियम-१९६५ हा महामंडळास लागू आहे. तसेच शासनानेही पिरच्छेद क्र. १ मध्ये नमुद केलेल्या शासनाचे पत्राप्रमाणे ८.३३% दराने बोनस अदा करण्यास मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार बोनस निनियमातील तरतुदीनुसार पात्र कर्मचाऱ्यांना रुपये ३५००/- बोनस मागील वर्षी (सन २०१८-२०१९) अदा केला आहे. त्यानुसार सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षासाठी पात्र कर्मचाऱ्यांना ८.३३% प्रमाणे बोनस अदा करणेबाबत प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

बोनस व्यतिरिक्त कर्मचारी संघटनेने वर नमुद केल्याप्रमाणे सानुक्रह अनुदान मिळण्याची विनंती केली आहे. सन २०१९-२०२० या वर्षात महामंडळास ३.६१ कोटी निव्वळ नफा झाला असून सन २०२०-२०२१ मध्ये गतवर्षा इतकाच (सन २०१९-२०) इतका नफा अपेक्षीत आहे. सन २०१८-२०१९ मध्ये महामंडळाने अधिकारी/ कर्मचाऱ्यांना नफयाच्या २०% इतकी रक्कम सम प्रमाणत सानुग्रह अनुदान अदा केले होते. महामंडळाला नफा मिळवून देण्यामध्ये अधिकारी/ कर्मचारी यांचे प्रयत्नांचाही वाटा असल्याने

Scanned with CamScanner

तसेच सन २०१९-२० या वर्षासाठी कर्मचारी संघटनेने बोनस व्यक्तिरिक्त २५% इतकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी मागणी केली आहे.

या आर्थिक वर्षात कोरोनाच्या प्रार्दुभावामुळे संचालक सभेत विषय पारीत न झाल्यामुळे सर्वच मा. संचालक महोदयांनी बोनस व सानुग्रह अनुदान अधिकारी व कर्मचारी यांना सअदा करणे बाबत सकार्यालयास लेखी पत्रांद्वारे कळविले आहे.

तरी महामंडळाचे अधिकरी/ कर्मचारी यांना नियमानुसार बोनस आणि कर्मचारी संघटनेने त्यांच्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे, त्यांना दुर्गम भागात करावे लागत असलेले कामकाज, तसेच तेथे मुलांच्या उच्च शिक्षणाची सोय नसल्याने दोन ठिकाणी कुटँब ठेवावे लागत असल्याने सहोणारी आर्थिक कुचंबना याबाबींचा सहानुभूतीर्वक विचार करतां, सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षासाठी पात्र कर्मचाऱ्यांना ८.३३% प्रमाणे बोनस रक्कम (अक्षरी रुपये तीन हजार पाचशे ) मात्र व नफयाच्या २५% इतकी रक्कम सम प्रमाणात सानुग्रह अनुदान (रक्कम रुपये सहार मात्र ) मंजुरी होऊन मिळणे करीता सदरचा विषय मा. संचालक मंडळास सविनय सादर.

**ठराव क्रमांक १२ :** सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षासाठी पात्र कर्मचाऱ्यांना ८.३३% प्रमाणे बोनस रक्कम (अक्षरी रुपये तीन हजार पाचशे ) मात्र व नफयाच्या २५% इतकी रक्कम सम प्रमाणात सानुग्रह अनुदान (रक्कम रुपये सह हजार मात्र ) यास मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री. गणेश सुकाळे, कर्मचारी प्रतिनिधी संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. प्रकाश तुळशीराम दडमल, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक १३. संचालक मंडळ सभा दिनांक १७/०९/२०२१ व वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ३०/०९/२०२१ रोजीच्या खर्चाबाबत.**

दिनांक ३१/०३/२०२१ रोजी आर्थिक वर्ष संपले असल्याकारणाने महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची दिनांक १७/०९/२०२१ रोजी संचालक मंडळ सभा व दिनांक १७/०९/२०२१ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्याचे ठरले आहे.

सदर संचालक मंडळ सभा व वार्षिक सर्वसाधारण सभेला अंदाजित रक्कम रुपये ५ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर खर्चास मान्यतेस सादर.

Scanned with CamScanner

**ठराव क्रमांक १३ :** दिनांक १७/०९/२०२१ रोजी संपन्न होण्याऱ्या झालेली संचालक मंडळ सभेचा खर्च अंदाजित रक्कम रुपये ५ लक्ष, दिनांक ३०/०९/२०२१ रोजी संपन्न होणारी वार्षिक सर्वसाधारण सभेचा खर्च अंदाजित रक्कम रुपये ३ लक्ष आणि मुख्य कार्यालय, नाशिक येथे सभा तथा भेट घेण्याकरिता उपस्थित मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष आणि मा.संचालक सदस्य यांचेवर निवास व भोजन यावर प्रादेशिक कार्यालय, नाशिक अंतर्गत झालेला व होणारा खर्च रक्कम रुपये ७ लक्ष **असा एकुण यांनी केलेला अंदाजित खर्च रक्कम रुपये १५ लक्ष इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. श्री. मगन नुरा वळवी, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. विठ्ठल देवराम देशमुख, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक १४ : श्री.रामसिंग प्रतापसिंग गिरासे, श्री.जावेद बहिरम पिंजारी, श्री.महादु दुंडया चौरे, श्री.रमेश काशिराम सस्ते, श्री.जगन डी.अहिरे, आणि श्री.धुडकु नागो महाजन यांचेबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथील दावे क्र.Writ Petition No.१०९५७/२०१९, ११४२५/२०१९, ११४२६/२०१९, ११४२७/२०१९, ११४२८/ २०१९ व ११४२९/२०१९. च्या निर्णयाविरोधात अपिल (SLP) दाखल करणेस व होणाऱ्या संभाव्य खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये, प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार अंतर्गत ६ रोजंदारी कामगारांनी महामंडळाच्या नियमित सेवेत सामावुन घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या विरोधात मे. औद्योगिक न्यायालय, धुळे येथे दावे (फिर्याद) दाखल केलेले होते. सदर दाव्यांचा निकाल हा महामंडळाविरोधात झालेला होता.

सदर दाव्यांच्या निकालाविरोधात महामंडळामार्फत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे अपिल दाखल करण्यात आले होते. सदर मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी उपरोक्त रिट पिटीशन बाबत संदर्भ क्र.४ नुसार दि.१९ सप्टेंबर २०१९ रोजी आदेश दिलेले आहेत.

मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्देशानुसार उपरोक्त नमुद कामगारांप्रमाणे इतरही कामगारांचा प्रस्ताव **शासनाला दि.३१/१२/२०१९** पर्यंत सादर करणेबाबत निर्देश दिले आहे. जसे की, कार्यालयात रुजु केल्याची तारीख, कार्यालयात सेवा केल्याचा कालावधी, मंजुर आकृतीबंध, इत्यादी. शासनाने **दि.३१/०५/२०२०** पर्यंत त्यावर निर्णय (आकृतीबंधनुसार रिक्त असलेल्या पदांवर सेवाजेष्ठतेनुसार कामगारांना महामंडळाच्या सेवेत सामावुन घेणे, सेवानिवृत्त झ

Scanned with CamScanner

ालेल्या कामगारांना झालेल्या सेवेचा होणारा फरक अदा करणे, मयत झालेल्या कामगारांच्या वारसदारांना सेवेत घेणेबाबत निर्णय घेणे) घ्यावा, असे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशात नमुद आहे.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे **दि.१९/०९/२०१९** च्या आदेशानुसार, महामंडळातील रोजंदारी कामगारांबाबत प्रस्ताव तयार करून शासनास सादर केलेले आहे. परंतु, मा.न्यायालयाच्या निकालानुसार सर्व कामगारांना सेवेत सामावुन घ्यावयाचे झाल्यास **Back door Entry ने न्यायीक दृष्ट्या योग्य होणार नाही, सदर कामगारांची नेमणुक ही योग्य प्रक्रीयेद्वारे झालेली नाही,** उपरोक्त दोन्ही न्यायालयाने निर्णय देतांना त्यानिर्णयाने होणारे **आर्थिक दृष्टीकोन** विचारात घेतलेले नाहीत इ. व इतर मुद्दांबाबत वरील ०६ कामगारांच्या रिट पिटीशनच्या मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथील आदेशाविरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे अपिल (SLP) दाखल करणेबाबत वकीलांशी चर्चा केली असता, त्यांनी सदर अपिल दाखल करता येईल असे सुचित केले आहे.

करीता, सदर प्रकरणी उपरोक्त कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे शासन / महामंडळाविरोधात अवमान याचिका दाखल केलेली आहे. (सदर अवमान याचिकेस मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे.)

सदरील दाव्यांच्या निर्णयाविरोधात (Writ Petition No.१०९५७/२०१९, ११४२५/२०१९, ११४२६/२०१९, ११४२७/२०१९, ११४२८/२०१९ व ११४२९/२०१९). मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे तात्काळ अपिल (SLP) दाखल करणेसाठी व त्याकरीता होणाऱ्या संभाव्य खर्चास मा.अध्यक्ष, आविम यांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार, मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे अपिल (SLP) दाखल करण्यात आलेली असुन, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथील दि.१९ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या आदेशाला स्टे प्राप्त झालेला आहे व दाव्याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे. उपरोक्त दाव्याच्या सद्यस्थितीबाबत तसेच, झालेल्या खर्चास व होणाऱ्या संभाव्य खर्चास व आजपर्यंत झालेल्या कार्यवाहीबाबत महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी मा.संचालक मंडळास अवगत करुन दिले.

उपरोक्त प्रकरणाबाबत मा.संचालक मंडळासमोर सांगोपांग चर्चा झाली व झालेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

Scanned with CamScanner

**ठराव क्रमांक १४ :** सदर दाव्याबाबत मा.संचालकांनी मंजुरी दिलेली आहे. तसेच, दाव्याबाबत झालेल्या खर्चास व होणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. परंतु, मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे महामंडळाच्या वतीने दावा हाताळणारे वकील ॲड.निशांत काटनेश्वरकर यांची आत्तापर्यंत झालेली फी व इतर अनुषांगिक खर्च वकीलांना अदा करुन सदर दावा चालविणेसाठी दुसरे वकीलांची नियुक्ती करणेबाबत मा.सचालकांनी सुचित केले आहे.

**सुचक** : मा. श्री. अशोक भाऊराव मंगाम, संचालक सदस्य
**अनुमोदक** : मा. श्रीमती मिनाक्षी अर्जुनराव वट्टी, संचालिका सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक १५ : सन २०१५-१६ व २०१६-१७ च्या तेलपंप संचाचा योजने करीताचा व सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ करीता वीजपंप व एच.डी.पी.ई.पाईपचा निधी महामंडळाने शासनाला जमा केल्याबाबतचा विषय मा.महाव्यवस्थापक(प्रशासन) यांनी संचालक मंडळा समोर मांडला.**

शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२०/ प्र.क्र.६७/ कोषा-प्रशा-५ मंत्रालय, मंबई दि-२८/०५/२०२० व शासनाचे पत्र क्र.आविम/२०२०/प्र.क्र.५२/का.९ आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई दि-२८/१२/२०२० नुसार खालील प्रमाणे महामंडळाकडील तेलपंप, वीजपंप व एच.डी.पी.ई.पाईपचा शिल्लक निधी महामंडळाने शासन निर्णयानुसार शासनखाती जमा केल्याबाबत संचालक मंडळाच्या निदर्शनास आणुन दिले.

त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| अ.क्र. | योजना | वर्ष | शासनास जमा केलेला निधी |
|---|---|---|---|
| १. | तेलपंप | २०१५-१६ व २०१६-१७ | रु.२७,५९,०१,७९५/- |
| २. | वीजपंप | २०१४-१५,२०१५-१६ व २०१६-१७ | रु.२,५९,४८,११८/- |
| ३. | एच.डी.पी.ई.पाईप | २०१४-१५,२०१५-१६ व २०१६-१७ | रु.२७,२८,९३,२८५/- |
| | एकुण | | रु.५७,४७,४३,१९८/- |

उपरोक्त बाबीस संचालक मंडळाने मान्यता दिली.

कृषी विभागाकडे प्रलंबित असलेला निधी रु.४,२०,३१,०१५/- याबाबत कृषी विभागाकडे पाठपुरावा करुन सदरचा निधी परत मिळणेबाबत अथवा कृषी विभागाने

Scanned with CamScanner

वापरलेल्या निधीबाबत उपयोगीता प्रमाणपत्र सादर करणेबाबत कार्यवाही करण्याचे अधिकार मा.व्यवस्थापकीय संचालक यांना दिले. या विषयावर सविस्तर चर्चा झाली असता सर्व संचालक मंडळाने एक मताने खालील बाबीवर ठराव संमत केला की

**ठराव क्रमांक १५** : "तेलपंप, वीजपंप व एच.डी.पी.ई.पाईप योजना यापुर्वी महामंडळामार्फत राबविण्यात येत होती. आदिवासी लाभार्थीकडे DBT करीता स्वत:च्या हिश्याची रक्कम भरणा करणे करीता निधी नाही. तसेच DBT द्वारे सदरची वस्तु खरेदी करण्यात येईल व ती वस्तु योग्य आहे याची खात्री देता येत नाही.

त्यामुळे शासन निर्णय क्र.डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७ मुंबई दि-५/१२/२०१६ अन्वये विविध कल्याणकारी योजनांमध्ये समावेत असलेले क्र.२७,२८ व ४४ वीजपंप, तेलपंप व एच.डी.पी.ई.पाईप अनुक्रमे वस्तुस्वरुपात मिळणा-या लाभेचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करणेबाबत झालेला निर्णय रद्द करणेबाबत व तेलपंप, वीजपंप व एच.डी.पी.ई.पाईप ची योजना पुर्ववतपणे आदिवासी विकास महामंडळा मार्फत राबविण्यात यावी जेणे करुन आदिवासी शेतक-यंना सदर योजनेचा लाभ मिळेल. असा ठराव संचालक मंडळाने सर्वानुमते संमत केला व सदरचा ठराव व प्रस्ताव शासनाला अवगत करणेबाबत सुचित केले."

**सुचक** : मा.श्री.भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक
**अनुमोदक** : मा.श्री.अशोक भाऊराव मंगाम, संचालक

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक १६ : महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, (M.I.D.C), प्रादेशिक कार्यालय, नागपुर यांचेकडुन देवरी, जि. गोंदिया तसेच अहेरी जि. गडचिरोली येथे प्राप्त झालेल्या जागेवर गोदाम बांधकाम करण्याबाबत.**

**अ)** देवरी जि. गोंदिया येथे गोदाम बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, (M.I.D.C), प्रादेशिक कार्यालय, नागपुर यांचेकडुन एम.आय.डी.सी. देवरी येथे १६३८४ स्क्वेअर मिटर जागा हस्तांतरीत केलेली आहे. देवरी येथे गोदाम बांधकामासाठी शासनाकडुन रु. **५२०.८३** लक्ष इतका निधी महामंडळाकडे प्राप्त आहे. सदर ठिकाणी गोदाम बांधकामासाठी अंदाजपत्रक, आराखडे बनविणेसाठी जा.क्र. ६७ दिनांक ०४ जानेवारी, २०१८ अन्वये सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ यांना कळविणेत आलेले होते. या ठिकाणी शासनाने आधुनिक तंत्रज्ञानावर (BMH) तत्वावर गोदाम बांधकाम करावयाचे शासनाने दिनांक २७.०८.२०१९ चे पत्रान्वये कळविले होते. मात्र ही बाब संचालक मंडळ सभेत नजरेस आल्यानंतर त्यांनी त्यास विरोध दर्शविला व त्यानुसार ठराव पारीत केला आहे. तथापी सदर विभागाने देवरी गोदाम बांधकामाचे BMH तंत्रावर आधारीत आराखडे व अंदाजपत्रक तयार केले आहे. सदरच्या कार्यवाहीस संचालक मंडळाचे आक्षेपानुसार कार्यालयीन पत्र जा. क्र. ०८ जुन, २०२१ चे पत्रान्वये स्थगीती देण्यात आलेली आहे.

सदर ठिकाणी नवीन गोदाम बांधकाम करणेसाठी मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, वखार महामंडळ, पुणे यांचेकडे जा.क्र. १५६० दि. २७ ऑगष्ट, २०२१ अन्वये देखिल प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर प्रस्तावाची छाननी झाल्यावर त्यांचेकडुन बांधकामाचे पुढील कार्यवाही बाबत तसेच अटी/शर्तीबाबत कळविलेनंतर सदरचा विषय आगामी संचालक मंडळासमोर सादर करणेत येईल. सदरचा विषय अवलोकनार्थ संचालक मंडळापुढे सादर करणेत आलेला आहे.

**ब)** मौजे अहेरी, जि. गडचिरोली येथे महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, (M.I.D.C) कार्यक्षेत्रात असलेल्या ६२०० स्के.मिटर जागा एम.आय.डी.सी. नागपूर यांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळास यांना हस्तांतरीत केलेली आहे. देवरी येथे गोदाम बांधकामासाठी शासनाकडुन रु. **२६५.९२** लक्ष इतका निधी महामंडळाकडे प्राप्त आहे. अहेरी कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर धानाची खरेदी होत असते. दरवर्षी हे धान गोदामे पुरेशी नसल्याने उघड्यावर साठविले जाते. सरासरी या भागात एका वर्षात सुमारे १.७५ लक्ष क्विंटल धान खरेदी होत असते. या ठिकाणी गोदामाची नितांत आवश्यकता आहे. त्याठिकाणी सुमारे ३००० मे.टन किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेचे गोदाम बांधता येऊ शकेल.

**अहेरी** जि. गडचिरोली तसेच **वडधम**, ता. सिरोंचा, जि. गडचिरोली येथे नवीन गोदाम बांधकाम करणेसाठी मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, वखार महामंडळ, पुणे यांचेकडे जा.क्र. १५६० दि. २७ ऑगष्ट, २०२१ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर प्रस्तावासोबत सार्वजनिक

Scanned with CamScanner

बांधकाम विभाग, आदिवासी मंडळ, नागपुर यांनी तयार केलेले अंदाजपत्रक रक्कम रुपये १९.१७ कोटी चे दस्तावेज देखिल सादर करण्यात आलेले आहे. सदर प्रस्तावाची छाननी झाल्यावर त्यांचेकडुन बांधकामाचे पुढील कार्यवाही बाबत तसेच अटी/शर्तीबाबत कळविलेनंतर सदरचा विषय आगामी संचालक मंडळासमोर सादर करणेत येईल. तसेच गोदाम बांधकाम करुन मिळणेबाबत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे देखिल पाठपुरावा सुरु आहे. वडधम ता. सिरोंचा, जि. गडचिरोली येथे गोदाम बांधकामासाठी शासनाकडुन निधी अप्राप्त आहे. सदरचा विषय अवलोकनार्थ संचालक मंडळापुढे सादर करणेत आलेला आहे.

**ठराव क्रमांक १६** : सर्वानुमते ठराव संमत करण्यांत येतो की, यापुढे गोदाम बांधकाम व इतर बांधकामासाठी, कार्यालय दुरुस्ती करणे इत्यादी कामे करण्यासाठी तांत्रिक सल्लागार ( PMC ) यांची नेमणुक करुन त्यांचे मार्फत महामंडळाने स्वतः दुरुस्ती / बांधकामे पुर्ण करुन घेण्यात यावीत. जी गोदाम बांधकामे सुरु झालेली नाही, त्या सर्व गोदामांची बांधकामे महामंडळाने स्वतः तांत्रिक सलागार ३ वर्षासाठी नेमणुक करावी. व त्यांचे मार्फत गोदाम बांधकाम, कार्यालय दुरुस्ती इत्यादी कामे तातडीने पुर्ण करुन घेण्यात यावी. देवरी, जि.गोंदिया व अहेरी, जि.गडचिरोली येथे गोदाम बांधकाम सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग यांचेमार्फत न करता महामंडळाने स्वतः तांत्रिक सल्लागार नेमणुक करावी.

**सुचक** :- मा.श्री भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, सुचालक
**अनुमोदक**:- मा.श्री अशोक भाऊराव मंगाम, संचालक

**ठराव बहुमताने मंजुर.**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक १७ : म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळामार्फत गडचिरोली जिल्ह्यात ७ गोदामे बांधकामाबाबत सद्यस्थिती..**

मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडुन गडचिरोली जिल्ह्यामध्ये गोदाम बांधकामासाठी ७ ठिकाणी जागा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सदर जागेचे सार्वजनिक बांधकाम (आदिवासी ) मंडळ, नागपूर यांनी ७ गोदामे बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा प्रक्रीया पुर्ण केलेली आहे.

निविदा क्रमांक ७३३३ जुलै, २०१९ मध्ये पुर्ण केलेली आहे. निविदेत ठेवलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.२४,८५,१८,७११/- च्या तुलनेत देकार ५.०६% कमी दराची असल्याने निविदा रक्कम २३,६३,६८,८६०.४३/- ची प्राप्त निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन स्विकृत करण्यांत आलेली आहे. निविदेनुसार ७ गोदामांची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | गडचिरोली जिल्ह्यातील गोदाम बांधकाम करावयाचे प्रस्तावित केलेली ठिकाणे | तालुका | बांधकामाची सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ |
| १ | सोनसरी | कुरखेडा | पारंपारीक गोदाम बांधकाम प्रक्रीया हाती घेण्यात आली आहे. |
| २ | अरततोंडी (k) | कुरखेडा | पारंपारीक गोदाम बांधकाम प्रक्रीया हाती घेण्यात आली आहे. |
| ३ | रेगडी | चार्मोशी | पारंपारीक गोदाम बांधकाम प्रक्रीया हाती घेण्यात आली आहे. |
| ४ | सिरोंचा | सिरोंचा | पारंपारीक गोदाम बांधकाम प्रक्रीया हाती घेण्यात आली आहे. |
| ५ | गेवर्धा | कुरखेडा | BMH तत्वावर सुरु केलेले गोदाम बांधकाम स्थगीत करुन पारंपारीक पध्दतीचे (RCC) बांधकाम सरु करणेबाबत सां.बा. विभाग, आदिवासी मंडळ यांना कळविणेत आलेले आहे. |

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | पोटगांव | देसाईगंज | जागा प्राप्त झालेली असुन १८०० मे. टन क्षमतेचे पारंपारीक गोदाम बांधकामाचे आराखडे व अंदाजपत्रक बनविणेसाठी सां.बा. विभाग, आदिवासी मंडळ यांना कळविणेत आलेले आहे. |
| ७ | झिंगानुर | सिरोंचा | पर्यायी जागा अप्राप्त असुन मा. प्रकल्प अधिकारी, अहेरी यांचेकडुन शासकीय/ अनुदानित आश्रमशाळेलगतची जागा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. |

सद्यस्थितीत उपरोक्त तक्त्यामध्ये अ.क्र. १ ते ५ येथील गोदाम प्रक्रीया हाती घेण्यात आलेली आहे.

खरेदीचे प्रमाण जास्त असलेल्या भागात गोदाम बांधकामासाठी इतर १४ ठिकाणी शासकिय जागा मिळणेबाबत मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडे पाठपुरावा सुरु असुन प्राप्त होणा-या जागेवर गोदाम बांधकामासाठी रुरल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फंड (RIDF) मधुन रुपये ५०.०० कोटी मिळणेबाबतची मागणी नोंदविण्यात आलेली आहे.

यावर चर्चा करतांना श्री. मंगाम सो. संचालक यांनी म्हटले की, विदर्भ विभागात विशेषतः गडचिरोली व भंडारा कार्यक्षात्रात खुप मोठ्या प्रमाणावर धानाची खरेदी होते. तेथे धानाची साठवणुक करणेसाठी पुरेशा गोदामांची व्यवस्था नसल्याने नैसर्गिक आपत्तीमुळे धानाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन महामंडळास कोट्यवधींचा नुकसान सहन करावा लागत आहे. त्यामुळे प्राप्त जागेवर तातडीने गोदाम बांधकामे पुर्ण करुन घेण्यात यावी. म्हणजे धानाची होणारी नासाडी कमी होण्यास मदत होईल. तसेच गेवर्धा येथे बी.एम.एच. तत्वावर गोदाम बांधकाम करणेऐवजी पारंपारीक पध्दतीचे गोदाम बांधकाम करण्यांत यावे.

मा.श्री पुरके सर, उपाध्यक्ष यांनी पुढे असे म्हटले की, गोदामे बांधकामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी केलेले अंदाजपत्रके अत्यंत अवाजवी दिसुन येत आहेत. तथापी आता बांधकामास सुरुवात झालेली असल्याने ती बांधकामे तातडीने पुर्ण करुन घ्यावीत. केलेल्या व करीत असलेल्या कार्यवाही बाबत पुढील संचालक मंडळ सभेत माहीती सादर करावी. यावर सर्व उपस्थित संचालकांनी संमती दर्शविल्यानंतर खालीलप्रमाणे ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

Scanned with CamScanner

**ठराव क्रमांक १७** : सर्वानुमते ठराव संमत करण्यांत येतो की, गडचिरोली जिल्ह्यात सुरु असलेल्या गोदामांची कामे तातडीने पुर्ण करुन घ्यावीत तसेच गेवर्धा येथे बी.एम.एच. तत्वावर सुरु केलेले बांधकाम रद्द करुन तेथे पारंपारीक पध्दतीचे गोदाम बांधकामाची प्रक्रीया हाती घेण्यात यावी. तसेच सदरील गोदामे बांधकामासाठी शासनाकडुन निधीची मागणी करणेत यावी.

**सुचक** : मा.श्री भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक

**अनुमोदक** : मा.श्री अशोक भाऊराव मंगाम, संचालक

**ठराव बहुमताने मंजुर.**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक १८ : महामंडळाचे मालकीचे जुने सिडको, नाशिक योजना क्र. २ मधील भुखंड क्र. P.K. ९ येथे ३७ ते ४६ मधील नियोजित बांधकामाबाबत.**

म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळाचे जुने सिडको, शिवाजी चौक, नाशिक येथील महामंडळाच्या जागेवर मुलींचे वसतीगृह बांधण्यासाठी मा. सहकार आयुक्त, पुणे यांचे मान्यतेनुसार महामंडळाचे इमारत निधीमधुन मुख्य कार्यालयाचे दि. २१ ऑगष्ट, २०१७ चे आदेशान्वये मे. कॉम्पॅक्ट बिल्डर्स, नाशिक यांना मुलींचे वसतीगृह इमारतीचे बांधकाम १२ महिन्यांचे आत पुर्ण करणेचे आदेश निर्गमित करण्यांत आलेले आहे.

**संचालक मंडळ ठराव**

म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळाचे जुने सिडको, शिवाजी चौक, नाशिक येथील महामंडळाच्या मालकीच्या जागेवर आदिवासी मुलींचे वसतीगृह बांधकाम करणेसाठी दिनांक ०३ ऑगष्ट, २०१३ रोजीच्या संचालक मंडळ सभेमध्ये चर्चा झाली.

सदर चर्चेनुसार दिनांक ३०.०८.२०१४ रोजीच्या संचालक मंडळ सभेमध्ये ठराव क्र. ४ पारित होवुन महामंडळाचे जुने सिडको, नाशिक येथील जागेवर मुलीचे वसतीगृह बांधण्यासाठी मे मगर जायभावे असोसिएट्स, आर्किटेक्ट, नाशिक यांचेकडुन मुलींचे वसतीगृह बांधकामाचे प्लॅन व अंदाजपत्रक तयार करून घेवुन पुढील कार्यवाहीचे संपुर्ण अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करण्यांत आलेले आहेत.

मुलींचे वसतीगृह बांधकामासाठी शासनाकडुन निधी प्राप्त नसल्याने महामंडळाचे राखिव निधीमधुन सदरचा खर्च भागविणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व सहकारी संस्था नियम-१९६१ मधील कलम-६६ नुसार पुर्व परवानगी मिळणे बाबत मुख्य कार्यालयाचे पत्र क्र. ६८१ दि. ०६.०६.२०१४ अन्वये मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा. पुणे यांना प्रस्ताव सादर केला होता. सदरच्या प्रस्तावानुसार मा. सहकार आयुक्त व निबंधक यांनी इमारत निधी व राखीव निधीतुन खर्च भागविणेसाठी परवानगी दिलेली आहे. मुख्य अभियंता, सा.बां.विभाग, नाशिक यांनी मुलींचे वसतीगृह बांधकामासाठी तांत्रिक सल्लागार यांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकास रुपये ४,६७,३१,३००/- (सर्व खर्च समावेश करून) इतक्या खर्चास तांत्रिक मंजुरी प्रदान केलेली आहे. महामंडळाने प्रसिध्द केलेल्या इ निविदेत मे. कॉम्पॅक्ट बिल्डर्स आणि डेव्हलपर्स लि., नाशिक यांनी १६% Above हा दर न्युनतम असल्याने त्यांचेशी दिनांक ०७.०६.२०१४ रोजी समिती समक्ष झालेल्या वाटाघाटी अंती ठेकेदारास रु ४,११,८०,७९२.०० या दराच्या १२.५% Above म्हणजेच (निविदा रक्कम रु ४,११,८०,७९३.०० + १२.५०% Above रु ५१,४७,५९९.०० ) = ४,६३,२८,३९२.०० या रक्कमेमध्ये बांधकाम देण्याचे ठरले, त्यास ठेकेदाराने सहमती दर्शविल्याने बांधकाम ठेकेदार मे.कॉम्पॅक्ट बिल्डर्स आणि डेव्हलपर्स लि., नाशिक यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार

Scanned with CamScanner

१२.५०% Above दरास मान्यता देवुन मे. कॉम्पॅक्ट बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स, नाशिक यांना जा. क्र. १६८५ दि. २१ ऑगष्ट, २०१४ बांधकामाचे कार्यारंभ आदेश (Work Order ) देण्यात आलेला होता. सदर आदेशाप्रमाणे ठेकेदाराशी करारनामा करण्यांत आलेला असुन करारनाम्यातील मुद्दा क्रमांक-२ अन्वये संबंधित विभागाकडुन इमारत परवानगी प्राप्त झालेनंतर १२ महिने इतकी असेल असे नमुद आहे. नाशिक महानगर पालिका यांचेकडुन नाहरकत प्रमाणपत्र जावक दि. १२ मे, २०२१ अन्वये प्राप्त झालेले आहे. बांधकाम ठेकेदार यांनी दिनांक २७.०५.२०२१ च्या पत्रान्वये महामंडळाकडील आदेश क्र. १६८५ दि. २१.०८.२०१४ व केलेल्या करारनाम्यानुसार मागील दरानुसार व अटी/शर्तीनुसार काम करणेस तयार असल्याचे कळविले आहे. बांधकाम आदेशाचा कालावधी हा ५ वर्षापेक्षा अधिक झालेला असुन ठेकेदाराने आदेशामध्ये नमुद दरानुसार काम करणेस सहमती दर्शविल्यामुळे संचालक मंडळाचे निर्णयास अधिन राहुन बांधकाम ठेकेदार यांना मुख्यालयाचे आदेश क्रमांक ४४५ दिनांक २८ मे, २०२१ चे आदेशानुसार सदरहू काम करणेस २१.०८.२०१४ चे आदेशास व करारनाम्यातील अटी/शर्ती नुसार पुढील एक वर्षापर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर आदेशास व केलेल्या कार्यवाहीस संचालक मंडळाचे मान्यतेस सादरचा विषय संचालक मंडळासमोर सादर करणेत आलेला आहे.

सदर विषयावर चर्चा करतांना श्री. मधुकर काठे सो. संचालक यांनी म्हटले की, सिडको, नाशिक येथे मुलींचे वसतीगृह बांधकामाचे आदेश निर्गमित होऊन जवळपास सहा ते सात वर्षे झालेली आहेत. तथापी महानगर पालिका, नाशिक यांचेकडुन परवानगी मिळणेस इतका विलंब होणे ही शोकांतिका आहे. सदरचे बांधकाम वेळेत पुर्ण झाले असते तर सदर इमारतीचे भाड्यापोटी महामंडळास आदिवासी विकास विभागामार्फत आजअखेर रक्कम प्राप्त झाली असती.

तथापी नाशिक महानगर पालिकेची परवानगी मे, २०२१ मध्ये प्राप्त झाल्याने पुढील कार्यवाहीस विलंब झालेला आहे. बांधकाम ठेकेदार हे बांधकाम आदेशातील दरानुसार व करारनाम्यानुसार काम करणेस तयार असल्याचे लेखी दिलेली असल्याने तद्नंतर मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी केलेल्या कार्यवाहीस व दिनांक २८.०५.२०२१ अन्वये एक वर्षापर्यंत बांधकाम करणेस मुदतवाढ देण्यास हरकत नसावी. यावर सर्व उपस्थित संचालकांनी सहमती दर्शविल्यानंतर खालीलप्रमाणे ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

Scanned with CamScanner

**ठराव क्रमांक १८ :** सर्वानुमते ठराव संमत करण्यांत येतो की, सिडको, नाशिक येथे मुलींचे वसतीगृह बांधकामासाठी बांधकाम आदेशातील व करारनाम्यातील दरानुसार व अटीशर्तीनुसार दिनांक २८.०५.२०२१ पासुन पुढील एक वर्षापर्यंत मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच पुढील कार्यवाही करणेचे अधिकार ही सभा मा. व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करणेत येत आहे.

**सुचक** :- मा.श्री भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक
**अनुमोदक** :- मा.श्री अशोक भाऊराव मंगाम, संचालक
**ठराव बहुमताने मंजुर.**

**विषय क्रमांक १९ : मा. मंत्री, आदिवासी विकास तथा मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांचे मंत्रालयीन कार्यालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या स्टेशनरी व इतर साहित्याचे देयकास मंजुरी मिळणे बाबत.**

मा. मंत्री, आदिवासी विकास तथा मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांचे मंत्रालय मुंबई येथील कार्यालयास लागणारी स्टेशनरी व इतर साहित्य मा. मंत्री महोदय यांचे स्वीय्य सहाय्यक यांनी मुंबई येथे स्थानिक पातळीवर वित्तीय नियमान्वये कार्यालयीन पध्दतीचा अवलंब करून खरेदी केले असुन कार्यालयास पुरवठा करून त्याचे देयके उदायगी तथा प्रतिपुर्ती होणेसाठी महामंडळाकडे पाठविलेले आहे.

तपशिल पुढीलप्रमाणे -

| अ. क्र. | पुरवठा धारकाचे नाव | पत्र क्र. व तारीख | बिल नंबर व तारीख | देयकाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मे. परम एन्टरप्रायजेस, मुंबई | ९३/२१- २३/०२/२०२१ | ८३-२३/०२/२०२१ | रू.३९,०५८/- |
| | | २२८-०५/०५/२०२१ | १०२-०५/०५/२०२१ | रू.५०,२०९/- |
| | | ३०३-०९/०७/२०२१ | ०११५-०९/०७/२०२१ | रु.१९,९७१/- |
| | **एकुण रक्कम** | | | **रू.१,०९,२३८/-** |
| २. | एस एस सर्व्हिसेस, ठाणे | ३०८-१४/०७/२०२१ | **SS/२०१/२०२१-२२** ०७/०६/२०२१ | रू.१,३२,२००/- |
| | | | **SS/२०१/२०२१-२२** ०७/०६/२०२१ | रू.१४,००२/- |

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | एकुण रक्कम | | | रू.१,४६,२०२/- |
| ३. | Lista & Company, Mumbai | ६७२/२१<br>०६/०९/२०२१ | १९३/२०२१-२२<br>१७/०८/२०२१ | रू.५,४७,१४०/- |
| | एकुण रक्कम | | - | रू.५,४७,१४०/- |
| | एकुणांत रक्कम | | - | रू.८,०२,५८०/- |

२. नाशिक येथील निवासस्थानी खरेदी करण्यात आलेल्या साहित्याच्या देयकांचा तपशिल खाली लप्रमाणे -

| अ. क्र. | पुरवठा धारकाचे नाव | पत्र क्र. व तारीख | बिल नंबर व तारीख | देयकाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मे. कृपासिंधु अँड कंपनी, नाशिक | ३२४६<br>२७/०७/२०२१ | २२७/२२८/२२९<br>२९/०७/२०२० | रू.२२,६९२/- |
| | | | २३०-२९/०७/२०२० | रू.१२,३००/- |
| | एकुणांत रक्कम | | | रू.३४,९९२/- |

वरील प्रमाणे खरेदी करण्यात आलेल्या वस्तु सदर वस्तु सुस्थितीत मिळाल्याबाबत मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय यांचे स्वीय्य सहाय्यक यांनी सदर पत्रामध्ये नमुद केलेले आहे.

सबब मा. मंत्री आदिवासी विकास तथा मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांचे मंत्रालय मुंबई येथील कार्यालयास लागणारे इलेकट्रॉनिक साहित्य व स्टेशनरी खरेदी करणेस एकुण रक्कम रूपये.८,०२,५८०/- मात्र नाशिक येथील निवासस्थानी साहित्य खरेदी करणेस रूपये.३४,९९२/- (अक्षरी रूपये. चौथीस हजार नऊशे ब्यान्नव मात्र) असा एकुण रक्कम रूपये.८,३७,५७२/- मात्र खर्च झालेला आहे.

सदर खर्चापैकी रूपये.२,९०,४३२/- (अक्षरी रूपये. दोन लाख नव्वद हजार चारशे बत्तीस मात्र) इ. खर्चाचे देयक मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांच्या मान्यतेनुसार अदायगी करण्यात आलेले असुन उर्वरीत खर्च रूपये.५,४७,१४०/- (अक्षरी रू. पाच लाख सत्तेचाळीस हजार एकशे चाळीस मात्र) अदायगी करणे बाकी आहे.

करीता वरील प्रमाणे मा. मंत्री आदिवासी विकास तथा मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांचे मंत्रालय मुंबई येथील कार्यालयास व निवासस्थानी लागणारे साहित्य खरेदी करणेसाठी

Scanned with CamScanner

झालेला एकुण खर्च रूपये.८,३७,५७२/- (अक्षरी रू. आठ लाख सदोत्तीस हजार पाचशे बाहात्तर मात्र) खर्चास कार्योत्तर/प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी विषय सविनय सादर.

**ठराव क्रमांक १९ :** मा. मंत्री आदिवासी विकास तथा मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांचे मंत्रालय मुंबई येथील कार्यालयास व नाशिक येथील निवासस्थानी लागणारे साहित्य खरेदी करणेसाठी झालेला एकुण खर्च रूपये.८,३७,५७२/- (अक्षरी रू. आठ लाख सदोत्तीस हजार पाचशे बाहात्तर मात्र) इतक्या खर्चास संचालक मंडळ कार्योत्तर/ प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच यापुढील कार्यवाही करण्याचे अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. अशोक भाऊराव मंगाम, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक २० : मा. मंत्री, आदिवासी विकास तथा मा. अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ यांचे अस्थापनेला तसेच मा. उप सचिव, आदिवासी विकास यांचे शासकीय कामकाजासाठी महामंडळाने वर्ग करण्यात आलेल्या वाहनांचे इंधन/ऑईल/दुरूस्ती यासाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर / प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

मा. मंत्री आदिवासी विकास विभाग तथा मा. अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ यांचे अस्थापनेला शासकीय कामकाजासाठी महामंडळाचे वाहन (इनोव्हा) क्र. एम एच १५ इपी ००६ व वाहन क्र. एम एच १५ एए ९९९० वर्ग करण्यात आलेले असुन आदिवासी विकास विभागाचे वाहन क्र. २७०७ हेही वाहन मा. मंत्री महोदयांच्या वापरात आहे. त्याचप्रमाणे उप सचिव, आदिवासी विकास, यांचेकडे वाहन क्र. एम एच १५ एए ४००० हे वर्ग करण्यात आलेले आहे. सदर वाहनाच्या इंधन/ऑईल/दुरूस्ती इ. खर्चासाठी मंत्री कार्यालयाकडुन वेळोवेळी निधीची मागणी केली जाते.

वित्त विभाग शासन निर्णय क्र. शासाउ-१०.१०/प्र.क्र.९६./१०सा.उ. मंत्रालय मुंबई दि.१३/०३/२०१२ मधील सोबतच्या जोडपत्र- १ नुसार मा. अध्यक्ष यांना उपलब्ध करून दिलेल्या वाहनांचे इंधन/ऑईल साठी प्रतिवर्ष अनुज्ञेय असलेला खर्च रूपये.७२,०००/- मात्र दिनांक २८/०२/२०२० रोजी प्रादेशिक कार्यालय, जव्हार कार्यालयास वर्ग करण्यात आलेला आहे.

मा. मंत्री आदिवासी विकास तथा मा. अध्यक्ष व मा. उपाध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ यांचेकरीता मंत्रालय, मुंबई येथे महामंडळाने वर्ग केलेल्या वाहनांचे इंधन/ऑईल/दुरूस्ती साठी लागणाऱ्या

Scanned with CamScanner

खर्चाचा निधी शासनाकडुन उपलब्ध होत नाही. तसेच सदर खर्च दिनांक १३/०३/२०१२ च्या शासन निर्णयाच्या तरतूदीपेक्षा जास्त होत असुन सदर खर्च महामंडळाला करावा लागत असल्याने याचा भुर्दंड महामंडळाला सहन करावा लागतो. याबाबत भारतीय लेखा तथा लेखापरिक्षण विभाग, नवी दिल्ली यांनी दिनांक ०९.०६.२०१७ नुसार त्यांच्या लेखापरिक्षण अहवालामध्ये त्यांनी हा मुद्या उपस्थितीत केलेला आहे.

तथापी मा. अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ तथा मा. मंत्री आदिवासी विकास विभाग यांचे कामकाजासाठी महामंडळाने वर्ग करण्यात आलेल्या वाहनांचे इंधन/ऑईल/दुरूस्ती करीता माहे फेब्रुवारी, २०२१ ते माहे जुन, २०२१ पर्यंत रूपये.१० लाख मात्र रक्कमेचा निधी मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांच्या मान्यतेनुसार मुख्य कार्यालयाकडुन वर्ग / अदायगी करण्यात आलेला आहे.

तरी मा. अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ तथा मा. मंत्री आदिवासी विकास विभाग यांचेकडील वाहनांचे इंधन/ऑईल/दुरूस्ती इ. खर्च भागविणेकरीता माहे फेब्रुवारी, २०२१ ते माहे जुन, २०२१ पर्यंत झालेला खर्च रूपये.१० दहा लाख मात्र व पुढील कालावधीसाठी लागणारा प्रस्तावित खर्च रूपये. ५ लाख असे एकुण रूपये. १५ लाख मात्र यास कार्योत्तर / प्रशासकीय मान्यता मिळणेस तथा पुढील निर्णयास्तव विषय सविनय सादर.

**ठराव क्रमांक २० :** मा. अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ तथा मा. मंत्री आदिवासी विकास विभाग यांचे कामकाजासाठी महामंडळाने वर्ग करण्यात आलेल्या वाहनांचे इंधन/ऑईल / दुरूस्ती करीता माहे फेब्रुवारी, २०२१ पासुन ते माहे जुन, २०२१ पर्यंत झालेला खर्च रूपये. १०.०० (अक्षरी रक्कम. दहा लाख मात्र) इतक्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रस्तावित खर्च रूपये. ५.०० (अक्षरी रक्कम. पाच लाख मात्र) इतक्या खर्चास संचालक मंडळ सभा प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, मुख्य कार्यालय, नाशिक यांना प्रदान करण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री. मधुकर निंबाजी काठे, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. धनराज हरीभाऊ महाले, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक २१ : मा. उपाध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ यांचेकडे वर्ग करण्यात आलेले कार्यालयीन वाहन (इनोव्हा) क्र. एम एच १५ ई एक्स ४६४३ चे इंधन/ऑईल/दुरूस्ती इ. करीता झालेल्या खर्चास कार्योत्तर/प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : आविम-२०१५/ प्र.क्र.१६१(भाग-१)/का.३ मंत्रालय मुंबई- ४०० ०३२. दि. ०५ मार्च, २०२० नुसार महामंडळाच्या उपाध्यक्ष पदी प्रा. वसंत चि. पुरके, यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. मा. उपाध्यक्ष यांनी वाहन (इनोव्हा) क्र. एम एच १५ ईएक्स ४६४३ हे चांगल्या स्थितीत दुरूस्ती करून मुख्यालय यवतमाळ येथे पाठविण्यात यावे असे दिनांक ११/०३/२०२० रोजी महाव्यवस्थापक (गोंडवन) नागपुर यांना निर्देश दिलेले आहेत.

वित्त विभाग शासन निर्णय क्र. शाआउ-१०.१०/ प्र.क्र.९६/१०/सा.उ., दिनांक १३ मार्च, २०१२ नुसार राज्य सार्वजनिक उपक्रमाचे अंशकालीन व राज्यमंत्री/मंत्री दर्जा प्राप्त अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळाचे सदस्य यांना तसेच राज्य स्तरीय समिती/परिषद/आयोग यांचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांना कार्यालयीन कामकाजासाठी वाहन सुविधा चालकासह उपलब्ध करून दिल्यास इंधन व तेलावरील खर्च प्रतिवर्ष रूपये ७२,०००/- पर्यन्त मर्यादित अनुज्ञेय आहे.

तथापी मा. उपाध्यक्ष यांना महामंडळाचे (इनोव्हा) क्र. एम एच १५ ई एक्स ४६४३ हे उपलब्ध करून देणेस व त्यासाठी लागणाऱ्या इंधन/ऑईल खर्चास मा. अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ यांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ यांचे मागणीनुसार मा. उपाध्यक्ष यांचेकडे वर्ग करण्यात आलेले वाहनांचे इंधन/ऑईल/दुरूस्ती खर्चासाठी माहे फेब्रुवारी, २०२१ ते माहे सप्टेंबर, २०२१ पर्यंत रूपये.३,५१,६१८/- मात्र रक्कमेचा निधी मुख्य कार्यालयाकडुन प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ यांना वर्ग करण्यात आलेला आहे.

तरी सदर वाहनाचे इंधन/ऑईल/दुरूस्ती वरील प्रमाणे झालेल्या खर्चास कार्योत्तर/प्रशासकीय मान्यता मिळणेस विषय सविनय सादर.

**ठराव क्रमांक २१ :** मा. उपाध्यक्ष यांचेकडे वर्ग करण्यात आलेले वाहन (इनोव्हा) क्र. एम एच १५ ईएक्स ४६४३ या वाहनांचे इंधन/ऑईल/दुरूस्ती खर्चासाठी माहे फेब्रुवारी, २०२१ ते माहे सप्टेंबर, २०२१ पर्यंत झालेला खर्च रूपये.३,५१,६१८/- (अक्षरी रक्कम. तीन लाख एकावन्न हजार मात्र) एवढया खर्चास संचालक मंडळ सभा मान्यता देत आहे. पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, मुख्य कार्यालय, नाशिक यांना प्रदान करण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. अशोक भाऊराव मंगाम, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक २२ : महामंडळाच्या सादनिकांची दुरूस्ती करणेस व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत.**

वरील विषयान्वये आदिवासी विकास महामंडळाच्या मालकीच्या सदनिका (फ्लॅट) खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | सोसायटीचे नाव | फ्लॅट क्रमांक | एकुण सदनिका | सद्यास्थिती |
|---|---|---|---|---|
| १. | पुरणस्मृती को. ऑप हौसिंग सोसा. नरहर नगर, आंबेडकर नगर समोर, नाशिक | २३-१ | ०२ | रीक्त |
| २. | सुगंधी कॉ. ऑप. हॉ. सोसा. लि. नरहर नगर, पुणे रोड, नाशिक | २३-३ | ०२ | रीक्त |
| ३. | सुवर्णप्रभा अपार्टमेंन्ट, टागोर नगर नरहर नगर, आंबेडकर नगर समोर, नाशिक | २७-२, | ०१ | रीक्त |
| ४. | रेणुकानगर सहकारी गृह निर्माण संस्था लि. वडाळा नाका, पुणे रोड, नाशिक | डि/३-१४,१५,१६ | ०३ | रीक्त |
| | एकुण | - | ०८ | |

वरील प्रमाणे अ.क्र. १ ते ३ मधील एकुण ५ सदनिकांची दुरूस्ती करणेसाठी दिनांक ०९ मार्च, २०१२ शासन निर्णयान्वये सन २०११-१२ च्य मंजुर भागभांडवल निधीमधुन रू. १५.०० (अक्षरी रूपये. पंधरा लक्ष मात्र) निधी उपलब्ध करून दिलेला आहे. परंतु या शासन निर्णयानुसार रेणुकानगर येथील सदनिकांची (फ्लॅटची) दुरूस्ती करीता निधी प्राप्त झालेला नाही.

तथापी महामंडळाचे संचालक महोदय हे मुख्य कार्यालय, नाशिक येथे वेळोवेळी सभेसाठी उपस्थित / दौऱ्यावर असतांना राहत असतात तसेच प्रादेशिक कार्यालयाचे अधिकारी / कर्मचारी हे सुध्दा कार्यालयीन कामकाजासाठी बैठकीसाठी वेळोवेळी मुख्य कार्यालयास उपस्थित राहतात. त्यामुळे त्यांची राहण्याची गैरसोय होऊ नये याकारणास्तव त्यांना राहण्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणुन महामंडळाच्या सर्व एकुण ८ सदनिकांची दुरूस्ती करणे प्रस्तावित असल्याने दिनांक १५/०२/२०२० च्या पत्रानुसार अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांचेकडुन दुरूस्ती खर्चाचे अंदाजपत्रक मागविण्यात आलेले आहे.

त्यानुसार दिनांक १२/०६/२०२० रोजी कार्यकारी अभियंता सा.बां. (आ.) विभाग, धुळे महामंडळाच्या सदनिकांची दुरुस्ती खर्चाचे अंदाजपत्रक या कार्यालयास सादर केलेले असुन दुरूस्ती खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे

Scanned with CamScanner

| अ. क्र. | सोसायटीचे नाव | सदनिका (फ्लॅट) क्रमांक | दुरूस्ती खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| १. | रेणुकानगर सहकारी गृह निर्माण संस्था लि. वडाळा नाका, पुणे रोड, नाशिक | डि/३- १४ | रू. २,४८,०००/- |
| | | डि/३- १५,१६ | रू. ४,१२,०००/- |
| २. | पुरणस्मृती को. ऑप हौसिंग सोसा. नरहर नगर, आंबेडकर नगर समोर, नाशिक | २३-१ | रू. २,४३,०००/- |
| | | २३-३ | रू. २,४३,०००/- |
| ३. | सुगंधी कॉ. ऑप. हॉ. सोसा. लि. नरहर नगर, पुणे रोड, नाशिक | २७-२ | रू. २,९८,०००/- |
| | | २८-६ | रू. २,९८,०००/- |
| ४. | सुवर्णप्रभा अपार्टमेन्ट, टागोर नगर नरहर नगर, आंबेडकर नगर समोर, नाशिक | १६-२ | रू. ३,२००००/- |
| | एकुण | ०८ | रूपये २०,६२०००/- |

उपरोक्त तक्त्यानुसार महामंडळाच्या मालकीच्या एकुण ८ सदनिकांची दुरूस्ती करणेसाठी कार्यकारी अभियंता सा.बां. (आ.) विभाग, धुळे यांचे अंदाजपत्रकानुसार एकुण लागणारा खर्च रक्कम रूपये.२०,६२,०००/- (अक्षरी रूपये. वीस लाख बासष्ट हजार मात्र) मात्र दिलेला आहे.

तथापी महामंडळाचे पोटनियम/उपविधी क्र. २४ (ब) १ प्रामाणे दिलेल्या कार्यपध्दतीनुसार महामंडळाचे कारभार चालविण्याकरीता कोणतीही इमारत किंवा जमीन विकत स्व:च्या मालकीची अगर भाडयाने घेणे, जमीन, इमारती, विकत, खरेदी अगर लिजवर अगर अक्वायर करून कोणा इसमाकडुन घेणे किंवा महाराष्ट्र राज्यात कोठेही इमारत उभी करून बांधुन आणि बांधकाम करून महामंडळाचे उपयोगासाठी दुकाने अगर गोदामे, ऑफिस किंवा कचेऱ्या किंवा राहण्याच्या जागा, भाडे अदा करणे, फर्निचर व इतर आवश्यक गोष्टी बोर्डाला योग्य व सोयीची वाटेल, अशाप्रकारे अधिकार संचालक मंडळाला आहेत.

त्यानुसार वरील प्रमाणे एकुण ०८ सदनिकांची दुरूस्ती करणेस व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास दिनांक २२/०१/२०२१ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेतील मंजुर ठराव क्र. २० नुसार लवकरात लवकर निविदा प्रक्रीया राबवुन दुरूस्ती कामे सुरू करणेबाबत अधिक्षक अभियंता कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांना मु.का. नाशिक पत्र क्र. आविम/प्रशा/जनरल/सदनिका दुरूस्ती/४८२१/२०२१ दिनांक ०९/०२/२०२१ नुसार पत्र देण्यात आलेले होते.

तथापी कार्यकारी अभियंता सा.बां. (आ.) विभाग, धुळे यांनी सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक या कार्यालयास सादर केलेले असुन सदर अंदाजपत्रकानुसार दिलेला खर्च रूपये.२६.१७ लक्ष मात्र यास प्रशासकीय मान्यता मिळुन सदर रक्कम या कार्यालयास जमा करण्यात यावी असे पत्र क्र. प्रशा/१५८०/२०२१ दिनांक १७/०५/२०२१ नुसार कार्यकारी अभियंता सा.बां. (आ.) विभाग, धुळे यांनी या कार्यालयास कळविले आहे.

Scanned with CamScanner

तरी महामंडळांच्या सदनिकांची दुरूस्ती करणेसाठी कार्यकारी अभियंता सा.बां. (आ.) विभाग, धुळे यांनी सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रकानुसार दिलेला खर्च रूपये.२६.१७ लाख मात्र खर्चास प्रशासकीय मंजुरी मिळणेस तथा पुढील निर्णयास्तव विषय सविनय सादर.

**ठराव क्रमांक २२ :** महामंडळाच्या मालकीच्या एकुण ०८ सदनिकांची दुरूस्ती करणेकामी व त्यासाठी कार्यकारी अभियंता सा.बां. (आ.) विभाग, धुळे यांचे अंदाजपत्रकानुसार लागणारा एकुण खर्च रक्कम रूपये २६.१७ (अक्षरी रक्कम. सव्वीस लाख सतरा हजार मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता संचालक मंडळ सभा मान्यता देत आहे. तसेच सदर सदनिका लवकरात लवकर दुरूस्ती कामे हाती घेणेबाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहाकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, मुख्य कार्यालय, नाशिक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. अशोक भाऊराव मंगाम, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक २३ : मुख्य कार्यालय व प्रादेशिक कार्यालयासाठी नविन वाहने (स्कॉर्पिओ/बोलेरो जीप) प्रकारातील वाहने खरेदी करणेसाठी लागणाऱ्या वाढीव खर्चास कार्योत्तर / प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

महामंडळाचे प्रादेशिक कार्यालय व उप प्रादेशिक कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये महामंडळ राबवित असलेल्या योजनांची माहिती घेणे, खरेदी केंद्रावर भेटी देणे तसेच इतर कार्यालयीन कामकाजाकरीता प्रादेशिक व्यवस्थापक व उप प्रादेशिक व्यवस्थापक यांचेकरीता महामंडळाने वेळोवेळी वाहने (जीप/जीप पीकअप) खरेदी केलेली आहेत.

तथापी काही प्रादेशिक कार्यालयाकडील वाहने वारंवार नादुरूस्त होत असल्याने खरेदी केंद्रास भेटी देणे, व इतर कार्यालयीन कामकाजासाठी वेळेवर उपस्थित राहणेस विलंब होत असल्याने अडचण निमार्ण होत आहे. तसेच सदर वाहनांचा वेळोवेळी होत असलेला दुरूस्ती खर्च नियमापेक्षा जास्त होत असुन महामंडळास परवडत नसल्यामुळे नविन वाहने उपलब्ध करून देणेबाबत प्रादेशिक कार्यालयाकडुन वेळोवेळी मागणी होत आहे. त्यानुसार नविन ०५ वाहने खरेदी करणेस व त्यासाठी प्रती वाहन रूपये.१० लाख मात्र असे एकुण ०५ वाहने खरेदी करणेसाठी लागणारा खर्च रूपये.५० पन्नास लक्ष मात्र पर्यंत दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेतील मंजुर ठराव क्र. ३४ नुसार खालीलप्रमाणे वाहने शासन नियमानुसार GEM पोर्टलवरुन खरेदी करणेचे प्रस्तावित आहे. तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.न. | वाहनाचा प्रकार | कार्यालयाचे नावं | वाहन खरेदी संख्या |
|---|---|---|---|
| १. | जीप (स्कॉर्पीओ) | मुख्य कार्यालय नाशिक | ०२ |
| ४. | जीप महिंद्रा बोलेरो | प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार | ०१ |
| ५. | जीप महिंद्रा बोलेरो | प्रादेशिक कार्यालय, भंडारा | ०१ |
| ६. | जीप महिंद्रा बोलेरो | प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली | ०१ |
| | **एकुण वाहने खरेदी संख्या -** | | **०५** |

Scanned with CamScanner

वरील प्रमाणे नविन ०२ स्कॉर्पिओ व ०३ बोलेरो जीप अशी एकुण ०५ वाहने GeM पोर्टलवरुन खरेदी करणेसाठी लागणारा खर्च हा महामंडळाला मिळत असलेल्या व्याजाच्या रक्कमेतुन / Rebewes / Depracition Fund मधुन रूपये.५० लक्ष पर्यंत रक्कम उपलब्ध करून देणेबाबत मा. अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ नाशिक यांनी दिलेली आहे.

तथापी वरील प्रमाणे एकुण ०५ वाहने GeM पोर्टलवरुन खरेदी करणेसाठी सोबतच्या कोटेशननुसार वाहनाची मुळ किंमतीनुसार एकुण रक्कम रूपये.४८ लक्ष खर्च होत आहे. त्यामध्ये RTO व Vehicle Insurance चा खर्च दिलेला नसुन सदर खर्च वेगळा करावा लागणार असुन याकरीता अंदाजे रूपये.११.५० लाख मात्र लागणार आहे.

तरी एकुण ०५ वाहने खरेदीसाठी रूपये.५९.५० लाक्ष मात्र खर्च अपेक्षित असुन रूपये.९.५० लाख मात्र खर्च जास्त लागणार आहे. सदर खर्चात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरील प्रमाणे नविन ०५ वाहने खरेदी करणेसाठी सर्व करांसह लागणारा वाढीव खर्च अंदाजे रूपये.६५ लाख मात्र हा महामंडळाला मिळत असलेल्या व्याजाच्या रक्कमेतुन / Rebewes / Depracition Fund मधुन भागविणेस कार्योत्तर / प्रशासकीय मंजुरी मिळणेस तथा पुढील निर्णयास्तव विषय सविनय सादर.

**ठराव क्रमांक २३ :** मुख्य कार्यालय तसेच प्रादेशिक कार्यालयाकडील कार्यालयीन वाहने जुनी झालेली असल्याने सदर वाहनांव्दारे कार्यालयीन बैठका तसेच कार्यालयीन दौरे करणेस अधिकाऱ्यांना व संचालक महोदयांना विलंब होत असल्याकरणाने वरील प्रमाणे वाहनांचे निर्लेखन करून सदर कार्यालयासाठी नविन ०५ वाहने खरेदी करणेस लागणारा वाढीव खर्च रूपये.६५.०० (अक्षरी रक्कम. पासष्ट लाख मात्र) या खर्चास व सदरचा खर्च हा महामंडळाला मिळत असलेल्या व्याजाच्या रक्कमेतुन / Rebewes / Depracition Fund मधुन भागविणेस सदर संचालक मंडळ सभा प्रशासकीय मान्यता देत आहे. आहे. पुढील कार्यवाहीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री.केवळराम तुळशीराम काळे, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. मधुकर निंबाजी काठे, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक २४ : मुख्य कार्यालय, नाशिक तसेच विभागीय कार्यालय, नागपुर व प्रादेशिक कार्यालय अधिनिस्त असलेले कार्यालयीन वाहने (कार/जीप) हे निर्लेख करून त्याऐवजी सदर कार्यालयासाठी नविन वाहने (कार/जीप) प्रकारातील खरेदी करणेसाठी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

आदिवासी विकास महामंडळाचे मुख्य कार्यालयातील अधिकाऱ्यांसाठी कार्यालयीन कामकाजाकरीता महामंडळाने सन २००९-१० मध्ये स्कॉपिओ जीप या प्रकारातील वाहने खरेदी केलेली आहे. तसेच विभागीय कार्यालय, नागपुर कार्यक्षेत्रामध्ये मंत्रालयीन अधिकारी/महामंडळाचे अधिकारी यांचे दौऱ्याकरीता महाव्यवस्थापक (गोंडवन) विभागीय कार्यालय, नागपुर यांचेकडे कार्यालयीन वाहन एक वाहन वर्ग करण्यात आलेले आहे.

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | वाहनाचा प्रकार व वाहन क्र. | वाहन खरेदी वर्षे | वाहनाचे आज अखेर आयुष्य | वाहनाची आज आखेर झालेली धावाई |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुख्य कार्यालय, नाशिक | वाहन (स्कॉपिओ) क्र. एए ४५४६ | २०१० | ११ वर्षे | ३९८२६६ |
| | | वाहन (स्कॉपिओ) क्र. एए ४१४७ | २००९ | १२ वर्षे | ३९७५४० |
| | | वाहन (स्कॉपिओ) क्र. एए ४१४८ | २००९ | १२ वर्षे | ३८५७६१ |
| | विभागीय कार्यालय, नागपुर | वाहन (इनोव्हा) क्र. एम एच १५ एए २३७ | २०११ | १० वर्षे | ३९८२६१ |

वरील वाहनांना आज अखेर ११ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असुन सदर वाहनाची धावाई ३,५०,००० कि.मी. पेक्षा जास्त झालेली आहे.

सबब मुख्य कार्यालयातील अधिकाऱ्यांना वेळोवेळी मंत्रालय मुंबई येथे कार्यालयीन बैठकीसाठी तसेच कार्यालयीन कामकाजाकरीता प्रादेशिक कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये दौऱ्याकरीता जावे लागत असुन सदर वाहने वारंवार नादुरूस्त होत असल्यामुळे सदर कार्यालयीन दौरे तसेच मंत्रालयीन बैठकीसाठी वेळेवर

Scanned with CamScanner

जाणे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे सदर वाहनांचे वेळोवळी दुरूस्ती कामे निघत असुन ते आर्थिक दृष्ट्या महामंडळाला परवडण्यासारखे नाही.

त्याचप्रमाणे प्रादेशिक कार्यालय व उप प्रादेशिक कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये महामंडळ राबवित असलेल्या योजनांची माहिती घेणे, खरेदी केंद्रावर भेटी देणे तसेच इतर कार्यालयीन कामकाजाकरीता प्रादेशिक व्यवस्थापक व उप प्रादेशिक व्यवस्थापक यांचेकरीता महामंडळाने सन २०१०-११ मध्ये (जीप/जीप पीकअप) या प्रकारातील वाहने खरेदी केलेली आहेत.

तथापी काही प्रादेशिक कार्यालयाकडील वाहने वारंवार नादुरूस्त होत असल्याने खरेदी केंद्रास भेटी देणे, व इतर कार्यालयीन कामकाजासाठी वेळेवर उपस्थित राहणेस विलंब होत असल्याने अडचण निमार्ण होत आहे. तसेच सदर वाहनांचा वेळोवेळी होत असलेला दुरूस्ती खर्च नियमापेक्षा जास्त होत असुन महामंडळास परवडत नसल्यामुळे नविन वाहने उपलब्ध करून देणेबाबत प्रादेशिक कार्यालयाकडुन वेळोवेळी मागणी होत आहे. जुनी झालेल्या वाहनांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | वाहनाचा प्रकार व वाहन क्र. | वाहन खरेदी वर्षे | वाहनाचे आज अखेर आयुष्य | वाहनाची आज आखेर झालेली धावाई |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रादेशिक कार्यालय, जुन्नर | वाहन (जीप) क्र. एए ५१९६ | २०११ | १० वर्षे | ३७८४८५ |
| २. | प्रादेशिक कार्यालय, यवतामळ | वाहन (जीप) क्र. एए ५१९८ | २०११ | | ३६९८८८ |
| ३. | प्रादेशिक कार्यालय, चंद्रपुर | वाहन (जीप) क्र. एए ५१९७ | २०११ | १० वर्षे | ३७९६७७ |
| ४. | प्रादेशिक कार्यालय, धारणी | वाहन (जीप) क्र. एए २१९ | २०१० | १० वर्षे | ४८८९६८ |
| ५. | उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी उच्च श्रेणी | वाहन (जीप) क्र. एए ३७७ | २०१२ | १० वर्षे | ३४०५४० |

Scanned with CamScanner

वरील तक्याचे अवलोकन केला असता वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-१०९१/प्र.क्र.१२/ विनियम, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२, दिनांक १, ऑक्टोबर १९९१. नुसार उपरोक्त वाहनांचे आज अखेर आयुष्यमान पुर्ण झालेले असल्याचे दिसुन येत आहे.

तरी सदर वाहनांचे नियमानुसार निर्लेखन करून RTO कार्यालयाकडुन मुल्यांकन प्रमाणपत्र प्राप्त करून सदर वाहनांची कार्यालयीन पध्दतीनुसार ऑनलाईन किंवा/ऑफलाईन पध्दतीने विक्री करून उपरोक्त कार्यालयांसाठी कार्यालयीन कामकाजाकरीता नियमानुसार नविन वाहने (जीप) प्रकारातील खरेदी करणेसाठी मान्यता मिळणेस तथा पुढील निर्णय होणेस विषय सविनय सादर.

**ठराव क्रमांक २४ :** मुख्य कार्यालयातील तसेच प्रादेशिक कार्यालयाकडील कार्यालयीन वाहने जुनी झालेली असल्याने सदर वाहनांव्दारे कार्यालयीन बैठका तसेच कार्यालयीन दौरे करणेस अधिकाऱ्यांना व संचालक महोदयांना विलंब होत आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-१०९१/प्र.क्र.१२/ विनियम, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२, दिनांक १, ऑक्टोबर १९९१. नुसार वरील प्रमाणे वाहनांचे आज अखेर आयुष्यमान पुर्ण झालेले आहे. त्या वाहनांचे नियमानुसार निर्लेखन करून RTO कार्यालयाकडुन मुल्यांकन प्रमाणपत्र प्राप्त करून सदर वाहनांची कार्यालयीन पध्दतीनुसार ऑनलाईन किंवा/ऑफलाईन पध्दतीने विक्री करून उपरोक्त कार्यालयांसाठी कार्यालयीन कामकाजाकरीता नियमानुसार नविन वाहने (जीप) प्रकारातील खरेदी करणेसाठी अंदाजित लागणारा रूपये. १.०० (अक्षरी रक्कम. एक कोटी मात्र) एवढया रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. पुढील कार्यवाहीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** : मा. श्री.भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य

**अनुमोदक** : मा. श्री. मधुकर निंबाजी काठे, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

विषय क्रमांक २५ : सन २०२०-२१ चा वार्षिक अहवाल छपाई करणेस, सन २०२१-२२ करीता कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणेस व सन २०२२ ची दैनंदिनी (डायरी) छपाई तसेच सन २०२२ ची दिनदर्शिका छपाई करणेस प्रशासकीय/कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत.

**अ. सन २०२०-२१ चा वार्षिक अहवाल छपाई करणेस व त्याकरीता येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचा सन २०२०-२१ चा ४८ वा वार्षिक अहवाल छपाई करावयाचा असुन छपाई केलेला वार्षिक अहवाल सहाकर कायद्यानुसार महामंडळाच्या संलग्न सभासद संस्थांना (आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था) वाटप करणे तसेच शासनास अहवाल पाठविणे बंधनकारक आहे.

तरी सन २०२०-२१ या वर्षाचा ४८ वा वार्षिक अहवाल १०० नग उच्च प्रतिचे व १४०० नग साधारण दर्जाचे असे एकुण १५०० नग छपाई करून घेणेस व त्यासाठी होणारा अंदाजित खर्च रूपये ३,००,०००/- पर्यंत प्रशासकीय मान्यतेस सादर.

**ब. मुख्य कार्यालयासाठी सन २०२१-२०२२ करीता आवश्यक लागणारी कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव सादर.**

मुख्य कार्यालयातील तिन्ही विभागाकरीता (प्रशासन/वित्त/विपणन) सन २०२०-२०२१ मध्ये लागणारी स्टेशनरी खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. सदरची स्टेशनरी शासन निर्णयानुसार GeM पोर्टलवरून खरेदी करावयाची असुन याकरीता अंदाजे रक्कम रूपये ३,००,०००/- लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी सदर स्टेशनरी खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यतेस सविनय सादर.

**क. सन २०२२ ची दैनंदिनी (डायरी), छपाई करणेस व त्याकरीता येणाऱ्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

महामंडळाची सन २०२२ ची दैनंदिनी छपाई करण्याचे प्रस्तावित असल्याने सदर दैनंदिनी छपाई करणेस अंदाजे खर्च रूपये ३,००,०००/- मात्र च्या जवळपास लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी सदर दैनंदिनी छपाई करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यतेस सविनय सादर.

Scanned with CamScanner

ड. **महामंडळाची सन २०२२ ची दिनदर्शिका छपाई करणेस प्रशासकीय/कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत.**

महामंडळाची सन २०२२ ची दिनदर्शिका छपाई करण्याचे प्रस्तावित असल्याने सदर दिनदर्शिका छपाई करणेस अंदाजे खर्च रूपये ३,००,०००/- मात्र च्या जवळपास लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी सदर दिनदर्शिका छपाई करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यतेस सविनय सादर.

**ठराव क्रमांक २५ :** सन २०२०-२१ चा वार्षिक अहवाल छपाई करणेस रूपये.३.०० (अक्षरी रक्कम. तीन लाख मात्र) पर्यंत रक्कमेस तसेच महामंडळाची सन २०२१ ची दैनंदिनी (डायरी) चांगल्या प्रतीची छपाई करावी तसेच डायरीचे कव्हर पेजवरील नावे एम्बॉसिंग मध्ये करावीत असे संचालक मंडळ निर्देश देत आहेत. तसेच त्यासाठी लागणारा अंदाजित खर्च रूपये.३.५० (अक्षरी रक्कम. तीन लाख पन्नास हजार मात्र) रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

तसेच महामंडळाचे सन २०२२ ची दिनदर्शिका छपाई करणेस लागणारा अंदाजित खर्च रूपये.३.०० (अक्षरी रूपये. तीन लाख मात्र) पर्यंत रक्कमेस तसेच प्रशासन, वित्त व विपणन विभागाकरीता सन २०२०-२०२१ मध्ये लागणारी स्टेशनरी खरेदी करणेसाठी लागणारा खर्च रूपये.२.५० मात्र इतक्या रक्कमेस सदर संचालक मंडळ सभा मान्यता देण्यात येत आहे. पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** : मा. श्रीमती मिनाक्षी अर्जुनराव वट्टी, संचालक सदस्य

**अनुमोदक** : मा. श्री. प्रकाश तुळशीराम दडमल, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक २६ : महामंडळाकडील व्दार वितरण योजना बंद झाल्यामुळे महामंडळाचे तसेच शासनाकडुन पुरविण्यात आलेले वाहने (एकुण ८४ ट्रक/मिनी ट्रक) वाहतुकीविना उभी असल्यामुळे सदर वाहनांचे होणारे आर्थिक नुकसानाबाबत.**

शासन निर्णय क्रमांक सावव्य-१०९२/प्र.क्र.६६८९/जापु-२८, मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२, दिनांक ३ मार्च १९९३ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील आदिवासी डोंगराळ व दुर्गम भागात व क्षेत्रातील तालुक्यात व्दारवितरण योजने अंतर्गत शासकीय गोदाम ते रास्तभाव दुकानापर्यंत रेशनिंग मालाची वाहतुक करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळास वेळोवेळी व्दार वितरण योजना सुरू करण्यात आलेली होती. व्दार वितरण योजनेचा माल वाहतुक करणेसाठी शासनाकडुन १६६ शासकीय वाहने परविण्यात आलेली होती. १६६ वाहनांपैकी आजमितीस फक्त १८ वाहने चालु स्थितीत कार्यरत

Scanned with CamScanner

असुन ९२ वाहने निर्लेखित करण्यात आलेली आहेत व ५६ वाहने बंद स्थितीत असुन सदर वाहने निर्लेखित करणेबाबत शासनास कळविण्यात आलेले आहे. तसेच याच कामासाठी महामंडळाने वेळोवेळी ६६ ट्रक/मिनी ट्रक खरेदी केलेले आहेत. शासनाकडील व महामंडळाच्या मालकीची अशी एकुण वाहने १८ + ६६ = ८४ वाहने महामंडळाकडे उपलब्ध आहेत. सद्यास्थितीत शासनाकडील १८ वाहनांपैकी गडचिरोली जिल्हयातील अहेरी व एट्टापल्ली या तालुक्यात ०७ वाहनाव्दारे रेशनिंग मालाची वाहतुक करण्यात येत असुन उर्वरीत ११ वाहनांपैकी प्रादेशिक कार्यालय, नाशिक या कार्यालयाकडे ०४ व उप प्रादेशिक कार्यालय अहेरी या कार्यालयाकडे ०७ वाहने वाहतुकीविना उभी आहेत.

शासन निर्णय क्रमांक. शिवाप-१०१०/ प्रक्र.१९/ नाप- २८ दिनांक २३ फेब्रुवारी, २०१२ च्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी कार्यालयांमार्फत शासकीय गोदाम ते स्वस्त धान्य दुकानापर्यंत एकाच वाहतुक ठेकेदाराची नेमणुक करण्यात आलेली असुन सदर प्रक्रियेव्दारे नाशिक, अहमदनगर, पुणे, रायगड, ठाणे, पालघर, धुळे, नंदुरबार, जळगाव, अमरावती, यवतमाळ, नांदेड, चंद्रपुर, नागपुर, गोंदिया या जिल्हयात खाजगी वाहतुक ठेकेदाराची नेमणुक संबंधित जिल्हाधिकारी यांनी केल्यामुळे त्यांचेमार्फत रेशनिंग मालाचे वितरण करण्यात येत आहे.

महामंडळाकडील व्दार वितरण योजना बंद केल्यामुळे शासनाचे महामंडळाकडे असलेले सुस्थितीतील ११ वाहने व महामंडळाच्या मालकीचे ६६ असे एकुण ७७ ट्रक/मिनीट्रक व्दारवितरण शिधावस्तु वाहतुकी अभावी मागील चार वर्षापासुन उभी आहेत. सदर वाहनांपैकी महामंडळाकडील ६० च्या आसपास वाहने सुस्थितीतील असुन नविन आहेत. सदर वाहने वाहतुकी अभावी उभी ठेवल्यास खराब होण्याची व नाहक भविष्यात महामंडळाचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आदिवासी उपायोजना क्षेत्रात आदिवासी विकास महामंडळाने व्दारवितरण योजनेसाठी शिधावस्तु व्दारपोहच करीता वाहने वेळेवर उपलब्ध करून व्दारवितरण योजनेसाठी संपुर्ण आदिवासी उपयोजना क्षेत्रात चांगल्या रितीने शिधावस्तु स्वस्त धान्य दुकानदारांचे व्दारपोहच केले आहे. सदर योजना राबविण्यासाठी महामंडळाकडे यंत्रणा उपलब्ध असल्याने दिनांक १९ ऑक्टोबर २०१३ चे आदिवासी विकास विभागाकडील अधिसुचनेत नमुद जिल्हे नाशिक, ठाणे, रायगड, नंदुरबार, अमरावती, चंद्रपुर, नांदेड व गडचिरोली या आठ जिल्हयातील २९ तालुक्यामध्ये संबंधित जिल्हाधिकारी यांनी ठेकेदारांना मंजुर केलेल्या दराने पुरवटा गोदाम ते रास्त भाव दुकानांपर्यत शिधावस्तु पुरवठा करणेस महामंडळ तयार आहे. त्यासाठी खालील प्रमाणे शासनाकडील व महामंडळाकडील जिल्हानिहाय व प्रादेशिक कार्यालय निहाय चालु स्थितीतील वाहनांचा तपशिल खालीलप्रमाणे

Scanned with CamScanner

| अ. क्र. | प्रादेशिक कार्यालयाचे नाव | संबंधित जिल्हे | शासनाकडील वाहनांची संख्या | महामंडळाकडील वाहनांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | प्रा. का. नाशिक | नाशिक | ०४ | १८ |
| २ | प्रा. का. जुन्नर | पुणे/अ.नगर | ०० | ०४ |
| ३ | प्रा. का. जव्हार | ठाणे/पालघर/रायगड | ०० | ०७ |
| ४ | प्रा. का. नंदुरबार | नंदुरबार/धुळे/जळगांव | ०० | ०७ |
| ५ | प्रा. का. भंडारा | नागपुर/गोंदिया | ०० | १० |
| ६ | प्रा. का. चंद्रपुर | चंद्रपुर | ०० | ०१ |
| ७ | प्रा. का. गडचिरोली | गडचिरोली | ०० | ०४ |
| ८ | प्रा. का. यवतमाळ | यवतमाळ/नांदेड | ०० | ०६ |
| ९ | प्रा. का. धारणी | अमरावती | ०० | ०५ |
| १० | उप प्रा. का. अहेरी | गडचिरोली | १४ | ०४ |
| | **एकुण वाहन संख्या** | | **१८** | **६६** |

उपरोक्त तक्त्यानुसार शासनाकडील १८ वाहने व महामंडळाकडील ६६ वाहने अशी एकुण ८४ वाहने महामंडळाकडे चालु स्थितीत उपलब्ध असुन दिनांक १९ ऑक्टोबर, २०१३ च्या अधिसुचनेनुसार खालील तपशिला प्रमाणे ०८ जिल्हयातील २९ तालुक्यांमध्ये व्दारवितरण योजनेचे कामकाज करण्यास महामंडळ तयार आहेत. तपशिल खालील प्रमाणे

| अ.क्र. | प्रादेशिक कार्यालयाचे नाव | संबंधित जिल्हा | अंतर्गत तालुके |
|---|---|---|---|
| १ | प्रा. का. नाशिक | नाशिक | पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर |
| २ | प्रा. का. जव्हार | पालघर | डहाणु, तलासरी, जव्हार, मोखाडा, विक्रमगड |
| | | रायगड | कर्जत |
| ३ | प्रा. का. नंदुरबार | नंदुरबार | अक्कलकुवा, तळोदा, अक्राणी (धडगांव) |
| ४ | प्रा. का. यवतमाळ | नांदेड | किनवट, माहुरु |

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | प्रा. का. चंद्रपुर | चंद्रपुर | गोंडपिंप्री |
| ६ | प्रा. का. गडचिरोली | गडचिरोली | सिरोंचा, अहेरी, एटापल्ली, भामरागड, मुलचेरा, गडचिरोली, धानोरा, कोरची, आरमोरी, कुरखेडा, वडसा, चामोर्शी |
| ७ | प्रा. का. धारणी | अमरावती | चिखलदरा, धारणी |

वरील कार्यक्षेत्रांतर्गत व्दारवितरण योजना महामंडळामार्फत संबंधित जिल्हाधिकारी यांनी मंजुर केलेल्या दरानुसार महामंडळ वाहतुक करण्यास तयार आहे.

वरील प्रमाणे ०८ जिल्हयातील २९ तालुक्याअंतर्गत व्दारवितरण वाहतुकीचे काम महामंडळास मिळावे या करीता मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई- ३२ यांचेकडे या कार्यालयाने प्रस्ताव क्र. आविम/प्रशा/वाहन विभाग/४८९७/२०१८ दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ नुसार सादर केलेला आहे. परंतु सदरील प्रस्तावाबाबत अद्यापही कोणताही निर्णय झालेला नाही.

सबब महामंडळाकडील वाहने वाहतुकीच्या कामाविना उभी असुन खराब होत असुन या वाहनावर वर्षाला (विमा/रोड टॅक्स/वाहतुक परवाना) इत्यादींवर मोठया प्रमाणात खर्च होत आहे. सदरचा खर्च शासनाकडुन प्राप्त होत नसल्याने महामंडळाला भागवावा लागत असल्याने याचा आर्थिक भुर्दंड महामंडळाला सहन करावा लागत आहे.

महामंडळाकडील वाहनांची आवश्यकता असल्यास सदर वाहने वर्ग करणेचा महामंडळाचा मानस आहे तरी सदर वाहने (ट्रक) आपण घेण्यास तयार आहात का असल्यास तसा प्रस्ताव या कार्यालयास उलट टपाली सादर करणेबाबत मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक व मा. मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडे या कार्यालयाने प्रस्ताव क्र. आविम/प्रशा/वाहन विभाग/वा.वर्ग/१३५६/ २०२० दिनांक २८/०४/२०२० नुसार प्रस्ताव सादर केलेला आहे. परंतु याबाबत त्यांचेकडुन प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

करीता उपरोक्त विषयाचे अवलोकन होऊन सदर वाहनांबाबत योग्य निर्णय तथा आदेश होणेस सदर विषय संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ सविनय सादर.

**ठराव क्रमांक २६ :** महामंडळाकडील व्दार वितरण योजना बंद झाल्यामुळे वरील प्रमाणे शासनाकडील १८ व महामंडळाकडील ६६ अशी एकुण ८४ चालुस्थितीतील वाहने बंद स्थितीत उभे आहेत. सदर वाहने वाहतुकीच्या कामाविना उभी असुन खराब होत असुन या वाहनावर दर वर्षाला (विमा/रोड टॅक्स/वाहतुक परवाना, वाहन चालकांचा पगार) इत्यादींवर मोठया प्रमाणात खर्च होत असुन याचा आर्थिक भुर्दंड महामंडळाला/शासनाला सहन करावा लागत आहे.

तरी दिनांक १९ ऑक्टोबर, २०१३ च्या अधिसुचनेनुसार वरील तपशिला प्रमाणे ०८ जिल्हयातील २९ तालुक्यांमध्ये व्दारवितरण योजनेचे कामकाज करण्यास महामंडळ तयार आहे. तसेच सदर वाहने वाहतुकीविना उभी राहिल्यास शासनाचे मोठया प्रमाणावर

Scanned with CamScanner

आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी याबाबत शासनास प्रस्ताव सादर करणेस संचालक मंडळ सभा प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. पुढील कार्यवाहीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. धनराज हरिभाऊ महाले, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक २७ : मुख्य कार्यालय, नाशिक येथील संचालक कक्षामध्ये/दालनामध्ये नविन AC बसविणेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

आदिवासी विकास महामंडळाचे मुख्य कार्यालय, नाशिक येथील संचालक कक्षामध्ये/दालनामध्ये बसविण्यात आलेला AC जुना असुन बंद पडत असल्यामुळे त्याची वारंवार दुरूस्ती कामे करावी लागत आहेत. मात्र सदर AC दुरूस्ती केल्यांनतरही नादुरूस्त होत असल्याने नविन AC बसविणेबाबत दिनांक २६ जुन, २०२१ रोजी मा. संचालक महोदयांनी मौखिक निर्देश दिलेले आहेत.

सदर दालनामध्ये नविन AC बसविणेसाठी स्थानिकच्या अधिकृत नामांकित कंपनीच्या डिलरकडुन नविन AC खरेदी खर्चाचे अंदाजपत्रक घेतले असता नविन AC खरेदी करणेसाठी सर्व करांसह अंदाजे रूपये.५०,०००/- मात्र जवळपास खर्च लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी शासनाचे नियामानुसार GeM पोर्टलवरून किंवा कोटेशन / दरपत्रके मागवुन नविन AC खरेदी करणेसाठी लागणारा खर्च रूपये.५०,०००/- मात्र यास प्रशासकीय मान्यता मिळणेस विषय सविनय सादर.

**ठराव क्रमांक २७ :** आदिवासी विकास महामंडळाचे मुख्य कार्यालय, नाशिक येथील संचालक कक्षामध्ये/दालनामध्ये नांमाकित कंपनीचा नविन AC कार्यालयीन पध्दतीचा अवलंब करून बसविणेस व त्यासाठी लागणारा अंदाजित खर्च रूपये. ५०,०००/- अक्षरी रक्कम- पन्नास हजार मात्र) खर्चास संचालक मंडळ प्रशासकीय मान्यता देत आहे. पुढील कार्यवाहीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री. मिनाक्षी अर्जुन वट्टी, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. अशोक भाऊराव मंगाम, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक २८ :** **मुख्य कार्यालय तसेच प्रादेशिक व उप प्रादेशिक कार्यालयांतर्गत असलेले जुने निरूपयोगी साहित्य (डेडस्टॉक) कार्यालयीन पध्दतीचा वापर करून ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीने निविदा व्दारे विक्री करणेस प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

मुख्य कार्यालय, नाशिक तसेच प्रादेशिक व उप प्रादेशिक कार्यालय तसेच विभागीय कार्यालसाठी कार्यालयीन कामकाजाकरीता वेळोवेळी संगणक व त्याचे उप साहित्य तसेच खुर्च्या, लोखंडी टेबल व कपाटे, झेरॉक्स मशिन, दुरध्वनी मशिन, AC मशिन, फॅन तसेच धान ,खरेदी करणेसाठी वजन काटे, व इतर आवश्यक किरकोळ साहित्य महामंडळाने खरेदी केलेले आहे.

सदर साहित्यापैकी बरेच साहित्य / मशिन जुने झालेले असल्याने बंद अवस्थेत असुन कार्यालयाच्या गोदामात जमा केलेले आहेत. तसेच कार्यालयीन वाहनासाठी वेळोवेळी बदली करण्यात आलेले टायर तसेच सर्व्हिसिंग केल्यानंतर निकामी झालेले स्पेअर पार्ट इ. निरूपयोगी साहित्य कार्यालयाच्या गोदामाध्ये पडुन आहे.

तरी महामंडळाकडील सर्व कार्यालयांअधिनिस्त असलेले वरील प्रमाणे जुने झालेले साहित्य / डेडस्टॉक कार्यालयीन पध्दतीचा अवलंब करून ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीने निविदा व्दारे विक्री करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेस विषय सविनय सादर.

**ठराव क्रमांक २८ :** मुख्य कार्यालय, नाशिक तसेच प्रादेशिक व उप प्रादेशिक कार्यालय तसेच विभागीय कार्यालसाठी कार्यालयीन कामकाजाकरीता वेळोवेळी खरेदी केलेले संगणक व त्याचे उप साहित्य तसेच खुर्च्या, लोखंडी टेबल व कपाटे, झेरॉक्स मशिन, दुरध्वनी मशिन, AC मशिन, फॅन तसेच धान खरेदी करणेसाठी वजन काटे, व इतर आवश्यक किरकोळ जुने झालेले साहित्य / डेडस्टॉक कार्यालयीन पध्दतीचा अवलंब करून ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीने निविदा व्दारे विक्री करणेस संचालक मंडळ प्रशासकीय मान्यता देत आहे. पुढील कार्यवाहीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री. मिनाक्षी अर्जुन वट्टी, संचालक सदस्या

**अनुमोदक** :- मा. श्री. अशोक भाऊराव मंगाम, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक २९ : आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था सक्षमीकरण करणेसाठी योजना.**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचे मार्फत केंद्र शासन पुरस्कृत आदिवासी शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कृषी माल/ उत्पादन किमान आधारभूत किंमतीत (MSP) खरेदी केले जाते. तसेच यातील काही कृषीउपज मालाला उदा. धान राज्य शासनाकडून अतिरिक्त बोनस मंजूर केला जातो. परंतू हि योजना राबवत असतांना आदिवासी विकास महामंडळास मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे दिसून येते. केंद्र शासनाची किमान आधारभुत किंमत (MSP) हि योजना नुकसान न होता राबवायची असेल तर खरेदी केलेला शेतमालाची खरेदी केंद्रावर साठवणूक करणेसाठी गोदामांची आवश्यक्यता आहे. या आधी आदिवासी विकास महामंडळाने (MSCTDC) खाजगी-सरकारी भागीदारी (Public Private Partnership) या तत्त्वावर ग्रामीण स्थरावर गोदाम बांधणेसाठी निविदा प्रसिध्द केली होती, परंतू हे प्रस्ताव Non-viable असल्यामुळे सदर निविदा रद्द करण्यात आली. त्यानंतर आदिवासी विकास महामंडळाने महामंडळाच्या ७ ठिकाणी असलेल्या जागेवर निविदा प्रक्रिया राबवून गोदाम बांधण्याचे काम सुरु केले आहे. यास सुमारे २५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. परंतू आदिवासी विकास महामंडळाकडे प्रत्येक खरेदी केंद्रावर गोदाम बांधणेसाठी लागणारी जागा उपलब्ध करुन त्या जागेवर गोदाम बांधणे शक्य नाही. ज्या आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था चांगले काम करत आहेत त्यांना जर निधी दिल्यास कमी कालावधीत व कमी खर्चात जास्त ओटा व शेड बांधणे शक्य होईल. या संस्थांनी जर आदिवासी विकास महामंडळामार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील आदिवासी शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला धान खरेदी करण्याचे नियोजन केल्यास त्यांना प्रोत्साहन देता येईल. यामुळे आदिवासी विकास महामंडळाला प्रत्येक ठिकाणी स्वत:चे खरेदी केंद्र सुरु करुन खरेदी करण्याची गरज भासणार नाही परिणामी महामंडळाचे होणारे नुकसान कमी होईल. तसेच महामंडळाच्या वतीने खरेदी करणाऱ्या आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थ सक्षम होतील.

या संकल्पनेवर आधारीत महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या आदिवासी विविध कार्यकारी संवा सहकारी संस्थांचे बळकटीकरण करणेसाठी आदिवासी विकास महामंडळ सदर योजना प्रस्तावित करत आहे. या योजनेस शासनाची मंजुरी मिळाली तर महाराष्ट्रातील बऱ्याचश्या आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था सक्षम होतील व केंद्र शासनाची किंमत आधारभुत किंमत (MSP) योजना चालवतांना महामंडळाचे धान साठवणकात होणारे नुकसान पण कमी होईल.

**पस्तावित योजनेचे निकष पुढील प्रमाणे.**

१. ज्या सआदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मागील ५ वर्षापासून आदिवासी विकास महामंडळाच्या (MSCTDC) वतीने किमान आधारभुत किंमत (MSP) हि योजना राबवत आहेत त्यांना प्रामुख्याने ही योजना लागू असेल.

२. या योजनेचा लाभ मिळवायचा असेल तर आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांनी मागील ५ वर्षात किमान ७०% आदिवासी सभासद शेतकऱ्यांचा धान खरेदी केलेला असावा. गैर आदिवासी शेतकऱ्यांचे प्रमाण असलेल्या आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

Scanned with CamScanner

३. किमान आधारभुत किंमत (MSP) या योजनेंतर्गत ज्या आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांनी १% पेक्षा कमी घट दाखवून खरेदी केलेल्या धानाची यशस्वीरित्या भरडाई केलेली असेल तर तेवढया प्रमाणात त्या संस्थेच्या नावे काल्पित लाभ (Notional Gain) दाखवले जाईल. संस्थेच्या कामाची मागिल १० वर्षाची माहिती/ रेकॉर्ड तपासून याबाबतचा आराखाडा तयार करण्यात येईल.

४. जर एखादया वर्षी आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेला १% पेक्षा जास्त नुकसान झाले तर आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था हे नुकसान त्यांनी कमाविलेल्या कल्पित लाभ (Notional Gain) मधून प्रत्यक्ष आलेला तोटा भरुन काढण्यासाठी आदिवासी विकास महामंडाकडे (MSCTDC) अर्ज करेल.

५. आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांनी सादर केलेल्या अर्जांची तपासणी करणेसाठी शासन स्थरावर एक समिती तयार करण्यात येईल. प्राप्त झालेले अर्जांची छाननी केल्यानंतर योग्य आढळून आलेले अर्ज मंजूर करण्यात येतील.

६. या योजनेत ज्या आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था चांगले कार्य करीत आहेत अश्या संस्थाना त्यांच्या कार्यक्षेत्रात १००० मे.टन क्षमतेचे ग्रामीण ओटा व शेड बांधणेसाठी प्रोत्साहन दिले जाईल. यासाठी अशा संस्थांना रु. १०/- लक्ष पर्यंतचा निधी दिला जाईल. जर गोदाम बांधकाम खर्च रु. १०/- लक्ष पेक्षा जास्त असेल तर संस्थेने स्वतःच्या निधीतून अथवा श्रमदानाने सदर बांधकाम करुन घ्यावे.

७. ओटा व शेड बांधकामाचा दर्जा तपासूनच आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना ओटा व शेड बांधण्याचा निधी दिला जाईल.

८. जर एखादया आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेने मागिल काही वर्षात किमान आधारभुत किंमत (MSP) हि योजना राबवितांना मोठया प्रमाणात नुकसान केले असेल तर ओटा व शेड बांधकामासाठी देण्यात येणाऱ्या निधीतून तेवढी रक्कम कमी करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

९. आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेला १००० मे.टन क्षमतेचे ग्रामीन ओटा व शेड खरेदी केलेले धान साठवणूकीसाठी वापरणे गरजेचे आहे. धान खरेदीची जबाबदारी पार पाडल्यानंतर संस्था हे ओटा व शेड इतर कारणांसाठी जसे तेंदुपत्ता, मोहा, हिरडा, बेहडा यांसारखे वनौपज आदिवासी उत्पादित शेतमाल इत्यादी साठवणूकीसाठी भाडेतत्वावर देऊ शकेल यामुळे या संस्थेला अतिरिक्त उत्पन्न प्राप्त होईल.

१०. किमान आधारभुत किंमत (MSP) अयोग्य पध्दतीने राबविणाऱ्या आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे परवाने रद्द केले जातील, यामुळे ज्या संस्था चांगले कार्य करणाऱ्या संस्थाना प्रोत्साहन मिळेल.

११. किमान आधारभुत किंमत योजना (MSP) चांगल्या रीतीने राबवण्यासाठी व ग्रामीण स्थरावर स्पर्धा निर्माण होणेसाठी त्या-त्या कार्यक्षेत्रातील कृषी उत्पन्न समिती APMC)] PESA कायदयांतर्गत स्थापन झालेल्या ग्रामसभा यांना जर सदर योजन राबवायची असेल तर ते आदिवासी विकास महामंडळाकडे (MSCTDC) परवाना मिळणेसाठी अर्ज करु शकतील.

Scanned with CamScanner

१२. आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेला ग्रामिण गोदाम (ओटा व शेड) बांधण्यासाठी लागणारा निधी केंद्र शासनाच्या विशेष केंद्रीय सहाय्य (SCA) अंतर्गत शबरी महामंडळाकडे असलेल्या योजनेतून उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्तावित केले जाईल. तसेच आदिवासी विकास महामंडळाच्या (MSCTDC) प्राप्त निधीतून किंवा राज्य शासनाकडे या योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देणेसाठी प्रस्ताव सादर केले जातील.

१३. सदर अडचण पाहता दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ ला झालेल्या मा. संचालक मंडळाच्या सभेमध्ये सर्व संस्थाना त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार शेड बांधणी करीता १० लक्ष रुपये पर्यत अनुदान देणेबाबतचा ठराव (ठराव क्रमांक - २९) मंजूर झाला आहे.
आज तारखे अखेर पैकी ०१ संस्थेचे ओटा व शेड बाधणीचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

उपरोक्त सभेपुढे चर्चचे करीता ठेवला असता मा. मंत्री महोदयांनी सभेच्या निर्देशनास आणून दिले की, जर संस्थेकडे स्वत:ची जागा उपलब्ध असेल तर संस्थांनी गोदामे बांधणेस काही हरकत नाही. तसेच प्रस्तावित निकष ०१ ते १३ प्रमाणे प्रस्ताव शासनास सादर करावा. शासननिर्णय प्राप्त झालेवर प्रस्तावति निकषाप्रमाणे संस्थाना १०/- लक्ष देणेस काही हरकत नाही. संस्था सक्षमीकरणासाठी बजेटमध्ये १०/- कोटीची तरतुद करणेत आलेचे मा. मंत्री महोदयांनी सभेच्या निर्देशनास आणून दिले.

(संस्था सक्षमीकरणासाठी बजेटमध्ये १०/- कोटीची तरतुद केले बाबत सर्व मा.संचालक मंडळानी मा.मंत्री महोदयांचे आभार मानले तसेच हा निर्णय ऐतासिक असून संस्था सक्षमीकरणाच्या दृष्टीने योग्य दिशा पहिले पाऊल असलेचे सर्वानी आभार मानले.)

**ठराव क्रमांक २९ :** सदर विषयावर सांगोपाग चर्चा होवून सर्व संचालक मंडळ सदस्यांनी मा. मंत्री महोदयांचे अगोदर आभार मानले व सर्वानुमते ठराव पारीत करणेत आला की, प्रस्तावित प्रस्ताव शासनास सादर करावा व शासन निर्णय प्राप्त झालेवरच प्रस्तावित संस्थांना अ.क्र. ०१ ते १३ निकषाप्रमाणे प्रत्येकी १०/- लक्ष देणेस संचालक मंडळ मान्यता देत आहे.

**सुचक** : श्री. मधुकर निंबाजी काठे, संचालक सदस्य.
**अनुमोदक** : श्री. प्रकाश तुळशीराम दरडम, संचालक सदस्य व
श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाम, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक ३० : आधारभुत किंमत खरेदी योजना पणन हंगाम २०१९-२० मधील केंद्र शासनाचे मंजूर दराने संस्था कमिशन अदायगी बाबत.**

आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत पणन हंगाम २०१९-२० करीता केंद्र शासनाने केंद्र शासनाचे पत्र क्र.No.१९२ (२५)/२०१९-FC A/Cs (E.file No. ३६९६४२) दिनांक ०४/०५/२०२० अन्वये धान/तांदूळा करीता व केंद्र शासनाचे पत्र क्र. No.१९३(२)२०१९-FC A/Cs (३६९९८१) दिनांक ०६/०७/२०२१ अन्वये भरडधान्या करीता तात्पुरते अनुषंगिक खर्चाचे दर मंजूर केले असल्याने महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

केंद्र शासनाकडून हंगाम २०१९-२० मध्ये धान खरीदी करीता रु. ३१.२५ इतके संस्था कमिशन दर मंजूर केले आहेत. यापूर्वी संचालक मंडळाचे पारित ठरावानुसार एकाधिकार खरेदी योजनेत खरेदी केल्या जाणाऱ्या धान्याकरीता संस्था कमिशनचे दर ठरविले जात होते व त्याच दराने आधारभुत योजनेच्या खरेदीवर कमिशन मंजूर केले जात होते. दिनांक २९/०९/२०१६ रोजीच्या संचालक मंडळ सभेत हंगाम २०१७-१८ पासून रु. ३०/- प्रति क्विं. संस्था कमिशन आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांना अदा करणेबाबत ठराव पारित करणेत आला असून त्यानुसार संस्था कमिशन निधीची मागणी करणे व अदा करणेबाबत परिपत्रक क्र.आविम/विप/संस्था ख.कमिशन/दर/२२८२/१६ दिनांक २८/१०/२०१६ अन्वये प्रादेशिक कार्यालयांन सुचना दिलेल्या आहेत. हंगाम २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये रु. ३०/- प्रति क्विं. दराने संस्था कमिशन अदा केलेले आहे.

केंद्र शासनाकडून रु. ३१.२५ दर मंजूर केले आहेत. त्यामुळे सदरचे दर महामळाचे परित ठरावातील मंजूर दरापेक्षा अधिक असल्याने सदर दरानुसार शासनाकडून खर्च प्राप्त होणार असल्याने सदर दरानुसार कमिशन अदायगी हंगाम २०१९-२० मध्ये करणेत आली आहे.

सदर विषय महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सभेपुढे मांडला असता सर्व संचालक मंडळ सदस्यानी केंद्र शासनाकडून मंजूर झालेल्या रुपये ३१.२५ प्राप्त झालेल्या दरास मान्येता दिली व हंगाम २०१९-२० मध्ये रु. ३१.२५ मंजूर दरानुसार संस्था कमिशन अदा करणेस सर्वानुमते ठराव मंजूर करणेत आला.

**ठराव क्रमांक ३० :** सर्वानुमते ठराव पारित करणेत येतो की, हंगाम २०१९-२० मध्ये रु. ३१.२५ शासनाकडून प्राप्त झालेल्या दरानुसार आधारभुत किंमत खरेदी केल्या संस्थाना संस्था कमिशन अदा करणेस मंजूरी देणेत येत असुन यापुढे केंद्र शासनाकडून वेळोवेळी मंजूर केलेल्या हंगाम निहाय दराने संस्था कमिशन देण्यास सदर सभा मान्यता देत आहे. यापुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाम, संचालक सदस्य.
**अनुमोदक** :- श्री. प्रकाश तुळशीराम दरडम, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक ३१ : आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत पणन हंगाम २००९-१० मध्ये खरेदी केंद्रावरील खुल्या जागेत साठविलेल्या धानापैकी भरडाईविना शिल्लक असलेला धानसाठा सुरक्षिततेसाठी गोदामात साठविणेकरीता केलेल्या अंतर्गत वाहतुकीच्या देयके अदायगीबाबत.**

पणन हंगाम २००९-१० मध्ये अधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत वजन क्विं.१२.४० लक्ष क्विं.धानाची खरेदी करणेत आली होती.परंतु प्रादेशिक कार्यालय, भंडारा, गडचिरोली व उप प्रा.का. अहेरी अंतर्गत धान हा कमी पावसाचा असल्याने त्यात ब्रोकनचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे शासन निर्देशानुसार भरडाई पासुन ६७% उतारानुसार तांदुळ जमा करणे शक्य नसल्याने राईस मिलर्सने धान भरडाई करण्यास तयारी दर्शविली नाही.तसेच शासनाने वाहतुक दर ४०% कमी केल्याने देखील राईस मिलर्स धान भरडाईस तयार झाले नाहीत.परिणामी मोठया प्रमाणात धानसाठा उघडयावर पडुन होता.

सदरचा धानसाठा उघडयावर पडुन राहील्यास पावसाने/अवकाळी पावसाने खराब होऊन शासनाचे पर्यायाने महामंडळाचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होण्याची नाकारता येत नव्हती. त्यामुळे गोंदिया व गडचिरोली जिल्हयातील उघडयावर खरेदी करुन साठविण्यात आलेल्या धानाची पावसापासुन सुरक्षिततेकरीता अंतर्गत वाहतुक करुन भाडेतत्वारील गोदामात साठविणे आवश्यक होते.

प्रा.का.भंडारा यांनी त्यांचे स्तरावर वेळ कमी असल्याने व मोठया प्रमाणावर धान साठयाचे पाण्याने भिजुन नुकसान होऊ नये म्हणुन गोंदिया येथिल वाहतुक ठेकेदारांकडुन अंतर्गत वाहतुकीचा दर मागवुन त्यानुसार ५ वाहतुक ठेकेदारांशी चर्चा करुन वाटाघाटी अंती हमाली खर्चासह टप्पेनिहाय वाहतक दरात जय बालाजी ट्रान्सपोर्ट यांना पत्र क्र.२४८/१० दिनांक ३०/४/२०१० अन्वये निर्णय होऊन गोंदिया जिल्हयातील २.२८ लक्ष क्विं. धान १५/७/२०१० अखेर पर्यंत सुरक्षित करण्यात आला होता.

गडचिरोली (अहेरीसह) ४.०२ लक्ष क्विं. धानाची वाहतुक शासन जे वाहतुक दर मंजुर करेल त्या दरानुसार कार्यवाही केली आहे.परंतु गडचिरोली जिल्हयात गोदामे भरल्याने तसेच नव्याने गोदामांची उलब्धता न झाल्याने गोंदिया जिल्हयात गोदामे भाडयाने घेण्यात आली आहे.परंतु वाहुतक ठेकेदारांना २००९-१० मधील धान/तांदुळ वाहतुकीचे दर मंजुरीबाबत शाश्वती नसल्याने २००७-०८ चे शासनाचे टप्पेनिहाय मंजुर दराने काम करणेस वाहतुक ठेकेदारांनी मागणी केली.त्यानुसार धान पावसामुळे खराब होऊन आर्थिक नुकसान टाळणेच्या दृष्टीने धानाची १५० ते १६० कि.मी.पर्यंत वाहतुक केली आहे.

अंतर्गत वाहतुकीस मान्यता मिळणेबाबत अन्न, नगारी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला होता. परंतु सदरची योजना केंद्र शासनाची असल्याने महामंडळाचा प्रस्ताव FCI कडे पाठविण्यात आला असल्याचे व धानाच्या सुरक्षिततेची जबाबदारी ही अभिकर्ता संस्थांची असल्याचे धानाची सुरक्षित साठवणुक आपले स्तरावरुनच करणेबाबत शासनाचे पत्र क्र.धानभ-१५१०/४९१३/प्र.क्र.४२९९/नापु २९ दिनांक १५/४/२०१० अन्वये कळविले आहे.

त्यानुसार मुख्य कार्यालयाचे पत्र क्र.आविम/विप/आखयो/९-१०/उ.साठाअंतर्गत वहा.सुरक्षितता/कार्यवाही/१८७/१० दिनांक १९/४/२०२० अंतर्गत वाहतुक करणेस प्रा.का. भंडारा, गडचिरोली, जव्हार व उप प्रा.का.अहेरी यांना परवानगी देण्यात आली आहे.तसेच डिझेल, हमाली खर्चासाठी वाहतुक ठेकेदारांना अंदाजे २.५० कोटी रु.अग्रीम वाहतुक ठेकेदारांना देण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

प्रादेशिक कार्यालय निहाय वाहतुक ठेकेदारांची नावे खालीलप्रमाणे

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | वाहतुक ठेकेदाराचे नाव | देयकाची स्थिती (प्राप्त/अप्राप्त) |
|---|---|---|---|
| १ | भंडारा | मे. जय बालाजी, ट्रान्सपोर्ट, गोंदिया | प्राप्त |
| २ | गडचिरोली | मे. मनोज ट्रान्सपोर्ट, गोंदिया | प्राप्त |
| | | मे. साईबाबा, ट्रान्सपोर्ट, गोंदिया | प्राप्त |
| | | मे. श्री. प्रमोद चंपालाल अग्रवाल, गोंदिया | प्राप्त |
| | | मे. मल्लीकभाई बुधवानी | अप्राप्त |
| | | मे. अमित देवीदत्त जेजानी, वडसा | अप्राप्त |
| | | मे. दिपक भाई चतुरभाई पटेल, वडसा | अप्राप्त |
| | | मे. दिपक मोटवानी, वडसा | अप्राप्त |
| | | मे. राहुल आर. मोटवानी, वडसा | अप्राप्त |
| | | प्रेम ट्रान्सपोर्ट, श्री. भगवानदास भिमदास डेंगानी | अप्राप्त |
| | | महाकाली ट्रान्सपोर्ट, आशुतोश ज्ञानेंद्र मंडले | अप्राप्त |
| | | हसमुख दोषी, चामोर्शी | अप्राप्त |
| ३ | उप प्रा.का. अहेरी | मे. अमित देवीदत्त जेजानी वडसा | अप्राप्त |
| | | मे. अमोल व्ही. अग्रवाल | अप्राप्त |
| | | मे. गोंडवाना ट्रान्सपोर्ट, आलापल्ली | प्राप्त |
| | | प्रेम ट्रान्सपोर्ट, वडसा | अप्राप्त |
| | | अहमदभाई हैदरभाई पंजवानी, ट्रान्सपोर्ट, आरमोरी | अप्राप्त |
| | | जमालभाई जिवानी ट्रान्सपोर्ट, आरमोरी | अप्राप्त |
| | | जितेंद्रकुमार चंपालाल अग्रवाल, वडसा | अप्राप्त |
| | | मे. श्री. प्रमोद चंपालाल अग्रवाल, गोंदिया | अप्राप्त |
| | | राहुल आर मोटवानी, वडसा | अप्राप्त |

खरेदी केलेल्या धानाच्या सुरक्षिततेची जबाबदारी ही अभिकर्ता संस्थांची असल्याचे कारण देत शासनाने सदरची देयके मंजुर केलेली नाहीत.उपरोक्त वाहतुक ठेकेदारांनी धान वाहतुकीचे काम केले असल्याने त्यांना त्यांनी केलेल्या वाहतुकीची रक्कम अदा करणे क्रमप्राप्त आहे.वरीलपैकी ५ वाहतुक ठेकेदारांनी वाहतुकीच्या रकमेची मागणी केली आहे.

Scanned with CamScanner

त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | वाहतुक ठेकेदाराचे नाव | वाहतुक केलेला धानसाठा वजन क्विं. | एकुण वाहतुक देयक रक्कम रु. | दिलेला अग्रीम रक्कम रु. | अदा करणेबाकी रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भंडारा | मे. जय बालाजी, ट्रान्सपोट्र, गोंदिया | २२८२३०.०७ | १६४५९५५८ | १०००००० | ६४५९५५८ |
| २ | गडचिरोली | मे. मनोज ट्रान्सपोर्ट, गोंदिया | १७२०७.८९ | १४१४५२२ | १०००००० | ४१४५२२ |
| | | मे. साईबाबा, ट्रान्सपोर्ट, गोंदिया | ३३५६८.३० | २६५५८५७ | २०००००० | ६५५८५७ |
| | | मे. प्रमोद चंपालाल अग्रवाल, गोंदिया | २६३६७.५९ | २०८९७९५ | १६००००० | ४८९७९५ |
| ३ | उप प्रा.का. अहेरी | मे. गोंडवाना ट्रान्सपोर्ट, आलापल्ली | १४८२४.०५ | १३१४६०२ | ५००००० | ८१४६०२ |
| | | **एकुण** | **३२०१९७.९०** | **२३९३४३३४** | **१५१०००००** | **८८३४३३४** |

मागील पानावर दर्शविलेल्या तक्त्यात नमुद नुसार ५ वाहतुक ठेकेदारांची देयके प्राप्त झालेली आहेत.उर्वरीत वाहतुक ठेकेदारांची देयके प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली व उप प्रा.का. अहेरी यांचेकडुन प्राप्त झालेले नाहीत. प्रादेशिक कार्यालय, भंडारा, गडचिरोली व उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी यांचे मार्फत अंतर्गत वाहतुकीसाठी वाहतूक ठेकेदारांना अग्रीम अदा केली आहे.त्या सर्व वाहतुक ठेकेदारांकडुन वाहतुकीची देयके प्राप्त झालेली नाहीत.अग्रीम रक्कम अदा केलेल्या वाहतुक ठेकेदारांपैकी प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गतच्या ३ ठेकेदरांच्या तसेच उप प्रा.का. अहेरी अंतर्गतच्या ६ वाहतुक ठेकेदारांच्या वाहतुक देयकांचा तपशिल या कार्यालयाकडे उपलब्ध होत नाही. याचा अर्थ त्यांचेकडुन वाहतुक देयके प्राप्त झाली नसावीत अशी धारणा आहे.

वाहतुक देयके प्राप्त झालेल्या व या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेल्या ५ वाहतुक ठेकेदारांच्या देयकाची रक्कमेबाबत दिनांक २२/१/२०२१ रोजी संपन्न झालेल्या मा. संचालक मंडळ सभेत आयत्या वेळचा विषय क्रमांक ८ सादर केला असता, अंतर्गत वाहतुकीकरीता वाहतुक केलेल्या वाहतुक ठेकेदारांची सभा घेऊन पुढील निर्णय घेणेबाबत व्यवस्थापकीस संचालक यांना अधिकार देणेबाबत आयत्य वेळचा टराव क्रमांक ८ पारीत झालेला आहे. त्यानुसार व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे दिनांक २४/२/२०२१ रोजी समक्ष सुनावनी झाली सुनावणीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या दस्तऐवजांची छाननी केली असता प्रादेशिक कार्यालय स्तरावर वाहतुक ठेकेदाराशी केलेल्या करारनाम्यात अंतर्गत वाहतुकीच्या दराचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यामुळे त्यांना त्यांच मागणीनुसार वाहतुक देयकाची रक्कम अदा करणे अनिवार्य आहे.

वाहतुक देयके प्राप्त झालेल्या ५ वाहतुक ठेकेदारांव्यतीरीक्त उर्वरीत अन्य वाहतुक ठेकेदरांकडील वाहतुक देयके देखिल अदा करावी लागतील.सदर देयकाच्या रकमा शासनाकडुन प्राप्त झालेल्या नाहीत.त्यामुळे सदरच्या रकमा अदा करणेबाबत उचित निर्णय होणे गरजेचे आहे.सदर विषयी प्रादेशिक

Scanned with CamScanner

कार्यालय व वाहतुक ठेकेदार यांचे मध्ये वाहतुक दराबाबत व देयकाबाबत कोणताही वाद नसल्याचे स्पष्ट झाले. वाहतुक ठेकेदारांना डिझेल व इतर खर्चासाठी अग्रिम अदा केला आहे. ठेकेदारांनी वाहतुक देयके मंजूर केल्यानंतर त्यातुन अग्रिम रकमेचे समायोजन केले जाईल.करीता सद्यस्थितीत उपरोक्त वाहतुक ठेकेदारांचे वाहतुकीच्या रकमा अदायगीबाबत व इतर वाहतुक ठेकेदारांच्या वाहतुक देयकाबाबत उचित निर्णय होणेस्तव सविनय सादर.

उघडयावरील धानसाठा सुरक्षित ठेवणेचे दृष्टीने अंतर्गत वाहतुक करणेत आलेली आहे. अंतर्गत वाहतुक केलेल्या वाहतुक ठेकेदारांची वाहतुक बीले कार्यालयास प्राप्त झालेली आहेत. दिनांक २२.०१.२०२१ रोजी च्या मा. संचालक मंडळ सभेत पारित ठराव क्र. ४ नुसार योग्य निर्णय घेण्याचे बाबतचे अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान केले असून दिनांक २४/२/२०२१रोजी समक्ष सुनावनी झाली सुनावणीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या दस्तऐवजांची छाननी केली असता प्रादेशिक कार्यालय स्तरावर वाहतुक ठेकेदाराशी केलेल्या करारनाम्यात अंतर्गत वाहतुकीच्या दराचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यामुळे त्यांनी सादर केलेल्या देयकानुसार वाहतुक देयकाची रक्कम अदा करणे अनिवार्य आहे.

याबाबत साधक बाधक चर्चा होवून याबाबत सर्व देयकांची छाननी करुन त्यावाबत योग्य कार्यवाही करणेचे अधिकार व्यवस्थापकीय यांना प्रदान करणेत येते यास सर्व संचालकांनी सहमती दर्शविली
.

**ठराव क्रमांक ३१ :** सर्वानुमते ठराव पारित करणेत येतो की, हंगाम २००९-१० मध्ये प्रलंबित अंतर्गत वाहतुकीपोटी झालेला वाहतुक खर्चाची देयके अदा करणेचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करणेत येत आहे. वाहतुक ठेकेदारांची वाहतूक देयके मंजूर करुन त्यांना दिलेला अग्रिम रकमा समायोजित करण्यात यावी.

**सुचक** :- श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य.

**अनुमोदक** :- श्री. प्रकाश तुळशीराम दरडम, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक ३२ : हंगाम २०२०-२१ मधिल ई-निविदेव्दारे खरेदी केलेल्या ताडपत्री खरेदीस कार्योत्तर मंजुरी बाबत.**

आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरीप पणन हंगाम २०२०-२१ मध्ये दि.३१.०७.२०२१ अखेर खरीप व रब्बी धान क्विं ४९,१८,४५३.१८,व भरडधान्य क्विं.१,८१,३११.२८ सदर हंगामात एका हंगामात होणाऱ्या खरेदी पेक्षा तिनपट धानाची खरेदी झालेली आहे. धान साठवणुकीकरीता महामंडळाकडे पुरेसे गोदामे उपलब्ध नसल्यामुळे ८०% धान साठवणुक करावा लागतो. धानाची सुरक्षितेची जबाबदारी महामंडळाची असल्यामुळे उघडयावर साठवणुक करण्यात आलेल्या धान अवकाळी पाऊस, ऊन, वारा, गुरे व ढोर इत्यादीपासुन सुरक्षितेकरीता ताडपत्र्यांची आवश्यकता भासते.

GeM पोर्टलवर ताडपत्री खरेदीस लागणारा वेळ लक्षात घेता अवकाळी पाऊसामुळे धानाचे नुकसान टाळणे करीता तातडीची बाब म्हणुन प्रादेशिक कार्यालय, नाशिक, जव्हार, यवतमाळ, भंडारा, चंद्रपुर, गडचिरोली व उप प्रादेशिक कार्यालय,अहेरी यांना प्रत्येकी रक्कम रु.५०,०००/- च्या मर्यादेत ताडपत्री खरेदी करणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार खालील प्रादेशिक कार्यालयांनी ताडपत्री (प्लॅस्टिक) ची खरेदी केलेली आहे.

| अ.नं. | प्रादेशिक कार्यालय | GSM | ताडपत्री साईज | खरेदी ताडपत्री संख्या | एक ताडपत्रीची किंमत G.S.T.सह. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भंडारा | २५० | ३० X ३० | १० | ५४२८.०० | ४८८५२.०० |
| २ | चंद्रपुर | २५० | ३० X ३० | १० | ५४२८.०० | ४८८५२.०० |
| ३ | गडचिरोली | २५० | ३० X ३० | १० | ५४२८.०० | ४८८५२.०० |
| ४ | उप प्रा.का.अहेरी | २५० | ३० X ३० | १० | ५४२८.०० | ४८८५२.०० |
| | | | **एकुणांत** | **४०** | | **१९५४०८.००** |

तसेच प्रादेशिक कार्यालय, निहाय प्लॅस्टीक ताडपत्री मागणी नोंदविल्यानुसार १२९८ नग ४०० जीएसएम प्लॅस्टिक ताडपत्रीखरेदी १,७८,०४८,स्क्वेअर मिटर खरेदीकरीता दिनांक २७.०१.२०२१ रोजी GeM पोर्टलवर ई-निविदा Bid Number GEM/२०२१/B/९९८५२४ प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार सदर निविदेत खालील प्रमाणे चार निविदाधारकांनी भाग घेतलेला होता.

Scanned with CamScanner

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | दस्तऐवज तपासणीत पात्र/अपात्र |
|---|---|---|
| १ | मे.डेजी इंडस्ट्रिज, राधेश्याम अपार्टमेंट, दत्तपाडा सबव ऑप गोकुल शॉपींग सेंटर, बोरीवली वेस्ट, मुंबई | पात्र |
| २ | मे. गोपीचंद इंटरप्राजेस प्रा.ली. ब्लॉक नं.१६२ जवळ भारत ॲलुनियम सनतेजरोड, विलेज सनतेज वडसर रोड, सनतेज कलोल, जि.गांधीनगर | अपात्र |
| ३ | मे. लॅमीफॅब्स ॲन्ड पेपरर्स प्रा.ली., औरंगाबाद, महाराष्ट्र | पात्र |
| ४ | मे. सनपॉली तॉर्प ओवरसिज प्रा.ली.नागपुर | पात्र |

वरील प्रमाणे निविदाधारकांपैकी कागदपत्र छाननी अंती अं.क्र.२ अपात्र ठरले व अ.क्र.१,३ व ४ हे तीन निविदा पात्र ठरले. त्यानुसार १,७८,०४८,स्क्वेअर मिटर करीता अ.क्र. ३ मे. लॅमीफॅब्स ॲन्ड पेपरर्स प्रा.ली., औरंगाबाद, महाराष्ट्र यांचे ४०० GSM प्रति स्क्वेअर मिटर दर रु.६२/- हे न्युनत्तम आले. परंतु L१ निविदाधारक मे. लॅमीफॅब्स ॲन्ड पेपरर्स प्रा.ली. चिखलठाणा,औरंगाबाद यांना GeM पोर्टल्वर दिनांक ०२.०३.२०२१ रोजी आदेश देत असताना Waiting for price match acceptance असे स्क्रिनवर दिसुन आले व दिनांक ०९.०३.२०२१ रोजी पुरवठा आदेश देण्याची कार्यवाही करण्यात आली असता GeM पोर्टलवर आदेश स्विकृत झाला नाही. सदर निविदेत L१ निविदाधारकांने दिलेले दर मान्य असल्याबाबत निविदाधारक L२ व L३ यांनी देखिल प्रति स्क्वेअर मिटर रु.६२/- प्रमाणे दर सारखे दिले असल्याचे दिसुन आले. तसेच GeM पोर्टलवर L१ असलेल्या निविदाधारकास स्क्वेअर मिटर Min Max Quanaitiy ४४५१२ व L२ व L३ यांना Min Quanitiy १७८०, व Max Quanitiy ८९,०२४ दर्शविली आहे. त्यानुसार मे. लॅमीफॅब्स ॲन्ड पेपरर्स प्रा.ली., औरंगाबाद, यांचे बरोबर ४४,५१२ स्क्वेअर मिटर व त्यात कमी/जास्त ५०% व मे.डेजी इंडस्ट्रिज, राधेश्याम अपार्टमेंट, दत्तपाडा सबव ऑप गोकुल शॉपींग सेंटर, बोरीवली वेस्ट, मुंबई तसेच मे. सनपॉली तॉर्प ओवरसिज प्रा.ली.नागपुर यांचेबरोबर ८९,०२४स्क्वेअर मिटर व त्यात कमी/जास्त ५०% नुसार ताडपत्री (प्लॅस्टिक) ४०० GSM च्या पुरवठा करणेबाबत करारनामा करण्यात आला व प्रादेशिक कार्यालयांच्या मागणीनुसार ताडपत्री पुरवठा करणे करीता आदेश देण्यात येवुन खालील प्रमाणे ताडपत्रीचा पुरवठा करण्यात आलेल्या आहेत.

Scanned with CamScanner

| अ.नं. | प्रादेशिक कार्यालय | GSM | Size | खरेदी ताडपत्री संख्या | एकुण Sqr. Mtr. | दर प्रति Sqr. Mtr. रुपये G.S.T.सह. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ४०० | ३०X३० | ५० | ४१८२.०० | ६२.०० | २५९२८४.०० |
| **एकुण नाशिक :-** | | | | **५०** | **४१८२.००** | | **२५९२८४.००** |
| २ | जव्हार | ४०० | ३०X३० | ५० | ४१८२.०० | ६२.०० | २५९२८४.०० |
| **एकुण जव्हार :-** | | | | **५०** | **४१८२.००** | | **२५९२८४.००** |
| ३ | चंद्रपुर | ४०० | ४०X४० | १५० | २२२९६.०० | ६२.०० | १३८२३५२.०० |
| **एकुण चंद्रपुर :-** | | | | **१५०** | **२२२९६.००** | | **१३८२३५२.००** |
| ४ | भंडारा | ४०० | ३०X३० | ४५ | ३७६३.०० | ६२.०० | २३३३०६.०० |
| | | ४०० | ४०X४० | ६०० | ८९२२०.०० | ६२.०० | ५५३१६४०.०० |
| **एकुण भंडारा :-** | | | | **६४५** | **९२९८३.००** | | **५७६४९४६.००** |
| | | ४०० | ३०X३० | १ | ८४. ०० | ६२.०० | ५२०८.०० |
| | | ४०० | ४०X४० | ४६६ | ६९२६७.०० | ६२.०० | ४२९४५५४.०० |
| **एकुण गडचिरोली :-** | | | | **६३९** | **९४९२७.००** | | **५९३६६२६.००** |
| ६ | उप प्रा.का.अहेरी | ४०० | ४०X४० | २९९ | ४४४६१.०० | ६२.०० | २७५६५८२.०० |
| | | ४०० | २०X२० | १ | ३७.०० | ६२.०० | २२९४.०० |
| **एकुण उप प्रा.का.अहेरी :-** | | | | **३००** | **४४४९८.००** | | **२७५८८७६.००** |
| **एकुणांत :-** | | | | **१६६२** | **२३७४९२.००** | | **१४७२४५०४.००** |

दिनांक १९ सप्टेंबर,२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांना सुविधा पुरविणे, खरेदी केंद्राना ताडपत्री, मॉइश्चर मिटर, वजनकाटे वगैरे उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कृषी उत्पन्न बाजार समितीची आहे. परंतु त्यांचे कडुन सदरच्या सुविधा उपलब्ध न करुन दिल्यास सदरचे

Scanned with CamScanner

साहित्य महामंडळ खरेदी करुन त्यांच्या रक्कमा उत्पन्न बाजार समितीना देय असलेल्या मार्केटसेस मधुन कपात करणेबाबत प्रादेशिक कार्यालयांना दिनांक ०१ सप्टेंबर,२०२१ रोजीच्या पत्रानुसार ताडपत्री खरेदीची रक्कम वसुली करीता कळविण्यात आले आहे.

हंगाम २०२०-२१ करीता प्रादेशिक कार्यालयांनी आपल्यास्तरावर खरेदी केलेल्या ताडपत्री ४० नग संख्या रक्कम रुपये १,९५,४०८/- तसेच प्रादेशिक कार्यालयांनी मागणी नोंदविल्यानुसार मुख्य कार्यालयांने GeM पोर्टलवर ई-निविदा राबवुन खरेदी करुन प्रादेशिक कार्यालयांना पुरवठा केलेल्या ताडपत्री नग १,६६२ एकुण स्क्वेअर मिटर २,३७,४९२ प्रति स्क्वेअर मिटर रु.६२/- प्रमाणे रक्कम रु.१,४७,२४,५०४/- असे एकुण ताडपत्री (प्लॅस्टिक) खरेदी १,७०२ नग संख्या एकुण खर्च रक्कम रुपये १,४९,१९,९१२/-(अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एकोणपन्नास लाख एकोणावीस हजार नऊशे बारा मात्र.)

सदर विषय सभेपुढे मांडला असता सर्व संचालक मंडळाने एक मताने सुचित केले की, कोणतेही आर्थिक व्यवहाराबाबत निर्णय घेतांना स्थानिक संचालक यांना विचारात घेऊनच उचित निर्णय घ्यावा.

मा. अध्यक्ष, मंत्री महोदय हे महामंडळाचे होणाऱ्या कार्यवाही प्रक्रियेस मान्यता तात्पुरती मान्यता देत असतात, परंतु पुढील कार्यवाही करतांना किंवा झालेवर संचालक मंडळासमोर सदर विषयाबाबत चर्चा करावी व केलेल्या कार्यवाही बाबत मा. अध्यक्ष, मंत्री महोदय यांचेची चर्चा करुनच केलेल्या कार्यावाहीस कार्योत्तर मंजूरीस विषय ठेवणेत यावेत.

वरील प्रक्रिया राबवितांना संचालक मंडळाशी चर्चा केलेली नाही असे सर्व संचालक मंडळ सदस्यांनी मा. अध्यक्षांचे निदर्शनास आणून देवून नाराजी दर्शविली, तसेच मिटींगच्या अगोदर देखिल व्यवस्थापकीय संचालक हे देखिल चर्चा करीत नाही.

मागील ३ वर्षातील शिल्लक ताडपत्रीची तपासणी करावी तसेच सद्या किती ताडपत्र्या सुस्थितीत आहेत याचा आढावा घेवून मा. मंत्री महोदयांनी वेळ घेवून त्यांचेशी चर्चा करुन सदर विषय पुढील संचालक मंडळ सभेत घेण्यात यावा.

**ठराव क्रमांक ३२ :** सर्वानुमते ठराव पारित करणेत येतो की, मागील ३ वर्षातील शिल्लक ताडपत्र्यांचा आढावा घेवून मा. मंत्री महोदयांकडून वेळ घेवून चर्चा करुनच सदर विषय पुढील संचालक मंडळ सभेत मांडण्यात यावा.

**सुचक** : श्री. अशोक भाऊराव मंगाम, संचालक सदस्य.
**अनुमोदक** : श्री. मधुकर निंबाजी काठे, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक ३३ : हंगाम २०२१-२२ करीता आवश्यकतेनुसार एकदा वापरलेल बारदाना/ ताडपत्री/ मॉईचर मिटर खरेदीसाठी मान्यता मिळणेबाबत.**

हंगाम २०२१-२२ मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजनेत कृषीउपज मालाच्या खरेदीसाठी व सुरक्षितेसाठी पुर्व तयारी करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील बाबीची खरेदी करावी लागेल.

**१. एकदा वापरलेला बारदाना खरेदी :-**

आधारभुत किंमत खरेदी योजना हंगाम २०२१-२२ मध्ये धान साठवणुकीकरीता आवश्यकतेनुसार एकदा वापरलेला बारदाना खरेदीकरणे करीता ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता दयावी हि विनंती.

**२.ताडपत्री खरेदी :-**

हंगाम २०२१-२२ मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरेदी होणारे धान साठवणुकीकरीता विदर्भात गोदामे कमी प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे ८०% धानसाठा हा खुल्याजागेत साठवणुक करावा लागतो. त्यामुळे धानाच्या सुरक्षितेकरीता प्रादेशिक कार्यालयांनी मागणी नोंदविल्यानुसार GeM पोर्टलवर ई-निविदा मागवुन खरेदी करावी लागेल. त्यासाठी मॉईचर मिटरखरेदीसाठी GeM पोर्टलवर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता दयावी हि विनंती.

प्रादेशिक कार्यालय निहाय मागणी पुढील होणाऱ्या संचालक सभेत अवलोकनार्थ सादर करण्यात येईल.

**३. मॉईचर मिटर :-**

पणन हंगाम २०२१-२२ साठी मॉईचर मिटर उपलब्ध करुन देणेबाबत प्रादेशिक कार्यालयाची मागणी प्राप्त झाल्यास त्यांचे मागणीनुसार GeM पोर्टलवर ई-निविदा मागवुन खरेदी करावी लागेल. त्यासाठी मॉईचर मिटरखरेदीसाठी GeM पोर्टलवर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता दयावी हि विनंती.

हंगाम २०१९-२० पासून अ.ना.पु. विभागाकडून नविन SBT बारदाना पुरवठा केला जात असुन सदर बारदाना वेळेवर प्राप्त होत नाही. यामुळे प्रसंगी शेतकऱ्यांचा बारदाना घ्यावा लागतो.

सदर विषय संचालक मंडळासमोर चर्चासाठी ठेवला असता सदर विषयावर पुढील प्रमाणे सांगोपाग चर्चा झाली की, नविन बारदानाची खरेदी ही महामंडळाने शासनाचे निर्देशनानुसार करावी GeM पोर्टलवर खरेदी प्रक्रिया राबवित असतांना बारदाना वेळेवर पुरवठा होत नाही.

नविन २०२१-२२ सुरु होणेपूर्वी संचालक मंडळ व व्यवस्थापकीय संचालक याचेशी चर्चा करुनच खरेदीची कार्यवाही करावी.

नविन बारदाना, जुना बारदाना खरेदीबाबतचे पूर्ण अधिकार महामंडळास घेणेबाबतचा प्रस्ताव तयार करुन शासनास सादर करावा. यापुढे एकदा वापरलेला व नविन बारदाना, ताडपत्री व मॉईचर मिटर खरेदीची प्रक्रिया ही महामंडळानेच राबवावी व तसा प्रस्ताव शासनास सादर करावा व शासनाचे निर्देशानुसार ऑनलाईन प्रक्रिया राबवून खरेदीची प्रक्रिया राबवावी.

Scanned with CamScanner

**ठराव क्रमांक ३३ :** सर्वानुमते ठराव पारित करणेत येतो की, हंगाम २०२१-२२ सुरु होणेपूर्वी संचालक मंडळ व व्यवस्थापकीय संचालक याचे चर्चे अंति निर्णय घेवूनच एकदा वापरलेला बारदाना, व नविन बारदाना, ताडपत्री ,मॉईचर मिटर व इतर साहित्या खरेदीची कार्यवाही करावी. तसेच नविन, जुना बारदाना खरेदीबाबतचे पूर्ण अधिकार महामंडळास मिळणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन शासनास प्रस्ताव सादर करावा व शासनाचे निर्देशानुसारच खरेदीची प्रक्रिया पूर्ण करावी.

**सुचक** :- श्री. धनराज हरिभाऊ महाले, संचालक सदस्य.

**अनुमोदक** :- श्री. मधुकर निंबाजी काठे, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ३४ : खरीप पणन हंगाम २०२१-२२ करीता एकाधिकार खरेदी योजना / आधारभुत खरेदी योजना व गौणवनोउपज खरेदी योजना राबाविणेसाठी आवश्यकतेनुसार खरेदी केंद्र उघडण्यास मान्यता मिळणे बाबत.**

खरीप पणनहंगाम २०२१-२२ दिनांक ०१/१०/२०२१ पासून सुरु होत असल्याने एकाधिकार खरेदी योजना, गौणवनोपज ऐच्छीक हिरडा खरेदी सुरु करणेसाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रात महामंडळामार्फत खरेदी केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. तसेच आधारभुत किंमत खरेदी योजना राबविण्यासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रात महामंडळाची अभिकर्ता म्हणून शासनाकडून नियुक्ती केली आहे. हंगाम २०२१-२२ मधील आन्नारभुत योजनेत अन्न, नागरी पुरवठा विभागाकडून शासन निर्णय निर्गमित झालेनंतर खरेदी सुरु करण्योत येईल, त्यामुळे आधारभुत योजनेसाठी देखिल खरेदी केंद्र निश्चित करावे लागणार आहेत.

महामंडळाच्या उपअभिकर्ता असलेल्या आदिवासी विविध कार्यकारी संस्था मार्फत वरील योजनांचे खरेदी करण्यासाठी खरेदी केंद्र संबधित जिल्हाधिकारी अथवा आदिवासी उपयोजना क्षेत्रात कार्यरत असलेले भारतीय प्रशासन सेवेतील प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी यांचेकडून खरेदी केंद्र मंजूर करुन घेतले जातात, मात्र ज्या ठिकाणी बहुतांशी संस्था हया आर्थिकदृष्टीया दुर्बल व अन्य कारणाने खरेदी योजना राबवू शकत नाही. अशा ठिकाणच्या शेतकऱ्यांचा माल खरेदी करणेस अडचणी निर्माण होऊ नयेत, तसेच खरेदी बाबत तक्रारी उद्भवू नयेत, यासाठी प्रतिवर्श्री महामंडळामार्फत स्वत:ची खरेदी केंद्र उघडावी लागतात अशा ठिकाणच्या कार्यक्षेत्रामध्ये महामंडळामार्फत स्वत:चे केंद्र संबधित जिल्हाधिकारी यांचे मार्फत सुरु करुन घेऊन त्या परिसरातील शेतकऱ्यांचा माल अशा खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात येतो. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील कृषी उत्पन्न बाजार समिती अहेरी यांनी देखिल धान/ भरडधान्य खरेदीसाठी परवानगी मागितली आहे.

गत वर्षी हंगाम २०२०-२१ आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत संपुर्ण आदिवासी उपयोजना क्षेत्रात १६ जिल्हयातील ७३ तालुक्यांसाठी २८४ केंद्र मंजूर करण्यात आली, त्यापैकी १८५ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थाची केंद्र असून महामंडळाची स्वत:ची ९९ केंद्र मंजूर करण्यात आली आहेत.

यावर्षी २०२१-२२ मध्ये खरेदी केंद्र गरज व आवश्यकतेनुसार संबधित जिल्हाधिकारी यांचे मार्फत योजना निहाय मंजूरी घ्यावी लागणार आहे. तसेच ज्या ज्या ठिकाणी आदिवासी विविध कार्यकारी सहाकारी

Scanned with CamScanner

संस्था खरेदी योजना राबविण्यास असमर्थता दर्शवित असल्यास अशा ठिकाणी महामंडळाचे खरेदी केंद्र सुरु करणत येईत शेतकऱ्यांकडील माल खरेदी करण्यास अडचणी येऊ नये म्हणून एकाधिकार खरेदी, गौणवनोपज, ऐच्छीक हिरडा व इतर वनउपल माल खरेदी आणि आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत धान/भरडधान खरेदी करण्यासाठी खरेदी केंद्र मंजूरी आवश्यक वाटते.

मात्र असे जरी असले तरी एकात्मिक खरेदी अंतर्गत केलेली खरेदी नंतर विक्रीसाठी व्यवस्था नसल्याने व या कार्यालयास सततचा तोटा येत असल्या कारणाने ही योजना कशा प्रकारे राबवायची हया मुद्दयाचे निरसण होणे आवश्यक आहे.

सदर विषयाचे महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सभेपुढे वाचन केले असता सर्वानुमते आवश्यकतेनुसार खरेदी करीता खरेदी केंद्र उघडणेस सहमती दर्शविली.

एकाधिकार खरेदी योजना का बंद करणेत आली याची कारणे शोधून काढावी असे मा. मंत्री महोदयांनी सभेस संबोधित केले. यावर संचालक मंडळ सदस्यांनी मत मांडले की पूर्वी महामंडळ एकाधिकार खरेदी मालावर प्रक्रिया करुन सदर माल/ धान्य शासकीय आश्रमशाळेंना पुरवठा करणेत येत होता परंतु शासननिर्णय क्र.शाआशा/२०१५/प्र.क्र.३४१ (भाग-१)का. दिनांक १५.०६.२०२७ अन्वये आश्रमशाळा माल पुरवठा ही योजना महामंडळाकडून काढून टाकण्यात आल्याने एकाधिकार खरेदीचे प्रमाण घटले आहे. एकाधिकार खरेदी योजनेतील मालाला हमीभाव मिळाला पाहिले असे मा. संचालक यांनी मत मांडले आश्रमशाळा पुरवठा योजना पूर्ववत सुरु करणेकरीता मा. मंत्री महोदय यांचेशी चर्चा करुन काही संचालक मंडळातील सदस्यांची चर्चा करुन प्रस्ताव शासनास सादर करावा व सदर योजना पून्हा महामंडळाने राबविणे बाबत प्रस्ताव शासनास सादर करावा. तसेच स्वतंत्र टिपणी तयार करुन शासकीय आश्रमशाळांची मागणी घेण्यात यावी, असेही चर्चेत झाल्यामुळे. अशाप्रकारे सांगोपाग चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्रमांक ३४ :** ठराव सर्वानुमते मंजूर करणेत येतो की, शासन निर्देशानुसार धान/भरडधान्य व गौणवनोउपज खरेदी योजनाहंगाम २०२१-२२ करीता आवश्यकतेनुसार खरेदी केंद्र सूरु करुन खरेदीची कार्यवाही करावी.

एकाधिकार खरेदी पूर्ववत करणे व खरीदलेल्या मालावर प्रक्रिया करुन उदा. धान व तुरीची भरडाई करुन तयार होणार तांदूळ, तुरडाळ तसेच शासकीय आश्रमशाळांना/ वसतीगृह यांना लागणारा अन्य कृषीउपज माल व अन्नधान्य त्यांना पुरवठा करणेकामी शासनास प्रस्ताव सादर करावा. वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे. व शासकीय आश्रमशाळेंना/वसतीगृहांना माल पुरवठा करणेकामी शासनास प्रस्ताव सादर करावा.

**सुचक** : श्री. धनराज हरिभाऊ महाले, संचालक सदस्य.

**अनुमोदक** : श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक ३५ : आधारभूत खरेदी योजना, एकाधिकार खरेदी योजना व गौणवन उपज योजने अंतर्गत खरेदी केलेल्या मालाच्या विक्री साठी BSE E-riultural Markets Limited यांच्या सोबत केलेल्या करारनाम्यास मान्यता मिळणेबाबत.**

आदिवासी विकास महामंडळा मार्फत खरीप व रब्बी हंगामात राज्यातील बहुतांश जिल्हयात कृषीउपज मालाची खरेदी करण्यात येते व खरेदी केलेले धान/धान्य विविध योजने मार्फत गरजू व आदिवासी कुटुंबाना वाटप करण्यात येते. खरेदी केलेले धान/धान्य नैसर्गिक आपत्ती तसेच काही कारणास्तव वाटप होऊ ना शकल्यास सद्यस्थितीत NCDEX, Agribazar व Indi Trade यांच्या प्लॅटफॉर्म वर विक्रीस ठेवण्यात येऊन ई लिलावा द्वारे उच्चतम बोलीस प्राधान्य देऊन विक्री करण्यात येते. व विक्री प्रक्रिया राबविण्यासाठी खालील तपशिलानुसार मोबदला अदा केला जातो.

१) Indi Trade -- ०.२०% कमीशन.
२) Agribazar -- निरंक
३) NCDEX -- रू. १०,०००/- + GST (वार्षिक सभासद फी)

BSE E-Agricultural Markets Limited यांनी कृषीउपज मालाची खरेदी करण्यासाठी प्रस्ताव सादर केलेला असून त्यांच्या मार्फत ई-लिलाव आयोजित केल्यास ई-लिलावासाठी आणखी एक प्लॅटफॉर्म मिळेल व स्पर्धा निर्माण होऊन महामंडळास फायदा होण्याची शक्यता आहे.

वरील प्रमाणे संस्थाचे प्लॅटफॉवर बऱ्याचदा सर्वच मालास दर प्राप्त होत नाहीत. त्यामुळे काही माल विक्रीविना शिल्लक राहतो. BSEE-Agricultural Markets Limited यांचे प्लॅटफॉवर अशा मालास देखिल दर प्राप्त होऊ शकतील. BSEE-Agricultural यांचे मार्फत विक्री प्रक्रिया राबविण्यासाठी यांची वार्षिक सभासद फी रू.१०,०००/- + GST ची मागणी केली असून व प्रथम वर्ष सभासद नोंदणी साठी रू. २५,०००/- + GST ची मागणी केलेली असून सदरची रक्कम त्यांना अदा करण्यात आलेली आहे. दिनांक ११ ऑगस्ट २०२१ रोजी BSE E-Agricultural Markets Limited यांच्या सोबत करारनामा करण्यात आला असून त्यांच्या मार्फत देखील ई-लिलावाद्वारे माल विक्रीची कार्यवाही करणेबाबत सर्व प्रादेशिक कार्यालयांना निर्देश दिलेले आहेत.

सदर विषय सभेपुढे महाव्यवस्थापक (विपणन) यांनी मांडला असता त्यावर सांगोपाग चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव सर्वनुमते पारीत करणेत आला.

Scanned with CamScanner

**ठराव क्रमांक ३५ :** सर्वानुमते ठराव पारित करणेत येतो कि, NCDEX, Agribazar व Indi Trade यांचे सोबतच BSE E-Agricultural Markets Limited यांचे प्लॅटफार्मवर सुध्दा ई-लिलावाची कार्यवाही करणेकामी त्यांचे सोबत दिनांक ११.०८.२०२१ रोजी केलेल्या करारनाम्यास व त्यांना अदा केलेल्या रकमेस (विक्री प्रक्रिया राबविण्यासाठी वार्षिक सभासद फी रू.१०,०००/- + GST व प्रथम वर्ष सभासद नोंदणी साठी रू. २५,०००/- + GST ) सदर सभा मान्यता देत आहे. यापुढील कार्यवाही करणेचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देणेत येत आहे.

**सुचक** : श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग संचालक सदस्य.
**अनुमोदक** : श्रीम.मिनाक्षी अर्जूनराव वट्टी, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ३६: आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरेदी केलेला परंतू भरडाई विना शिल्लक असलेल्या धानाची ई-लिलावा द्वारे विक्री केल्याबाबत.**

**अ) प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली.**

प्रा.का.गडचिरोली अंतर्गत हंगाम २०१४-१५ पासून २०१९-२० पर्यंत आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरेदी केलेला परंतू भरडाई विना शिल्लक असलेला धान दिनाक : २६/०३/२०२१, २/०५/२०२१ व १८/०६/२०२१ रोजी NCDEX, Agribazar व Indi Trade यांच्या प्लॅटफॉर्म वर विक्रीस ठेवण्यात येऊन ई लिलावा द्वारे प्राप्त उच्चतम बोलीस प्राधान्य देऊन विक्री करण्यात आले आहे.

| दिनांक | विक्रीस ठेवलेला धानसाठा (क्विं.) | MSP दरानुसार होणारी रक्कम | उच्चतम बोली नुसार प्राप्त झालेली रक्कम | अपेक्षित तोटा |
|---|---|---|---|---|
| २६/०३/२१ | १,२३,०६९.६५ | २२,३०,८८,०९२.७५ | ६,५५,१७,४०१.४२ | १५,७५,७०,६९१.३३ |
| २२/०५/२१ | ५५,४४५.७० | ९,४७,३०,१५५.९० | २,०४,९४,०२५.८२ | ७,४२,३६,१३०.०८ |
| १८/०६/२१ | ३,७५९.९८ | ३४,३१,८०४.३५ | ४,०६,२०८.०० | ३०,२५,५९६.०० |
| एकूण | १,८२,२७५.३३ | ३२,१२,५०,०५३.०० | ८,६४,१७,६३५.२४ | २३,४८,३२,४१७.४१ |

**ब) उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी.**

उप प्रा.का.अहेरी अंतर्गत हंगाम २०१७-१८ व २०१९-२० पर्यंत आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरेदी केलेला परंतू भरडाई विना शिल्लक असलेला धान दिनाक ३०/०३/२०२१ रोजी NCDEX, Agribazar व Indi Trade यांच्या प्लॅटफॉर्म वर विक्रीस ठेवण्यात येऊन ई लिलावा द्वारे प्राप्त उच्चतम बोलीस प्राधान्य देऊन विक्री करण्यात आले आहे.

| दिनांक | विक्रीस ठेवलेला धानसाठा (क्विं.) | MSP दरानुसार होणारी रक्कम | उच्चतम बोली नुसार प्राप्त झालेली रक्कम | अपेक्षित तोटा |
|---|---|---|---|---|
| ३०/०३/२ | ३१,८१४.२९ | ५,७६,५४,४८९.९ | ७८,९६,५२९.०६ | ४,९७,५७,९६०.८ |

Scanned with CamScanner

**क) प्रादेशिक कार्यालय, भंडारा.**

प्रा.का.भंडारा अंतर्गत हंगाम २०१९-२० मध्ये आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरेदी केलेला परंतू भरडाई विना शिल्लक असलेला धान दिनाक २२/०७/२०२१ रोजी NCDEX, Agribazar व Indi Trade यांच्या प्लॅटफॉर्म वर विक्रीस ठेवण्यात येऊन ई लिलावा द्वारे प्राप्त उच्चतम बोलीस प्राधान्य देऊन विक्री करण्यात आले आहे.

| दिनांक | विक्रीस ठेवलेला धानसाठा (क्विं.) | MSP दरानुसार होणारी रक्कम | उच्चतम बोली नुसार प्राप्त झालेली रक्कम | अपेक्षित तोटा |
|---|---|---|---|---|
| २२/०७/२१ | ७,१९३.१८ | १३,०५,५६२.७० | ५७,४७,१५६.०० | ७३,०८,४६५.७ |

प्रादेशिक कार्यालय,गडचिरोली, उप प्रादेशिक कार्यालय,अहेरी व प्रादेशिक कार्यालय,भंडारा यांच्या कडून मागील हंगामातील भरडाई विना शिल्लक असलेल्या धानाची ई लिलावा द्वारे विक्री करण्यासाठी प्राप्त प्रस्ताव मा.अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांच्या मंजूरीनुसार विक्री करण्यात आले आहे.

सदर विषय सभेपुढे सादर करतांना महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सभेच्या निर्देशनास आणुन दिले की, शिल्लक मालाच्या विक्रीची कार्यावाही ही अन्न व नागरी पुरवठा विभागाकडील दिनांक १९.०९.२०२१ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार करण्यात आली आहे. शासन परिपत्रकातील सुचना त्यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिल्या यामध्ये प्रामुख्याने भरडाई न झालेल्या धानाची जबाबदारी ही अभिकर्ता संस्थांची राहणार असून भरडाईची मुदत संपुष्टात आल्यानंतर त्वरीत धानाची विक्री करावी. व विक्री केलेल्या धानाची रक्कम शासनखाती जमा करावी. सदर निर्देशानुसार ऑनलाईन धान विक्रीची कार्यवाही करुन मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांची मान्यता घेणेत आली आहे. अशा प्रकारे सांगोपाग चर्चा होवून मा. संचालक मंडळ सदस्यांनी मत मांडले की, भरडाई होवून जो धाना शिल्लक राईल अशा शिल्लक धानाची ई-लिलावाद्वारे तात्काळ विक्री करणेत यावी. जेणे करुन माल शिल्लक राहणार नाही याची दक्षता घेवून महामंडळाचे आर्थिक हित पहावे.

धान भरडाई करताना स्थानिक पातळीवर मिलर्स उपलब्ध होत नसल्याने मालाची वेळीच भरडाई होत नाही परिणामी भरडाई विना धान शिल्लक राहून खराब होण्याचे प्रमाण जास्त असल्याबातची चर्चा झालीयावर मा. अध्यक्ष, आ.वि.म. यांनी सुचित केले की, महामंडळाने अथवा संचालक मंडळ सदस्यांनी राईस मिल प्रकल्प उभारुन प्रायोगिक तत्त्वावरधानाची भरडाई करावी. जेणे करुन माल शिल्लक राहणार नाही. ई-लिलावात आलेल्या बोलीला उशिरा मंजुरी मिळते त्यामुळे सदर धान वेळेत उचल होत नाही यामुळे धानात घट अथवा नुकसान होण्याचे प्रमाण जास्त आहे. धानाची भरडाई वेळेत पूर्ण करणेबाबत व तसेच दिनांक ३०.०९.२०२१ नंतर २ महिने भरडाईचे मुदत वाढ मिळणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत टिपणी तयार करावी व शासनास प्रस्ताव सादर करावा असे मा. अध्यक्ष महोदयांनी सुचित केले. अशा प्रकारे सांगोपाग चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव मंजूर करणेत आला.

Scanned with CamScanner

**ठराव क्रमांक ३६ :** सर्वानुमते ठराव मंजुर करणेत येते की, मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांचे मंजुरीनुसार मागील हंगामातील प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली कडील १,८२,२७५.३३ क्विं.धान, उप प्रादेशिक कार्यालय, अहेरीकडील ३१,८१४.२९ क्विं.धान व प्रादेशिक कार्यालय, भंडाराकडील ७१,९९३.१८ क्विं.धान भरडाईविना शिल्लक असलेल्या ई-लिलावाद्वारे विक्री केलेल्या वरील धानास सदर सभा कार्योत्तर मंजूरी देत आहे, व येणाऱ्या तोटयाची परीपूर्तता करणेसाठी शासनास प्रस्ताव सादर करावा याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देणेत येत आहे.

**सुचक** : श्री. अशोक भाऊराव मंगाम,संचालक सदस्य.
**अनुमोदक** : श्री. विठ्ठल देवराम देशमुख, संचालक सदस्य.
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ३७ : दिनांक ३१.०३.२०२१ अखेर एकाधिकार खरेदी योजनेतील खरेदी, विक्री व शिल्लक मालाचा आढावा तसेच एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत खरेदी केलेल्या कृषी उपज मालाचीई-लिलावा द्वारे विक्री केलेल्या मालास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत हंगाम २०१३-१४ ते २०१९-२० हंगामातील खरेदी झालेल्या कृषी उपज माल दिनांक ३१/०३/२०२१ अखेर प्रादेशिक कार्यालय निहाय एकूण ४७,६३१.५५ क्विं. शिल्लक आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | प्रादेशिक कार्यालयाचे नांव | शिल्लक माल वजन क्विं |
|---|---|---|
| १ | नाशिक | २९७३९.१७ |
| २ | जव्हार | १७७५८.३२ |
| ३ | नंदूरबार | १२६.०६ |
| ४ | धारणी | ८.०० |
| एकूण | | ४७६३१.५५ |

शासन निर्णयानुसार एकाधिकार खरेदी योजना ८ जिल्हयातील २९ तालुक्यात राबविण्यात येत होती. या योजनेद्वारे खरेदी केलेला कृषी उपज माल शासकिय आश्रमशाळा/वस्तीगृहांना पुरवठा केला जात होता.

मात्र दिनांक १५ जून २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासकिय आश्रमशाळा/वस्तीगृहांना माल पुरवठा करण्यासाठी काढण्यात आलेल्या ई-निविदेत महामंडळाने सुद्धा भाग घेण्याचे निर्देश असून ई-निविदेत पात्र ठरल्यास महामंडळास पुरवठा आदेश देणे बाबत नमुद आहे. परंतू महामंडळाचा मुख्य उद्देश नफा मिळवणे नसून आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालास वाजवी दाम मिळवून देणे हा आहे त्यामुळे खुल्या बाजारातील स्पर्धेत महामंडळ स्पर्धात्मक दर देवू शकत नसल्याने तसेच निविदा फी व इतर खर्चाचा महामंडळावर अकारण भार पडेल यामुळे आर्थिक नुकसान

Scanned with CamScanner

टाळण्यासाठी महामंडळाने ई-निविदेत भाग घेतला नाही. पर्यायाने एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत खरेदी केलेला वरीलप्रमाणे ४७,६३१.५५ क्विं कृषी उपज माल शिल्लक राहिल.

दरम्यानच्या काळात कोविड-१९ चा प्रसार झाला व टाळेबंदीमुळे (Lock down) सदर मालाची विल्हेवाट वेळेवर होऊ शकली नाही. शासनाच्या निर्देशानुसार आदिवासी जनतेची उपासमार होऊ नये याकरिता एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत खरेदी केलेला कृषी उपज मालाची वाटप आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शेतकऱ्यांना करण्याचे निर्देश शासनाकडून प्राप्त झाल्याने धानाची भरडाई करून तयार झालेला तांदूळवाटप सुरू करण्यात आले. परंतू प्रादेशिक कार्यालय जव्हार अंतर्गत निकृष्ट दर्जाचा तांदूळाबाबत तक्रार प्राप्त झाली. त्यामुळे मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदर वाटप बंद करून शिघ्र विल्हेवाट लावण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

सर्व प्रादेशिक कार्यालयांना दिनांक २८.०९.२०१८ रोजी संचालक मंडळाच्या सभेत पारित झालेल्या ठरावानुसार शिल्लक असलेल्या मालाचा ई-लिलाव करून तोटयाच्या कारणमिमांसेसह संचालक मंडळाच्या समितीची मान्यता घेऊन मुख्यालयामार्फत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार प्रादेशिक कार्यालय, जव्हार, व प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांनी ई-लिलावा द्वारे एकाधिकार खरेदी योजनेतील मालाच्या विक्री साठी प्रस्ताव सादर केले आहेत. त्यानुसार शासनाकडे प्रस्ताव सादर करणेबाबतच चर्चा झाली. तसेच यापुढे महामंडळाचे पोटनियमातील तरतुदी नुसार वेगवेगळया प्रकारच्या समिती गठीत करुन गठीत होणाऱ्या व्यापार समितीच्या शिफारशीनुसार विक्रीबाबतची कार्यवाही करणेबाबत सन्मानिय संचालकांनी सुचित केले. अशा प्रकारे सांगोपांग चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**अ) प्रादेशिक कार्यालय, जव्हार.**

प्रादेशिक कार्यालय,जव्हार यांनी दिनांक १९/०४/२०२१, २०/०४/२०२१ व २२/०४/२०२१ रोजी शिल्लक कृषी उपज मालाच्या विक्रीसाठी ई-लिलाव आयोजित करून संचालक मंडळाच्या समितीची मान्यता घेऊन दर प्राप्त झालेल्या मालाची विक्री करण्यात आली आहे.

| अ.क्र. | कृषीउपज मालाचे नांव | ई-लिलावात विक्रीस ठेवलेला माल (क्विं) | विक्रीस ठेवलेल्या मालापैकी दर मिळालेला माल (क्विं.) | विक्री मालाची बीईपी नुसार होणारी किंमत रुपये | विक्री मालाची ई-लिलावात मिळणारी किंमत रुपये | विक्री मालातून होणारा तोटा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वरई | ४३१.६७ | १९१.७७ | ७२२९७२.९०. | ३८३९२३.५४ | ३३९०४९.३६ |
| २ | नागली | २१.५८ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ३ | खुरासणी | २६.७३ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ४ | उडिद | ४४५.२८ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ५ | भात अ ग्रेड | ५६८५.५७ | २५२४.५८ | ५७४०४२४.५६ | १५२५२०७.६२ | ४२१५२१६.९४ |
| ६ | भात ब ग्रेड | ११४२४.३० | ८२७७.२५ | १४५९१६०५.४३ | ४६९९०५२.९७ | ९८९२५५२.४६ |
| ७ | भात क ग्रेड | ९८.५० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण | १८१३३.६३ | १०९९३.६० | २१०५५००२.८९ | ६६०८१८४.१३ | १४४४६८१८.७६ |

Scanned with CamScanner

**ब) प्रादेशिक कार्यालय, नाशिक.**

प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांनी दिनांक १५/०४/२०२१ व १९/०४/२०२१ रोजी शिल्लक कृषी उपज मालाच्या विक्रीसाठी ई-लिलाव आयोजित करून संचालक मंडळाच्या समितीची मान्यता घेऊन दर प्राप्त झालेल्या मालाची विक्री करण्यात आली आहे.

| | | ई-लिलावात विक्रीस ठेवलेला माल (क्विं.) | विक्रीस ठेवलेल्या मालापैकी दर मिळालेला माल (क्विं.) | विक्री मालाची बीईपी नुसार होणारी किंमत | विक्री मालाची ई-लिलावात मिळणारी किंमत | विक्री मालातुन होणारा तोटा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१४-१५ | ४२६.९५ | ११८.०८ | ५८००१०.२३ | ३१९९९.६८ | ५४८०१०.५५ |
| २ | २०१५-१६ | ११६४.३९ | ११४८.१४ | ५०२१९१६.९५ | ७३४६१३.१८ | ४२८७३०३.७ |
| ३ | २०१६-१७ | १४९४.३९ | ३४९.६५ | २०५२०९५.८ | ७१९५५१.३४ | १३३२५४४.५ |
| ४ | २०१७-१८ | ५८३२.१६ | ५६३५.१७ | २१०६६९२९.५ | ३९८३१९६.८७ | १७०८३७३२.६ |
| ५ | २०१८-१९ | १९३४७.६४ | १९३४७.६४ | ६१४४३७११.० | १४९०२८४१.९२ | ४६५४०८६९. |
| ६ | २०१९-२० | १५०८.१४ | १५०८.१४ | ४५४६०८८.४ | ७८२९१६.३० | ३७६३१७२.१२ |
| एकूण | | २९७७३.६७ | २८१०७.६२ | ९४७१०७५२. | २११५५११९.२१ | ७३५५५६३२. |

प्रादेशिक कार्यालय, जव्हार, व प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांच्या कडून मागील हंगामातील भरडाई विना शिल्लक असलेल्या कृषी उपज माल ई लिलावा द्वारे विक्री करण्यासाठी प्राप्त प्रस्ताव मा.अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांच्या मंजूरीनुसार विक्री करण्यात आल्यानंतर खालील प्रमाणे शिल्लक असून ई-लिलावा द्वारे विक्री करण्याची कार्यवाही सुरू आहे.

**<u>शिल्लक मालाचा तपशिल</u>**

| अ.क्र. | प्रादेशिक कार्यालयाचे नांव | शिल्लक माल वजन क्विं. |
|---|---|---|
| १ | नाशिक | १६३१.५५ |
| २ | जव्हार | ६७६४.७२ |
| ३ | नंदूरबार | १२६.०६ |
| ४ | धारणी | ८.०० |
| **एकूण** | | ८५३०.३३ |

सदर विषस सभेपुढे चर्चासाठी सादर केला असता सर्वानुमते ठराव मंजुर करणेत आला की, ई-लिलावाद्वारे विक्री केलेल्या मालास कार्योत्तर मंजूरी देण्योत येत आहे.

Scanned with CamScanner

**ठराव क्रमांक ३७ :** सर्वानुमते ठराव पारित करणेत येतो की, विक्री केलेल्या २८१०७.६२ क्विं. मालास सदर सभा कार्योत्तर मंजूर देत आहे. यापुढे महामंडळाचे पोटनियमातील तरतुदीनुसार विविध प्रकारच्या समित्या गठीत करुन, गठीत होणाऱ्या व्यापार समितीच्या नियंत्रणाखली उर्वरित शिल्लक असलेल्या,तसेच यापुढे वेळोवेळी शिल्लक राहिलेल्या माच्या विक्रीसाठी Star Agri bazzar Inditrade, NEDX व BSE E-Agricultural या संस्थांच्या प्लॅटफॉर्मवर कार्यवाही करावी. यापुढे कार्यवाही करण्याचेअधिकार व्यवस्थापकीय संचालक यांन सदर देत आहे.

**सुचक** :- श्री. प्रकाश तुळशीराम दडमल,संचालक सदस्य.
**अनुमोदक** :- श्री. धनराज हरिभाऊ महाले, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ३८ : हंगाम २०२०-२०२१ मध्ये शासनाकडून भरडाईस विलंब झाल्याने उघडयावरील धान खराब होऊ नये याकरिता केलेल्या अंतर्गत वाहतुकी बाबत.**

हंगाम २०२०-२१ मध्ये सुमारे ८९० कोटी रूपये किंमतीचा ४७,६८,४५८ क्विं. धान खरेदी करण्यात आलेला आहे. एकूण खरेदी केलेल्या धानापैकी ८५% धान गोंदिया व गडचिरोली या पुर्व विदर्भातील जिल्हयामध्ये असून गोदामाच्या कमतरतेमुळे बहुतांश धान खरेदी केंद्रावरील खुल्या जागेवर साठवणूक करण्यात आलेला असल्याने पावसाळा सुरू होण्यापूर्वी उघडयावरील धान पावसात भिजून खराब होऊ नये याकरिता मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी कोविड-१९ मुळे सर्व शाळा बंद असल्याने गडचिरोली जिल्हयातील अहेरी तालुक्यात अनूदानित शाळा,आश्रमशाळा मध्ये धान साठविण्याची परवानगी दिल्याने उघडावरील धान निवासी आश्रम शाळेमध्ये सुरक्षितपणे साठविण्यात आला.

तसेच प्रादेशिक कार्यालय,गडचरोली अंतर्गत उघडयावरील धान तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरिता भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या गोदामात सुरक्षितपणे साठविण्यात आला.

उघडावरील धान शासकीय आश्रम शाळेमध्ये/गोदामामध्ये साठविण्या करिता मा.अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांच्याकडे खालीलप्रमाणे अंतर्गत वाहतूक करण्यासाठी मंजूरी घेण्यात आली.

| अ.क्र | प्रादशिक कार्यालय | वाहतुक केलेले धान (क्विं.) | वाहतुक खर्च (रूपये) | हमाली खर्च (रूपये) | गोदाम भाडे(रूपये) | एकूण खर्च(रूपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | २,४०,२४६.३६ | १,६८,४५,९९७ | ७६,८७,८८३ | ३०,२४,६०४ | २,७५,५८,४८४ |
| २ | अहेरी | १,३७,८८८.९९ | ३३,२६,७६६ | ५५,१५,५५९ | | ८८,४२,३२५ |
| ३ | भंडारा | १,७०,८२०.०० | १,२५,६४,७६० | ५४,६६,२४० | ३३,५४,९६० | २,१३,८५,९६० |
| | **एकूण** | **५,४८,९५५.३५** | **३,२७,३७,५२३** | **१,८६,६९,६८२** | **८८,२१,२००** | **५,७७,८६,७६९** |

अंतर्गत वाहतुकीवर प्रत्यक्ष झालेला खर्च.

Scanned with CamScanner

| अ.क्र | प्रादेशिक कार्यालय | वाहतुक केलेले धान (क्विं.) | वाहतूक व हमाली खर्च (रूपये) | गोदाम भाडे (रूपये) | एकूण खर्च (रूपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | ६१,४३१.०० | ९५,४५,९२२ | ५,८४,१८२ | १,०१,३०,१०४ |
| २ | अहेरी | १,३७,८८८.९९ | १२,७७,३६० | - | १२,७७,३६० |
| | **एकूण** | **१,९९,३१९.९९** | **१,०८,२३,२८२** | **५,८४,१८२** | **१,१४,०७,४६४** |

सदर विषयावर सांगोपाग चर्चा होवून झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देणेत आली आहे. परंतू सदर वाहतुक महामंडळाच्या वाहनाने किती वाहतुक केली व खाजगी वाहनाने किती वाहतुक केली याचा तपशिल संचालक मंडळ सदस्यांना अवगत करुन दयावी.

**ठराव क्रमांक ३८ :** सर्वानुमते ठराव मंजूर करणेत येतो की, धानाच्या सुरक्षितते करीता गडचिरोली, अहेरी केलेल्या अंतर्गत वाहतुकीवर झालेल्या खर्चास मंजूरी देणेत येत आहे. महामंडळाचे वाहनाचे व खाजगी वाहनाने केलेल्या वाहतुक खर्चाचा सविस्तर तपशिल संचालक मंडळासमोर सादर करावा.

**सुचक** : श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग,संचालक सदस्य.
**अनुमोदक** : श्री. मधुकर निंबाजी काठे, संचालक सदस्य.
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ३९: आधारभुत किंमतखरेदी योजनेतील धानाचा हंगाम निहायखरेदी, भरडाई, व भरडाईविना शिल्लकधानसाठयाचा विक्री बाबतचा आढावा**

**हंगाम २०१९-२०२०**

आधारभुत किंमतखरेदी योजने अंतर्गत पणन हंगाम २०१९-२० मध्येझालेलीखरेदी, भरडाई, व भरडाईविना शिल्लक मालाचा आढावा खालील प्रमाणे.

| अ. क्र | जिल्हा | एकूणखरेदी (क्विं.) | भरडाई झालेला धान (क्विं.) | भरडाईची टक्केवारी | भरडाईविना शिल्लक धान (क्विं.) | आलेली घट (क्विं.) | घटीची टक्के वारी | प्रत्यक्ष शिल्लक साठा (क्विं.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | १४२०५२२.९४ | १२९६५७१.५० | ९१.२७ | १२३९५१.४४ | १६५७७.६९ | ७.७७ | १०७३७३.७५ |
| २ | अहेरी | ७९३३३८.१० | ७३४८८८.१४ | ९२.६३ | ५८४४९.९६ | ०.०० | ० | ५८४४९.९६ |
| ३ | गोंदिया | १८९८८२९.०६ | १८७२१९९.११ | ९८.६० | २६६२९.१५ | ०.०० | ० | २६६२९.१५ |
| ४ | नागपूर | ४९९६३.४२ | ४६५७९.९४ | ९३.२३ | ३३८३.४८ | ६.२२ | ०.०१ | ३३७७.२६ |
| ५ | चंद्रपूर | २७९९५५.०८ | २७७१४३.८९ | ९९.०० | २८११.१९ | ०.०० | ० | २८११.१९ |
| ६ | पालघर | ११२३९९.८९ | ११०४९०.४२ | ९९.०१ | ०.५० | ११०८.९७ | १ | ०.५० |
| ७ | ठाणे | २११३००.२८ | २०७६१०.३१ | ९८.२५ | ०.०० | ३६८९.९७ | १.७४ | ०.०० |
| ८ | रायगड | ४५०७.८० | ४४३२.८० | ९८.३४ | ०.०० | ७५.०० | १.६६ | ०.०० |
| ९ | नंदुरबार | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ० | ०.०० |
| १० | नाशिक | ६७६३६.८१ | ६६१२१.४२ | ९७.७६ | १५१५.३९ | ०.०० | ० | १५१५.३९ |
| | **एकूण** | **४९१८४५३.३८** | **४६९६०३८.३३** | **९५.४८** | **२१६७४१.११** | **२२२५७.८५** | | **२००१५७.२०** |

Scanned with CamScanner

भरडाईविना शिल्लक दिसत असलेल्या वजन २,१६,७४१.११ क्विं.धान शिल्लक दिसत असला तरी आलेली घट वजन २२,२५७.८५ क्विं. वजा जाता प्रत्यक्षात वजन २,००,१५७.२० क्विं. धान शिल्लक आहे. प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली येथील वजन १,०४,३०५.५४ क्विं. धान पावसात भिजून खराब झाला असून खराब झालेल्या धानाचा मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी नियुक्त केलेल्या पथकाद्वारे तपासणी करुन पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिनांक १९.०९.२०१९ च्या शासन निर्णयानुसार प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली, प्रादेशिक कार्यालय, भंडारा व उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी अंतर्गत प्रत्यक्ष शिल्लक धानाचा ई-लिलाव घेता असून प्राप्त उच्चतम दरास मा. अध्यक्ष सो.यांच्या मंजुरीने धानाची विक्री करण्यात आली आहे. विक्री केलेल्या धानाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | प्रादेशिककार्यालय | विक्री केलेला धानसाटा (क्विं.) |
|---|---|---|
| १ | गडचिरोली | ११६७५७.९५ |
| २ | भंडारा | ७१९३.१८ |
| ३ | अहेरी | ३१४८०.५३ |
| एकूण | | १,५५,४३१.६६ |

वजन २,१६,७४१.११ क्विं.धानापैकी वजन १,५५,४३१.६६ क्विं.धानाचा ई-लिलाव झाला असून उर्वरीत वजन ६१,३०९.४५ क्विं. धानाच्या ई-विक्री बाबतची कार्यवाही सुरू आहे.

**हंगाम २०२०-२०२१**

आधारभुत किंमतखरेदी योजने अंतर्गत पणन हंगाम २०२०-२१ मध्ये एकूणझालेलीखरेदी, भरडाई, व भरडाईविना शिल्लक मालाचा आढावा खालील प्रमाणे.

| अ.क्र | जिल्हा | एकूणखरेदी | भरडाई झालेला धान | भरडाईची टक्केवारी | भरडाईविना शिल्लक धान |
|---|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | १२२२९०९.६८ | ८०३३६६.०४ | ६५.६९ | ४१९५४३.६४ |
| २ | अहेरी | ७६३११४.०८ | ५२६२७९.६६ | ६८.९६ | २३६८३४.४२ |
| ३ | गोंदिया | १६५०३३२.७१ | ११०६५१६.१८ | ६७.०५ | ५४३८१६.५३ |
| ४ | नागपूर | ३०६८५.२० | २३९६३.८२ | ७८.१० | ६७२१.३८ |
| ५ | चंद्रपूर | ३२५२९७.४४ | ३१०१३३.६७ | ९५.३४ | १५१६३.७७ |
| ६ | पालघर | ३००३६१.२३ | २६००८२.२७ | ८६.५९ | ४०२७८.९६ |
| ७ | ठाणे | ३५८५५४.७९ | १७४६९२.५९ | ४८.७२ | १८३८६२.२० |
| ८ | रायगड | ९९००.४० | ०.०० | ०.०० | ९९००.४० |
| ९ | नांदेड | २११०.२० | ०.०० | ०.०० | २११०.२० |
| १० | नाशिक | ९५५३४.९९ | ५९०२६.३४ | ६१.७९ | ३६५०८.६५ |
| ११ | पुणे | ४०६.३७ | ४०६.३७ | १००.०० | ०.०० |
| १२ | अहमदनगर | ९२४०.१९ | ८७६०.०० | ९४.८० | ४८०.१९ |
| **एकूण** | | **४७६८४५७.२८** | **३२७३२२६.९४** | **६८.६४** | **१४९५२३०.३४** |

Scanned with CamScanner

असला
धान
जून
ा

भरडाईविना शिल्लक दिसत असलेल्या वजन १४,९५,२३०.३४ क्विं. धानाच्या भरडाईचे कामसुरू असून धानभरडाई मुदतदिनांक३०/०९/२०२१ रोजी पर्यंत आहे.परंतूभरडाईचे काम मुदतीअखेरहोईल असे वाटत नाही.त्यामुळे भरडाईची मुदत वाढविण्याबाबत शासनास प्रस्ताव सादरकरण्यात येईल.

भरडाई विना शिल्लक मालचा तपशिलासह महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सभेपुढे पुढीलप्रमाणे आकडेवारी अवगत करुन दिली गडचिरोली- १,१६,७५७.९५ क्विं, भंडारा ७,१९३.१८ व अहेरी ३१,४८०.५३ एकूण १,५५,४३१.६६ क्विं. मा. मंत्री महोदयांचे मंजुरीने विक्री केलेल्या ई-लिलावस कार्योत्तर मंजुरी देणेत येत आहे.

तसेच हंगाम २०२०-२१ ची भरडाईची मुदत हि ३०.०९.२०२१ पर्यंत शासनाने निर्धारीत केलेली आहे. परंतू भरडाईचे काम वेळेत पूर्ण होवू शकत नसल्याने मुदतवाढी करीता शासनास प्रस्ताव सादर करणेत यावा असे मा. अध्यक्ष (आविम) महोदयांनी सुचित केले.

**ठराव क्रमांक ३९ :** सर्वानुमते ठराव पारित करणेत येतो की, शिल्लक मालाचे खरेदी/ विक्रीस मा. अध्यक्ष (आ.वि.म.) यांची मान्यता घेणेपूर्वी शिल्लक मालाची माहिती स्थानिक संचालक यांना अवगत करुन दयावी व खरेदी/विक्री चे व्यवहारावर नियंत्रण ठेवणे करीता स्वतंत्र कमिटी तयार करावी. याबाबत कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** : श्री.धनराज हरिभाऊ महाले,संचालक सदस्य.
**अनुमोदक** : श्री. मधुकर निंबाजी काठे, संचालक सदस्य.
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ४० : आदिवासी विकास महामंडळाचे नियमित सेवेतील अधिकारी/ कर्मचारी यांना सातवा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी लागू करणे बाबत..**

राज्य शासनाकडील वित्त विभाग शासन निर्णय क्र.शासाअ २०१९/प्र.क्र.९३/सा.अ.दिनांक ०४.०८.२०२१ नुसार सार्वजनिक उपक्रम/ महामंडळामधील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्यासंदर्भात विकष निश्चित केलेले आहे. म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळाची स्थापना राज्य शासनाच्या सहकारी कायद्याखाली नोंदणीकृत झालेली आहे.

म.रा.सह. आदिवासी विकास महामंडळाची स्थापना आदिवासी बांधवांची आर्थिक पिळवणूक थांबविण्यासाठी व त्यांच्या आर्थिक विकासासाठी प्रत्यक्ष सहाय्यच्या योजना राबविण्याकरीता करण्यात आलेली आहे. महमंडळाचा उद्देश कल्याणकारी असुन ता नफा ना तोटा या तत्वावर महामंडळ कामकाज करीत आहे. तसेच राज्य शासाने Social Welfare and Sports Department, यांच्याकडील

Scanned with CamScanner

शासन निर्णय क्रमांक TDC १०७७/१३७३३/xxIV(II) दिनांक ०६ फेब्रुवारी, १९८२ नुसार महामंडळास वेतन व भत्यापोटी १००% अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. महामंडळाने आतापर्यंत कल्याणकारी योजनांच्या मान्यमातुन आदिवासी बांधवाचे आर्थिक उन्नतीसाठी कामकाज केले आहे.

वरील बाबी विचारात घेता, म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळाचे नियमित अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक ०१.०१.२०१६ पासुन सुधारित वेतनश्रेणी लागू करणेसाठी राज्य शासनास प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सादर करणेस मंजुरी मिळावी.

**ठराव क्रमांक ४० :** सर्वानुमते ठराव पारित करणेत येतो की, म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळाचे नियमित अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक ०१.०१.२०१६ पासुन सुधारित वेतनश्रेणी लागू करणेसाठी राज्य शासनास प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सादर करणेस मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक** : श्री.धनराज हरिभाऊ महाले,संचालक सदस्य.
**अनुमोदक** : श्री. मधुकर निंबाजी काठे, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

(संदिप सांबळे), वाहन पर्यवेक्षक
(बाबासाहेब लक्ष्मण गायकवाड), टंकलिपिक
(कृष्णा नाईक), लेखापाल

व्यवस्थापक (प्रशासन), व्यवस्थापक (खाते चौकशी), व्यवस्थापक (विपणन),

व्यवस्थापक (लेखा १) व्यवस्थापक (लेखा २) व्यवस्थापक (लेखा ३)

महाव्यवस्थापक (प्रशासन), महाव्यवस्थापक (विपणन), महाव्यवस्थापक (वित्त),

**(हिरालाल सोनवणे,** भा.प्र.से.),
व्यवस्थापकीय संचालक,
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, तथा
आदिवासी आयुक्त, नाशिक

मा.अध्यक्ष,
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्यादित,
नाशिक

Scanned with CamScanner